## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

शनिवार, दि. १०.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती .

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाबाई नारायण |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| बियाणी प्रविण बालाप्रसाद | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खाँ इलीयास खाँ | मुंढे शांता मोतीराम |
| आनेवार गंगासागर संदिप | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| भवरे किशोर दामोधर | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| कनकदंडे मोहिनी महेशराव | वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| मुदिराज कमलबाई रामस्वामी | रजिया बेगम अयुब खान |
| गाडगे शंकर जयवंतराव | गायकवाड अंजली सुरेशराव |
| देशमूख बालासाहेब गंगाधराव | सय्यदा इतरत फातेमा म. मजहर हुसेन |
| गफार खान गुलाम महमंद खान | धबाळे गणपतराव गुणाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | खेडकर ज्योती महेंद्र |
| नवाब गुरमितसिंघ ब-हयामसिंघ | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ | .हबीब अ.रहिम बागवान |
| बिपाशा बेगम सय्यद वलीओचीन | अ. सत्तार अ.गफुर |
| आसीया बेगम अ. हबीब बागवान | स. शेर अली स. महेबुब अली |
| इशरत फातेमा अ. शमीम | कुरेशी चाँद पाशा खाजा |
| फारुख हुसेन कासीम साब | कोकुलवार लद्दमीबाई तुळशीराम |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| अ. लतीफ अ. मजीद | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| सुदर्शना महेश (बाळु) खोमणे | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक रमेशराव सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमुख मंगला गजानन |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| घोगरे इंदूबाई शिवाजीराव | येवनकर विजय हिराचंद |
| कदम विश्वास बालाजी | अङ बन शाम वामनराव |
| अल केसरी हसन बिन उमेद | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी अ,महापौर हे होते तसेच श्री समीर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (विकास), श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. स्मीता ठाकरे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री विजय मुंढे, प्र.उपायुक्त (महसुल), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता(साबांवि). श्री सुगीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**प्रश्नोत्तराचा वेळ** :- शिवसेना-भाजप पक्षासाठी ११.०० ते ११.२५, एमआयएम-संविधान पक्षासाठी ११.२५ ते ११.४५, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी ११.४५ ते १२.००, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षासाठी १२.०० ते १२.३० तसेच १२.३० वाजता मुळ विषयपत्रिका सुरु करण्यात येईल.

**महापौर** वंदेमातरमने सभेला सुरुवात करण्यात येते.

**विनय गिरडे** महाडच्या पुलावरुन दोन एस. टी. महामंडळाच्या व कारमधुन प्रवास करीत असलेल्या व्यक्तीचा पुल तुटून दुर्घटना झाली अशा सर्व मृत्यु मुखी पडलेल्या प्रवासी यांना ही सभा दोन मिनिटे स्थब्ध राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी, अशी विनंती आहे.

**आनंद चव्हाण** महाडच्या पुलावरुन जात असतांना जी दुर्घटना झाली त्या प्रवाश्यास श्रध्दाजंली अर्पण करण्यास मी अनुमोदन देतो.

**महापौर** दोन मिनीटे स्थब्ध राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी. सर्वानी उभे राहावे.

**ठराव क्रं.४८** **ठराव**

मुंबई पुणे मुसळधार पाऊसामुळे म्हाडाच्या पुल तुटून दोन बसेस वाहुन गेले असल्याने त्यातील नागरीकांचा मृत्युमुखी झाल्यामुळे त्यांना दोन मिनीटांची श्रध्दांजली हि नावाशमनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते अर्पण करते.

**सभागृह नेता** मी मा. महापौर यांचे स्वागत करतो की, त्यांनी सर्वच पक्षास सभागृहामध्ये प्रश्न उतराची वेळ निर्धारित करुन दिलेली आहे. एक नगरसेवक बोलत असतांना दुसरा नगरसेवक उभे राहुन बोलत असतात. सर्व पक्ष निहाय दिलेल्या वेळामध्ये सर्व पक्षांनी आपले प्रश्न अथवा समस्या सभागृहात माडंण्यात याव्यात. मा. महापौरांनी प्रथमच वेळ निर्धारित करुन दिल्यामुळे मा. महापौर यांचे मी स्वागत करतो व त्यांचे अभिनदंन करतो. सर्वानी सभागृह चालविण्यासाठी सहकार्य करावे अशीही मी विनंती करतो.

**विरोधी पक्षनेता** सर्व पक्षासाठी मा. महापौर यांनी वेळ राखुन दिला आहे त्यासाठी मी मा. महापौर यांचे अभिनदंन करतो. आमच्या पक्षाचे नगरसेवक जे प्रश्न विचारतील त्याचा खुलासा प्रशासनाने करावा, अशी मी विनंती करतो. मागे आयुक्त साहेबांनी आमच्या पक्षाची बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागामध्ये पाऊसामुळे रस्ते खराब झाले आहेत त्या भागामध्ये मुरुम, गिटीच्या एक-एक दोन-दोन गाडया टाकण्यासाठी सांगीतले होते परंतू प्रशासना मार्फत मुरुम, गिटीची एकही गाडी टाकण्यात आलेले नाही. आम्ही वार्डात नागरीका सोबत फिरतो ते सांगतात मुरुम टाका म्हणुन सांगतात. दोन ट्रीप टाकण्याएवढी आपल्या मनपाची परिस्थीती नाही काय हे सांगावे. माझा दुसरा प्रश्न आहे की, जमिन घोटाळयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता त्यावर आयुक्तांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

**दिपकसिंघ रावत** आपल्या महानगरपालिकेचा एक कर्मचारी श्री विलास गजभारे यांनी सोशल मिडीयावर एक पोस्ट केली. त्या पोस्टमध्ये त्यांने नगरसेवकाच्या संदर्भात अत्यंत अश्लिल भाषेचा वापर केलेला आहे. सर्व पक्षीय नगरसेवकांनी आयुक्त साहेब आपणास एक निवेदन दिले होते. नगरसेवकाच्या बाबत एका कर्मचा-यास लिहीता येते काय याबाबतचा खुलासा करावा. मी महापौरांना म्हणतो की, अशा कर्मचा-याच्या विरोधात शिस्तभंग विषयक कार्यवाही का करण्यात येवू नये. आमच्या भाषेमध्ये काही चुका आहेत ते चुका आम्हाला सांगावे, परंतू मा. आयुक्त साहेब मी आपल्या कॅबीन मध्ये केवळ एकदा आलो होतो आणि आपणास सांगीतले होते की, आपली भेट केवळ सर्वसाधारण सभेमध्ये होईल असे म्हणालो होतो. तर आयुक्त साहेब या कर्मचा-यावर आपण काय कार्यवाही करणार याचा खुलासा करावा. मी महापौर यांना विनंती करतो की, या कर्मचा-यावर सायबर गुन्हा का दाखल करु नये याचा खुलासा करावा. एखादया नगरसेवकांने कर्मचा-यास थोडे जर बोलले तर कार्यवाही करतात. मग एखादया कर्मचा-यांने नगरसेवकाच्या संदर्भात लिहीतो आणि त्यावर आपण काय कार्यवाही करणार याचा खुलासा करण्यात यावा. जर मी सभागृहातील सर्व पक्षीय नगरसेवकांना विनंती करतो की, आपण सर्व जन एकत्र जावून बजीराबाद पोलीस स्टेशन मध्ये सायबर गुन्हा दाखल करावा. मी सर्व सभागृहाला विनंती करतो. मा. आयुक्त साहेबानी यां बाबतचा खुलासा करावा.

**आयुक्त** मा. महापौर महोदया, स. सदस्य यांनी तीन प्रश्न उपस्थित केले आहे प्रभागामध्ये गिटटी, मुरुम टाकणेसाठी यापुर्वीच ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी टाकण्यात यावा. दुसरा प्रश्न असा आहे की, स.सदस्यांनी मागील दोन दिवसापुर्वी एक निवेदन देवून त्या निवेदना मध्ये श्री विलास गजभारे यांच्या बाबत तक्रार दिलेली आहे. जानेवारी-2016 मधील तक्रार ईमेल किंवा वॉटसअपचा वर दिलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिस रुलनुसार अधिकारी/कर्मचारी यांनी सोशल मिडीयावर काय पोस्ट करावे याबाबत मार्गदर्शक सुचना आहेत. या वर्तणुक नियमामध्ये संबधीत कर्मचारी यांनी काही आक्षपार्ह लिखान केले असेल तर त्याची तपासणी करुन निश्चीतपणे कार्यवाही करण्यात येईल. काही त्रुटी असल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**दिपकसिंघ रावत** वॉटसअपवर त्यांचा नंबर आहे नांव आहे. आणि आपण म्हणता की तपासणी करतो हे बरोबर नाही. चुकीचे उत्तर देवू नका. गोल गोल उत्तर देवू नये स्पष्ट उत्तर दयावे, आपण कार्यवाही करणार किंवा नाही हे सांगावे.

**आनंद चव्हाण** गोल गोल उत्तर देवू नये स्पष्ट सांगावे कि संबधीत कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करणार कि नाही.

**दिपकसिंह रावत** सर आपण कार्यवाही करणार नसाल तर शिवसेना पक्ष या विषयावर वेगळे वळन घेईल.

**विनय गिरडे** या प्रश्नावर मला सांगावयाचे आहे की, आयुक्त साहेब आपण काय कार्यवाही करणार हे सांगावे.

**महापौर** आपणास वेळ दिला आहे. तो वेळ आता पुर्ण झालेला आहे.

**सरजितसिंघ गिल** जे प्रश्न सर्व सभागृहा संबधीत असतील ते प्रश्न शिवसेना पक्षाने उचलेला असेल तर त्याचे आम्ही अभिनंदन करतो, अनुमोदनही करतो. त्याच्या समर्थनात आम्हालाही बोलावे लागणार. तर एका सभासदाचा अपमान नाही तर सर्व सभागृहाचा अपमान आहे. मा. महापौर मॅडम जर आपण म्हणत असाल की शिवसेनेवाले बोलतील, कॉग्रेसवाले बोलणार नाही हे चालणार नाही. प्रश्नासहीत उप प्रश्न होणार त्यावर बोलावे लागणार.

| | |
|---|---|
| **आनंद चव्हाण** | चार दिवसापुर्वी निवेदन दिले आहे त्या निवेदनावर काय कार्यवाही केली याच सभागृहामध्ये त्याचा निर्णय घेतला पाहीजे. जर आपण कार्यवाही करणार नसेल तर नाही म्हणुन सांगावे. |
| **विरोधी पक्षनेता** | अधिका-यांच्या संदर्भात आम्ही बोलत आहोत ते काय चुकीचे बोलत आहोत काय हे सांगा आयुक्त साहेब. हे अधिका-याला पाठीशी घालत आहेत. आम्ही प्रत्येक वेळी अधिका-याबाबत सांगत आहोत तर आपण काहीच कार्यवाही करीत नाही. हे सभागृहात चौकशी करु, सांगु, असेच आपण म्हणता. एखादे काम सांगितले की, पाहु, बघतो, करतो असेच आपले उत्तर आहे आपणास अधिकार आहेत. त्या अधिकाराचा वापर करावा. कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असो उत्तर अश्याच प्रकारचे आहे. आज एक ते दिड महिणा झाला आहे ते कोणत्या प्रकारचे काम करीत आहे हे मला सांगा. वसुली झाली म्हणजे झाले का. इतर कोणते काम केले हे सांगा. कार्यालयात गेले की, केवळ बगतो, करतो, पहातो असेच सांगतात. सभागृहात देखील असेच उत्तर आहेत. आम्ही कोणाकडे जावे. हे तरी सांगा, याचा खुलासा मा.आयुक्तांनी करावे. |
| **विनय गुर्रम** | मागच्या मिटींगमध्ये आम्ही एका अधिका-यावर कार्यवाही करण्यासाठी सांगीतले होते त्यांच्या का कार्यवाही करण्यात आली नाही हे सांगा. त्यावेळी म्हणाले होते की, आम्ही कार्यवाही करु. नगरसेवकाकडून काही चुक झाली की लगेच कार्यवाही आपल्यामार्फत करण्यात येते. कर्मचा-याच्या बाबत तुम्ही असे करीत नाही. त्यांना पाठीशी घालता. अधिका-यासाठी एक नियम आणि नगरसेवकासाठी एक नियम असे काही आहे काय ते सांगा. |
| **सभागृह नेता** | आम्ही मागे एक सर्व पक्षीय आपल्याकडे निवेदन दिलेले आहे. आम्ही समजू शकतो की पेपरवाले त्यांच्या पेपरमध्ये काही विरोधात बातम्या देतात. त्यांना लिहीण्याचा अधिकार आहे. त्यांनी लिहीले तर चालेल. परंतू एखादया कर्मचा-यांना असे लिहीता येत का ? मत मांडता येत का ? त्यांनी एका नगरसेवकाच्या संदर्भात लिहीले नाही तर सर्व नगरसेवकाबाबत मत मांडले आहे. मा. आयुक्त साहेब यांनी आता सांगीतल्याप्रमाणे कर्मचारी यांच्या साठी एक आचारसंहिता आहे. परंतू या कर्मचा-याने एकदा नाही तर 5 ते 6 वेळा वेगवेगळया कॉमेन्टस टाकल्या आहेत. आपणास नियम माहिती आहेत. त्यांनी काय पोस्ट केली आहे त्याची माहिती आपल्या समोर आहे. सर्व नगरसेवकाक्रडे आहे. आपण संबधीत कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करतो असे सांगता असे चालणार नाही. सर्व अभिलेखे असंताना असे उत्तर देणे योग्य नाही. आणखी त्यांनी ज्या पोस्ट केलेल्या आहेत त्या पोस्ट आपल्याकडे देतो. एका नगरसेवकाचा अपमान नाही तर तो सर्वांचा अपमान आहे. आम्हाला टाईम बॉऊंड सांगा की कार्यवाही करतो. |
| **सभागृह नेता** | आपली आचारसंहिता पाळायची त्याला माहित नसेल तर प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही तात्काळ केली पाहिजे. |
| **विनय गिरडे** | विरोधी पेक्षातील लोकांनी आताच जो काही प्रश्न उपस्थित केला. मनपाकेत बरेच कर्मचारी आहेत त्यांना मुळ पदावर काम न घेता इतरत्र काम लावले आहे. त्या कर्मचा-याचे मुळे पद काय आहे. त्याचेच त्याला स्वांतत्र्य आहे. युनियन चालवतात. त्यांच्यावर अन्याय झाला तर बोलले तर काहिही हरकत नाही. परंतू नगरसेवका बददल सोशल मिडीयावर आक्षेपार्य मजकुर टाकलेला आहे. सर्व सदस्यांना त्याच्या प्रति सुध्दा मिळालेल्या आहेत. सायबर क्राईम अंतर्गत आजच्या आज आम्हाला सांगावे. पुढील मीटींगमध्ये माहीती की तो कोणत्या पदावर आहे ही माहिती दयावी. सोशल मिडीयावर सर्व जग बगते कर्मचारी काम करतात. परंतू नगरसेवक काम करत नाही ही मेसेज बाहेर जाणे योग्य नाही. सोशल मिडीयावर त्यांनी टाकले की नगरसेवक काय काम करतात. त्यांनी समोर येवून सांगावे की, ते काय काम करतात. नगरसेवकाच्या कामावर त्यांना प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकारी नाही सर्व सभासदाची मागणी आहे की, त्याच्यावर शिस्तभंगाची कडक कार्यवाही करण्यात यावी. |
| **अब्दुल सत्तार** | सोशल मीडीयावर गजभारे यांनी बातमी टाकली आहे. आपण ज्या संस्थेत काम करतो. त्या संस्थेतील कर्मचा-याने अशी पोस्ट करणे चुक आहे. सर्व नगरसेवक त्यांच्या पाठीशी होते. सोशल मीडीयावर बातम्या टाकावयाचे असतील तर नौकरीचा राजीनामा दयावा. आणि पोस्ट करीत जावे. त्याला सवय पडली आहे. महापौराला जाब विचाराणार असे पत्र दिले होते. महापौराला जाब विचारणार काय. त्याला निलबिंत करावे. महापौर मॅडम आपण रुलींग दयावी. आयुक्तांने कार्यवाही केली नाहीतर आपण आयुक्तांवर कार्यवाही करु. आमच्या विषयावर अमंलबजावणी केली नाही तर त्यांच्यावर कार्यवाही करु. त्याला मुळ पदावर पाठवून दयावे. |
| **बाळासाहेब देशमुख** | ज्या कर्मचा-यांने नगरसेवकाबाबत सोशल मीडीयावर लिहीले आहे त्या कर्मचा-यारी प्रथम निषेध व्यक्त करतो. एखादा नगरसेवक त्याच्या वार्डाच्या समस्या घेवून मा. आयुक्ता कडे जातो. त्यावेळी अधिका-याच्या भावना दुखावल्या जातात. थेट तो पोलीस स्टेशन जातो. आणि शासकिय कामात अडथळा निर्माण केला म्हणून 353 चा गुन्हा दाखल करतो. हा अपमान नगरसेवकाचा नसुन मा. सभागृह नगरसेवक म्हणुन पाठवलेल्या 15 हजार जनतेचा अपमान आहे. आमची मानहानी करणे आमचे वर्तन खराब करणे हे योग्य नाही. हा अधिकार कोणी दिला त्याला तो अधिकार नसताना सोशल मीडीयावर त्यांने नगरसेवकाचा अपमान केला आहे. त्यामुळे सायबर क्राईम व्दारे गुन्हा दाखल करावा. कायदयाच्या तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करावी. आताचे आता रुलींग देवून त्याच्यावर कार्यवाही करावी. |

**आयुक्त** — मा. महापौर यांच्या परवानगीने आता जो कर्मचा-याचा विषय  या सभे मध्ये कर्मचारी यांच्याबाबत जास्त चर्चा होत असतांना दिसत आहे. अधिका-याने लक्षात घेतले पाहीजे.  महानगरपालिके मध्ये रथाचे दोन चाके असतात. त्या पध्दतीने अधिकरी व कर्मचारी हे दोन चाके आहेत. शहराच्या विकासासाठी अधिकारी/कर्मचारी व नगरसेवक यांना एकत्र येवून काम केले पाहिजे. जेणे करुन शहराचा विकास होईल. सर्वांनी मिळून कामे केले पाहीजे. सोशल मीडीयावर जाणे अधिकारी  यांनी जाते अभिप्रेत नाही. आपण जी आता तक्रार दिली आहे. त्याची 30 दिवसाचे आंत चौकशी करुन दोषी आढळल्यास शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**विरोधी पक्ष नेता** — ज्या कर्मचा-याला तात्काळ निलबिंत करावे अशी जास्त मागणी आहे. त्याची चुक नसेल तर त्याला तात्काळ  कामावर आणा त्याला प्रथमताः निलविंब करावे त्याची चौकशी नंतर करावे.

**दिपकसिंह रावत** — तुम्ही आमचे एकले पाहिजे. आम्ही तुमचे एकले पाहीजे. आम्ही सर्वपक्षीय नगरसेवक आपल्याकडे आलो होतो.  एका कर्मचा-याने सोशल मीडीयावर आक्षेपार्ह विधान केले आहे. तुमच्याकडे लेखी आहे. आपल्या मार्फत शिस्तभंग विषयक कार्यवाही करणार किंवा नाही हे आम्हाला सांगावे. बाकी आम्ही पाहुन घेवू. चौकशी करा. शिस्तभंगाची कार्यवाही करणार कि नाही फक्त सांगा.

**आयुक्त** — दोषी आढळल्यास निश्चीत कार्यवाही करण्यात येईल.

**विनय गिरडे** — सभेची अहवेलना केली आहे.

**महापौर** — सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता. श्री विलास गजभारे यांनी दुस-यांदा चुक केलेली आहे त्यांनी यापुर्वी सुध्दा चुक केलेली आहे त्यांनी महापौरांना जाब विचारतो. एखादा कर्मचारी त्याच्या कार्यकक्षेच्या बाहेर जावून काम करीत असेल तर त्याच्यावर तात्काळ कार्यवाही केली पाहीजे. जेणे करुन यापुढे कोणताही कर्मचारी गंभीर गुन्हा करणार नाही हीमंत दाखवणार नाही.  आयुक्त साहेब म्हणतात की, कर्मचारी यांनी विश्वासात घेवून काम करावे. या बाबीशी मी सहमत आहे. कर्मचारी यांनी चुका केल्यातर त्यांना पाठीशी घालावे. या कर्मचा-यांनी कर्मचारी आचारसंहीतेचे उल्लघंन केलेले आहे. या कर्मचा-यास दिलेले काम कमी पडत असेल म्हणुन त्याला इतर गोष्टी करण्यास तयार आहे. म्हणुन हा कर्मचारी दोषी आढळल्यामुळे त्यांच्यावर MCSR Rule अंतर्गत तात्काळ कार्यवाही करावी. ही सभा संपल्यानंतर त्याची चौकशी करावी. त्याला तात्काळ निलबिंत करावे.

**आनंद चव्हाण** — किती दिवसात कार्यवाही करणार आहात हे सांगावे.

**बाळासाहेब देशमुख** — चार दिवसापुर्वी लेखी पुरावे दिलेले असतांना त्याची चौकशी करुन कार्यवाही करता येते. अर्धातास वेळ देवून चौकशी करावी. आताचे आता निलबिंत करावे.

**अशोक उमरेकर** — तात्काळ निलबिंत करावे. नंतर चौकशी करा. चौकशीत दोषी न आढळल्यास त्यांना सन्मानाने कामावर रुजू करुन घ्यावे. प्रथम निलबिंत करावे.

**महापौर** — आजच्या विषय पत्रीकेमध्ये अत्यंत महत्वाचे विषय आहेत. त्यांच्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**विनय गुर्रम** — कोणी जर आपल्या संदर्भात बोलत असेल तर त्याच्या बाबत आपण कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्ही बोलू नये काय हे सांगावे. तुम्ही आमचे प्रतिनिधी आहात. आमच्याबाबत बोलले पाहिजे. आपण काय कार्यवाही करणार हे सांगावे.

**महापौर** — सर्व कागदपत्र मी स्वतः पाहीले आहे. आजची ही सभा संपल्यानंतर आयुक्तांनी तात्काळ निलंबीत करावे नंतर चौकशी करावे.

**दिपकसिंघ रावत** — त्या कर्मचा-याला एलबीटी विभागातुन इतर वसुली विभागात वसुली करण्यासाठी पाठवावे. कारण वसुली विभागाची वसुली ही तीन कोटी रुपये झालेली आहे. त्या ठिकाणी या कर्मचा-यास वसुलीसाठी पाठवावे. हा कर्मचारी एवढा सक्षम असेल तर त्याला वसुलीमध्ये टाकावे. मा.महापौरांनी तर रुलींग दिलेली आहे.

**विरोधी पक्षनेता** — माझा एक विषय राहीलेला आहे. तो म्हणजे जमीन घोटाळयाबाबतचा विषय आहे. त्याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** — जमिनी बाबतच्या विषयामध्ये मागच्या महिण्यामध्ये हेरींग ठेवण्यात आलेली होती. परंतू ते त्या हेरींगला उपस्थित राहीले नाहीत.  या महिण्यामध्ये पुन्हा हेरींग करीता पत्र देण्यात येईल. आवश्यकती कार्यवाही पुढच्या सभेच्या पुर्वी करण्यात येईल.

**विरोधी पक्षनेता** — मा. महापौर साहेबां आपल्या सर्वसाधारण सभेची मीटींग ही सव्वा महिना दिड महिन्याला होत आहे. पुढच्या सभेपर्यत अहवाल येणार असेल तर काय उपयोग. आता कार्यवाही केली पाहिजे. अर्जदार मी आहे. तक्रार मी केली आहे.  मला कधी दोन ओळीचे पत्र दिले काय ?  का मला कळविले नाही ? हे सांगावे. लेखी पत्राने मला का कळविले नाही. आपल्या मनपाच्या खुप मालमत्ता आहेत त्या मालमत्ता ज्या पध्दतीने रजिष्ट्री करुन दिली आहे त्याच पध्दतीने रजीष्ट्री करुन दयावी नाहीतरी आपली मनपा डबगाईला आलेली आहे. जर या मा. आयुक्त साहेबांची बदली झाली तर येणा-या दुस-या आयुक्ताकडे पहीले पासुन पाढे वाचवायचे काय हे सांगावे. केवळ टाईम मारुन नेन्याचा प्रयत्न आहे मी लेखी पुरावे दिलेले आहे. त्यावर का कार्यवाही होत नाही याचा खुलासा करावा. आपण मा. आयुक्त साहेब आपण 15 दिवसात कार्यवाही करतो परंतू आता दिड महिना होवुन गेला आहे त्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही.

तक्रारधारकास पण आपण कोणतीही माहिती देत नाही. आम्ही अशी-अशी कार्यवाही करीत आहोत म्हणुन आपण लेखी सुध्दा देत नाही. प्रशासनाचे असे म्हणणे झाले आहे की आबो चोरो बांधो भारा अधा तुम्हारा अधा हमारा अशी प्रशासनाची गत आहे, माझे असे मत आहे. त्या संबधीतास आयुक्त पाठीशी घालत आहे. आपल्या अधिका-यांने रजिष्ट्रीवर सही केली आहे त्यांच्यावर कार्यवाही का होत नाही त्यांच्यावर गुन्हा दाखल का होत नाही. काय कारण आहे. याचा खुलासा करावा.

**दिपकसिंह रावत** मागील मिटींग पासुन श्री खेडकर विरोधी पक्षनेता हे या विषयावर बोलत आहेत पण संबधीतावर का कार्यवाही करत नाही, त्यांना तात्काळ निलबिंत करावे. ज्या कर्मचा-याचे हित ज्या मनपाच्या मालमत्तेशी संबधीत आहे त्या कर्मचारी यांच्यावर कार्यवाही केली पाहीजे. त्यानी काम केले असेल. त्यांची सही आहे. माझी सभागृहाला विनंती आहे, आमची मागणी आहे कमल 59 (1) प्रमाणे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. तो अधिकार आपणास शासनाने दिलेला आहे. तो अधिकार आपणास आहे. या संविधानाने दिलेला आहे. तो अधिकार आपण वापरला पाहीजे, अशी आमची मागणी आहे.

**अशोक उमरेकर** मनपाची अकरा एकर जागा हरवली आहे. ही जागा असदुल्लाबाद येथील आहे. ही जागा कोठे हरवली आहे हे सांगावे. ही अकरा एकर जागा मनपाची आहे आपण आता पंतप्रधान आवाज योजने अंतर्गत भाडे करुना घरे देणार आहोत ही घरे देण्यासाठी या जागेची आपणास गरज पडणार आहे. जी जागा विमानतळाची आहे. याची पुर्ण चौकशी करण्यात यावी. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. अशी आमची मागणी आहे.

**आयुक्त** आपण जागा चोरी गेली आहे, असे म्हणणे काही योग्य नाही. तरीही सुध्दा या अकरा एकर जागेबाबत निश्चीत चौकशी करतो. ती जागा मनपाची असेल तर जागा ताब्यात घेण्यात येईल.

**अशोक उमरेकर** ही अकरा एकर जागा गेली आहे असे सांगत आहे. गरीब लोकांसाठी या जागेवर घरे बांधून देवून त्यांना सहारा होईल. तर या जागेबाबतची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आहे.

**हबीब बागवान** मा. महापौर साहीबा, आम्ही आपणास ब्रम्हपूरीचा विषय घेतला आहे. त्या ब्रम्हपुरी भागाची कामे का करण्यात येत नाही हे सांगावे.

**विरोधी पक्षनेता** जमीन घोटाळयाचा विषय आहे. त्याचा सर्वात अगोदर खुलासा होवू दयावा मा. महापौर मॅडम अशी माझी विनंती आहे. मी जो प्रश्न मांडला आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** मी मागच्या वेळी त्यांना सुनावणीची तारीख्र दिली होती त्या तारखेला ते उपस्थित नव्हते. त्यांना या महीण्यात दुसरी तारीख देवून बोलावण्यात येईल. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**विरोधी पक्षनेता** आताच श्री दिपससिंघ रावत यांनी सांगीतल्या प्रमाणे कलम 59 (1) प्रमाणे कार्यवाही आपणास करता येते. ती कार्यवाही आपण करावी. या प्रकरणात आपणास शासनाचे पत्र आले आहे त्या पत्रानुसार काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती देण्यात यावी. शासनाला देखील आपण अहवाल सादर केला नाही. शासनाने अहवाल देण्यास आपणास सांगीतले आहे. त्या प्रकरणात शासनास अहवाल दिला काय दिला असल्यास काय दिला तो आम्हाला सांगावे.

**अशोक उमरेकर** आपण दोन महानगरपालिकेचे कामकाज केलेले आहे. आपण उडवा उडवीचे उत्तरे देवू नये. मागच्या सर्वसाधारण सभेमध्ये देखील आपण असेच उतर दिले आहे.

**दिपकसिंह रावत** मी तर मागच्या बैठकीत नव्हतो त्या बैठकीत सुध्दा हा प्रश्न विचारण्यात आला होता असे सांगण्यात आले मा. आयुक्त साहेब आतापर्यत आपण कार्यवाही करण्यात आली नाही. आपण त्या संबधीत अधिकारी यांनी जी रजिष्ट्री करुन दिली आहे त्या मालमत्ता व्यवस्थापकावर का कार्यवाही केली नाही याचा खुलासा करण्यात यावा. आपण उल्हासनगर महानगरपालिकेत काम केले आहे त्या महापालिकेत आपली आम्ही माहिती घेतली आहे. त्या ठिकाणी जी कार्यवाही आपण काम केले आहे तसे या मनपाकेत आपण काम करावे अशी आमची इच्छा आहे. त्या ठिकाणी जसा रंगरुप होता त्यापध्दतीने आपला रंगरुप राहणार काय हे सांगावे. मालमता अधिकारी यांच्यावर काय कार्यवाही करणार हे सांगावे. आपण ज्या अधिका-याने चुक केली त्या अधिका-याला बोलावले कि ज्या अधिकारी यांनी जागा करुन दिली त्या अधिका-यांस बोलावले हे सांगावे. हे सभागृहास माहित होवू दयावे.

**विरोधी पक्षनेता** आम्ही दोन महीण्यापासुन या विषयावर बोलत आहोत त्यात कार्यवाही होत नाही तर आम्ही रिट पिटीशन दाखल करावे काय हे सांगा मा. महापौर साहेब. आठ दिवसात आपली बदली झाली तर आम्ही पुन्हा हा विषय दुस-या आयुक्ता समोर घेवून जावे लागणार आहे. त्यासाठी आता कार्यवाही करावी. एका महिण्यात काय कार्यवाही केले आहे सांगावे.

**बाळासाहेब देशमुख** आताचे आता त्या अधिका-याला निलबिंत करावे त्यानंतर चौकशी करीत जावे. प्रथम निलबिंत करावे. मा.आयुक्त साहेब मा. महापौर हे पिठासन अधिकारी आहेत आणि मा. महापौर यांनी रुलींग दिलेली आहे त्यांनी रुलींग दिल्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी. मा. महापौर यांनी रुलिंग दिली असल्यामुळे ते आपणास कार्यवाही करण्यास बंधनकारक आहे. आम्हाला या बैठकीमध्ये कोणतेही उडवा उडविचे उत्तर नको. एकादया नगरसेवकाने काम घेवून गेले तर त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करण्यात तयार आहात. जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. जनतेची मालमत्ता आहे. विक्री करणा-यावर कार्यवाही करीत नाही तर तुम्ही मनपा विक्री करुन टाका ना.

| | |
|---|---|
| **दिपकसिंघ रावत** | आम्ही या सभागृहाचे सभासद आहोत. आपण काय कार्यवाही करीत आहात त्याबाबतची माहिती आम्हाला झाली पाहीजे. |
| **महापौर** | आपणास दिलेली वेळ संपला असल्याने आपण आपल्या जागेवर बसावे. |
| **अशोक उमरेकर** | मा. महापौर मॅडम, आम्हाला माहित आहे की, आमची वेळ संपलेली आहे. या वेळेमध्ये आम्हास प्रश्नाचे उत्तर मीळाले नाही त्याचे काय अगोदर उत्तर देण्यात यावे. |
| **महापौर** | यापुर्वी या अधिका-यावर कार्यवाहीचे आदेश दिलेले आहेत. सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता मा. आयुक्तांनी या प्रकरणात जो अधिकारी दोषी आहे त्या अधिका-यावर कार्यवाही करण्यात यावी. जे जे अधिकारी दोषी आढळलेले आहेत त्या अधिका-यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुद व MCSR अंतर्गत सुध्दा कार्यवाही करावी. आयुक्तांनी जी-जी कार्यवाही केलेली आहे त्या बाबत स. सदस्यांना कळवावी. |
| **हबीब बागवान** | मा. महापौर मॅडम, ब्रम्हपुरी भागात काम करण्यात येत नाहीत, आम्ही पत्र देवून सुध्दा माहिती मागीतली होती त्याबाबतची का कार्यवाही करण्यात आली नाही याचा खुलासा करण्यात यावा. |
| **आयुक्त** | ब्रम्हपुरी या भागाची मी पहाणी केली आहे. त्या भागातील कामे शिल्लक राहीलेली आहेत ही कामे निधी अभावि शिल्लक राहीलेले आहेत. ही कामे पुर्ण करण्यासाठी आम्ही नियोजन करीत आहोत ती कामे कशी पुर्ण करता येतील यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. जसा निधी उपलब्ध होत जाईल त्या नुसार कामे चालू करण्यात येतील. जर या विषयाला मान्यता घेण्याची आवश्यता असल्यास आम्ही स्थायी समितीची मान्यता घेण्यात येईल. जे काम शिल्लक राहीले आहे त्या कामाची सुरुवात केली जाईल. लोकवर्गणी वसुल होण्याचे शिल्लक राहीले आहे. तो निधी देखील गोळा करण्यात येईल. जे अर्धवट राहीलेले काम आहे ते काम तातडीने चालू करण्यात येईल. |
| **हबीब बागवान** | आम्ही आपणास पत्र दिले होते त्या नुसार का काम चालू केले नाही हे सांगावे. विशेष म्हणजे इतर शिर्षकामध्ये निधी वळविण्यात आला आहे. तो निधी का वळविण्यात आला आहे हे सांगावे. पंधे या कंत्राटदारा सोबत आपले काय प्रेमाचे नाते आहे. हे आम्हाला कळत नाही त्यांना दंड लावला पाहीजे होता. आपण स्थळपाहणी ला आले तेंव्हा त्या ठिकाणी आमदार, महापौर, माजी महापौर हे त्या साईटवर आले असता आपण त्या ठिकाणी या मान्यवरा सोबत थांबले नाही त्या भागातील काय प्रश्न आहेत हे जाणून घेतले नाही. त्या भागातुन आपण निघुन गेले. काय आपणास या भागातील लोकांच्या कामे करुन दयावयाची नाही काय हे सांगा ? आमचा वार्ड काय लावारीस आहे काय हे सांगावे. |
| | **अचानक गोंधळ चालु होता.** |
| | **( श्री अ. हबीब अ. रहीम बागवान, आसीया बेगम अ. हबीब बागवान, बिपाशा बेगम वलीयोदीन या नगरसेवकांनी स्वता:च्या अंगावर रॉकेल टाकुन घेतले जाळून घेण्याचा प्रयत्न केला कांही नगरसेवकांनी मध्यस्ती करुन हा प्रकार हाणून पाडला )** |
| **महापौर** | सदरची सभा 15 मिनिटासाठी ११.४९ वाजल्या पासुन तहकुब करण्यात येते. |
| **महापौर** | पुर्ववत सभेचे कामकाज वेळ 11.48 वाजता 15 मिनिटासाठी सभा तहकुब केलेली सभा ही 12.03 मिनिटानी सुरु करण्यात येत आहे. |
| | सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात आले. |
| **हबीब बागवान** | ब्रम्हपुरीचे कामे केंव्हा सुरु करणार याबाबतचा मला खुलासा दयावा. |
| **अब्दुल सत्तार** | मा. महापौर मॅडम, आमचे जे एमआयएमचे नगरसेवक आहेत त्यांनी जो ब्रम्हपुरीचा विषय मांडला आहे. त्या विषयास आमचा पुर्ण सभागृहाचा पाठींबा आहे. आम्हाला सांगा या भागाचा विकास करण्यासाठी शासनाने 95 कोटी रुपयाचा निधी दिला होता. तो निधी गेला कोठे. त्या निधीमधुन या भागाचा विकास करावयास पाहीजे होता. तो विकास झालेला नाही. या भागातील नागरीक नगरसेवकाच्या घरी जावून बसत आहेत. त्यांच्या घरावर हल्ला करण्यासाठी जात आहेत. महापौर, उपमहापौर आले होते त्यावेळी काम करतो असे म्हणाले होते. आणि आता आपण म्हणता की, पैसे आल्यानंतर काम करतो असे उत्तर देणे हे योग्य नाही. मा. आयुक्त साहेब आम्ही आपणास दोष देत नाही. काही अधिकारी यांनी चुकीचे काम केले आहे. त्या भागातील आतापर्यंत 75 कोटीचा निधी खर्च झाला आहे त्या रु 75 कोटीच्या निधीचे कामे दिसुन येत नाही. या भागाची कामे करण्यासाठी आपणास सांगण्यात आले होते त्या निवेदनावर उप महापौराची स्वाक्षरी आहे. त्यांच्या सहीची काही आपणास काही किंमत आहे किंवा नाही हे सांगावे. शासनाने आपणास काम करण्यासाठी पाठविले आहे मग आपण कामे केली पाहीजे. ज्या ठिकाणी कॉंग्रेसची सता आहे काय काम होत आहे हे सांगावे. कर्मचारी यांचे वेतन वेळेवर होत आहे. पण आमचे कामे होत नाही आता विरोधी पक्षनेता यांनी सांगीतल्याप्रमाणे एक गाडी मुरुम टाकला जात नाही. आम्हाला लोकांनी निवडून दिले आहे. आम्हाला सांगा कामे केंव्हा सुरु करणार आहेत. या भागातील लोकांची काय अवस्था आहे हे महापौरांनी पाहिलेले आहे. त्या भागातील ड्रेनेजची लाईन का जोडण्यात आलेली नाही याचा खुलासा करावा. |

**स.सरजितसिंघ गिल** ब्रम्हपुरी एरीयातील कामे झालेली नाही. मा.उप महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आपणास निवेदन दिले होते त्या निवेदन स्विकारतांना आपण आश्वासन दिले होते की, तात्काळ काम सुरु करतो. परंतू आता आपण सभागृहात म्हणत आहात की, निधी गोळा झाल्यावर काम सुरु करतो. आपण हे बघु ते बघु असेच उत्तर देता आपण काम करण्यासाठी बसले आहात. त्या भागामध्ये आमदार येतो त्या वेळी आपण त्या ठिकाणी न थांबता त्या ठिकाणावरुन निघुन जाता. आपण आमदारांचा अपमान केला आहे त्यामुळे हे सभागृह आपला निषेध करते, धिक्कार करते. एक महिला नगरसेविका अंगावर रॉकेल टाकुन घेते तर त्यांची काय परीस्थिती आहे, त्या वार्डाची काय परिस्थिती असेल. याचा विचार करा. मा. डॉ. मनमोहनसिंघजीने पैसा दिला आहे. महाराष्ट्र शासनाने पैसा दिलेला आहे. दिलेला पैसा आपण खर्च करीत नसाल तर आपण अपूरे पडत आहात. ज्या अधिकारी यांची चुक आहे त्यांच्यावर काय कार्यवाही करावयाची ती कार्यवाही करावी. ड्रेनेजच्या लाईन जोडण्यात यावी. ती लाईन का जोडण्यात आली नाही आणि पंधे कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात यावी त्या कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात आली नाही. आज ही जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती केवळ प्रशासनामुळे झालेली आहे. तसेच अबचलनगर भागातील भारत सरकारने 37 कोटी रुपयाचा निधी दिला होता त्या निधीतुन चिनीमातीची ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. आणि याठिकाणी प्लॉस्टीकची लाईन टाकण्यात आली काय मुसलमानांचा व शिखांचा दुजाभाव प्रशासन करते काय हे सांगावे. याचा मी या ठिकाणी प्रशासनाचा धिकार निषेध करतो. आणि अबचलनगर व ब्रम्हपूरीचे काम तात्काळ सुरु करावे अन्यथा पुढील होणा-या परिनामास तयार रहावे. श्री दिपकसिंह रावत हे विरोधी पक्षनेता होते तेव्हा एक कोटीचा निधी अबचलनगरमधील ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तरतुद ठेवण्यात आली होती. परंतू काम झालेले नाही. शासनाने काम करण्यासाठी आपणास पाठविले आहे त्यासाठी आमची कामे केली पाहिजे. आपण महापौर असो आमदार, नगरसेवक असो यांचा मान सन्मान ठेवला पाहीजे पळवाट करुन चालणार नाही. आपण पळवाट केली आहे त्यामुळे आपला निषेध करण्यात येते.

**विरोधी पक्षनेता** आमच्याकडे शहरातील नागरीक तक्रार घेवून येतात. माझ्याकडे ब्रम्हपुरी एरीयाचे नागरीक तक्रार घेवून आले होते कारण मि विरोधी पक्षनेता असल्यामुळे आले होते. त्यांच्या एरीयाची कामे चालू करणे आवश्यक होते तुम्ही जनतेचे नौकर आहात आपणास आमच्या करातुन आपला पगार होत असते. त्या पगारीतुन तुमची उपजिवीका होत असते. त्यासाठी आपण एमआयएमचे नगरसेवक असो कि कोणत्याही पक्षाचे नगरसेवक असो तुम्ही कामे केली पाहीजे. त्यांचे काम का होत नाही. ब्रम्हपुरीचा विषय श्री खोडवेकर साहेब असतांना देखील ते विषय मांडत होते मग त्या एरीयासाठी आलेले पैसे गेले कोठे याचा खुलासा करण्यात यावा. पैसे आले की काम करु असे म्हणता. लोकांचे कामे झाले नाही की असा सभागृहात प्रकार होतो. कारण नागरीक त्या नगरसेवकांच्या घरी जात असतात. तुम्ही काम का करत नाही. आपणास निवेदन दिले तेंव्हा आपण आठ दिवसात काम करतो असे म्हणाले होते. पण काम काही झाले नाही. प्रशासन हे निकामी झालेला आहे. नागरीकांचे कामे झाले पाहीजे.

**दिपकसिंह रावत** नगरसेवक हे कोणत्या पक्षात आहेत पण त्यापेक्षा मानुसकी म्हणुन विचार केला तर त्यांच्या ब्रम्हपुरी प्रभागातील कामे करणे गरजेचे होते. कारण त्यांच्यावर आलेली ही वेळ योग्य नाही. ब्रम्हपुरीचा निधी रु 92 कोटीचा निधी गेला कोठे. याचा खुलासा करावा. संबधीत अधिका-यांला समोर उभे करुन उत्तर दिले पाहिजे. त्या अधिका-यावर कडक कार्यवाही केली पाहीजे. नागरीकांना तुम्ही मुलभुत सुविधा पुरवू शकत नाही. एक महिला नगरसेविकेला अंगावर रॉकेल टाकुन घेण्याची वेळ का आली. ही वेळ दुस-या इतर पक्षाच्या नगरसेवकावर सुध्दा येवू शकते. मा. आयुक्त साहेब, तुम्ही म्हणता की माझी सकारात्मक भुमिका आहे. संबधीत अधिका-याला सभागृहात खुलासा करण्यासाठी का सांगत नाही. आम्ही सभागृहात बोलतो म्हणजे अंमलबजावणी झाली पाहीजे. प्रशासन मोरेश्वरला दोन कोटी रुपये देते. आणि पंदेला देखील 4 कोटी रुपये देते. हे पैसे कोठुन आले. व्याज माफ करता. स्थाई समितीचा ठराव विखंडीत करता आला असता. तरी प्रशासनाने पैसे दिलेले आहे. पैसे नाही म्हणता. मग हे पैसे आले काठून. आम्ही बोलावे आणि आपण त्याची अमंलबजावणी का करु नये. मीटींग घेवू नका. माझी सभागृहाला विनंती आहे की, प्रशासनाचे सर्व विषय बाजूला ठेवून दयावे. आणि इतर अजेन्डा पास करावा जो पर्यत ब्रम्हपुरीचे काम चालू होत नाही तोपर्यत एकही विषय प्रशासनाचा पास करण्यात येवू नये अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**बावजीर(गटनेताएमआयएम)** ध्यन्यवाद सर आपण आमच्या विषयाला पाठींबा दिल्या बाबत. आपले या सभागृहात अभिनंदन करतो.

**डॉ. करुणा जमदाडे** आज जो सभागृहात एका महिलेने अंगावर रॉकेल टाकुन घेतले आहे ही बाब अत्यंत खेद जनक आहे. ही वेळ केवळ प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे आलेली आहे.आम्ही सर्व महिला मिळुन प्रशासनाचा या ठिकाणी धिकार करतो. हा एकटया ब्रम्हपुरीचा विषय नसुन इतर सर्व शहरातील प्रभागात हा विषय आहे. जेएनएनयुआरएमची सिडको एरीयामधील ड्रेनेजची 53 कोटीची योजना आहे. ही योजना सुरु होवून चार वर्ष पुर्ण झालेले आहे तरी काम काही पुर्ण होत नाही. हा विषय अत्यंत गंभीर विषय आहे. या एरीयातील जेएनएनयुआरएममधील कामे सुरु झाली पाहीजे.

**सौ. ललिता बोकारे** या सभागृहामध्ये एका महीलेने अंगावर रॉकेल टाकुन घेतले त्यामुळे या ठिकाणी मी प्रशासनाचा निषेध करते.

**अभिषेक सौदे** सर्व सभागृह हे ब्रम्हपुरीचे कामे झाली पाहीजे यासाठी सोबत आहे. आताच डॉ. जमदाडे व बोकारे मॅडम यांनी जो विषय सिडकोचा मांडला आहे त्यापण एरीयातील प्रश्न हा अत्यंत गंभीर आहे. ब्रम्हपुरी एरीयाचे कामे झाले पाहिजे यासाठी सर्व पक्षीय सदस्य हे निवेदन देतात. त्यावर कार्यवाही होत नाही हे योग्य नाही. सर्व सभागृह या विषयावर एक आहे. आपण नविन आहात पण आपण नगरविकास विभागात काम करुन आले आहात त्यामुळे कामे कशी करावी याचा चांगला अनुभव आहे. कामे काठे करावी लागते. गरीब वस्ती कोठे आहे ही माहिती आहे. मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्री हे चांगल्या योजना आनित आहेत. सर्वासाठी घरे ही योजना शासनाने आणली आहे. ही योजना गरीब लोकांसाठी आणलेली आहे. शासन हे मोठ मोठया योजना आनित आहे आणि नांदेड शहरात काय चालू आहे. शहरातील लोकांना चिखलातून येणे जाणे करावे लागत आहे. वाघाळा, सिडको एरीयात येवून पहावे. आमच्या एरीयामध्ये कोणही स्वच्छतेसाठी येत नाही. त्या लोकांच्या पगारी होत नाही. ते ऑफिसला येतात. त्यांच्याबाबत पहावे. सर्व नगरसेवकाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांना आज रॉकेल टाकुन घेतले आहे. उदया आम्हाला जाळुन घ्यावे लागेल. जनतेचा दबाव असणार आहे. जनतेच्या भावना आपण समजून घेतल्या पाहीजे. महापौर मॅडम आपण जनतेचे प्रतिनिधी आहात त्यांच्या भावना ऐकुन घेतल्या पाहीजे. शहराचे प्रथम नागरीक आहात. आपले कर्तव्य आहे शहरातील नागरीकांना मुलभुत सोयी सुविधा पुरवील्या पाहीजे याबाबत आपण रुलींग दयावी अशी आपणास विनंती आहे.

**बाळासाहेब देशमुख** आज सभागृहात मन हेलावून घेवून जाण्याचा विषय झाला आहे. पक्ष कोणताही असो. ते नगरसेवक आहेत. म्हणुन आम्ही ब्रम्हपुरीच्या विषयावर त्यांच्या सोबत आहोत. मा. आयुक्त आपण मंत्रालयात चांगले काम केलेले आहे. त्या एरीयाचा विकास होण्यासाठी डीपीआर तयार होत असतो. ब्रम्हपुरीचा डीपीआर तयार केला आणि त्यासाठी निधी राखीव करण्यात आला. तो एरीया आता सुजलाम सुफलाम झाला पाहिजे होता. मग तो निधी आम्ही गेला कोठे याचा खुलासा करावा. ज्या अधिका-याला ही बीएसयुपीचे कामे करण्यासाठी नियुक्ती केली होती त्यांनी का कामे करुन घेतली नाही त्यांनी कामे करुन घेतली नसल्यामुळे संबधीत अधिका-याला तात्काळ निलबिंत करावे. त्याला कारणे दाखवा नोटीस दिली पाहिजे. आमच्या माता भगीनी या अंगावर रॉकेल टाकुन आत्मदहन करण्याचा प्रयत्न करतात. या भगीनीने अंगावर रॉकेल टाकुन घेवून प्रशासनास जागे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेष बाब म्हणुन आपणास विचाराणा करतो की, डीपीआर 10 मध्ये पैसे कीती आले आणि कीती रक्कम खर्च झालेले आहे. याची मला माहिती पाहिजे. ब्रम्हपुरीचा पैसा इतर डीपीआरमध्ये वळविला आहे यासाठी शासनाची मान्यता आहे काय. रक्कम वळविण्यासाठी सभागृहात हा विषय आणला काय. कोण आयुक्त होते. त्यांच्यावर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे. जर आज एखादी दुर्घटना घडली असली तर त्याचा काय परिनाम झाला असता. सर्व देशाला, महाराष्ट्राला आम्हाला उत्तर दयावे लागले असते. तुमचे काय झाले असते. आमच्या भगीनीवर वेळ आली आहे. उदया आमच्यावर वेळ येणार आहे. मा. महापौर आपण एक पिठासन अधिकारी आहात. महीला महापौर आहात या सभागृहात अशी वेळ येणे चुक आहे. सभागृहात महीला अंगावर रॉकेल टाकुन घेते ही गोष्ट चांगली नाही. डीपीआर 10 मधील रक्कम किती खर्च झाली आणि ती कोणत्या जागेवरील कामे करण्यासाठी वळविण्यात आली. याचा खुलासा करण्यात यावा. या डीपीआर मधील आजही कामे शिल्लक आहेत लोक आमच्या घरी येतात. आंदोलने करतात. आम्ही काय करावे. लोक आम्हाला वार्डात आम्हाला फिरवतात. डीपीआरनुसार कामे केली नाही. शासनाचा अवमान केला आहे. मी डीपीआरची माहिती मागविली आहे ती माहिती सुध्दा देण्यात आलेली नाही. काय यात भ्रष्टाचार झाला आहे ही शंका येत आहे. भुखंड लाटणा-या अधिका-यावर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे. बीएसयुपीचा निधी खाना-या अधिका-यावर देखील कार्यवाही झाली पाहिजे. याचा आम्हाला खुलासा पाहीजे.

**आनंद चव्हाण** मा.महापौर, आयुक्त, पदाधिकारी या एरीयात जावून पाहणी करतात. आणि त्यावर काम सुरु होत नाही. त्या नागरीकांनी जावे कोठे त्यांना खुप त्रास सहन करावा लागत आहे. आम्ही सर्व पक्षीय निवेदन घेवून आलो होतो. आणि आपण आठ दिवसात कार्यवाही करतो असे म्हणाले होते. ड्रेनेज लाईनची जोडणी करण्याचे काम सुरु करतो असे आश्वासन दिले होते परंतू आपण ते काम अदयापपर्यंत चालू केले नाही. ब्रम्हपुरीच्या लोकांना दिलासा देण्यासाठी ड्रेनेज लाईनची जोडणी करावी. त्या लोकांच्या समस्या सोडविण्यात यावे.

**गोंधळ चालू होता.**

**बावजीर शेख हबीब** ब्रम्हपुरीच्या विषयावर कॉंग्रस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, भाजपा, सर्व पक्षातील नगरसेवकांनी त्यांनी पाठींबा दाखविला आणि सभागृहात एक मताने ब्रम्हपुरीचे कामे पुर्ण करण्यात यावी अशी मागणी केली आहे त्यामुळे मी सर्व सभासदाचे आभार मानतो. आणि त्यांचे स्वागत करतो. कारण त्यांची सर्वाची इच्छा आहे की ब्रम्हपुरी एरीयातील कामे पुर्ण झाली पाहिजे. या विषयावर प्रशासनाकडून काहिही

प्रतीसाद मिळत नाही. आमचे नगर सेवक आत्मदहन करीत आहेत त्यांची आम्ही जिव वाचविला आहे. आयुक्तां तथा प्रशासना मार्फत नागरी मुलभूत सुविधेचे कामे करीत नसेल तर मी नगरसचिवांना सुचित करतो की, जर भविष्यात नगरसेवकांने आत्मदहनाची वेळ येवु देवुन नये तशी वेळ आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आयुक्त तथा प्रशासनावर राहील याची नोंद नगरसचिव व महापौर यांनी घ्यावी. या ठिकाणी मिटींग लावण्यात येते आणि त्यावर काहीही अमंलबजावणी होणार नसेल तर काय उपयोग आहे. केवळ मिटींगा घेण्यात येतात काम काही होत नाही. काय अर्थ आहे मिटींगा घेण्याचा. मनपाची वसुली होत नाही काय, इतर प्रभागातील आपण कामे थांबविले आहे काय. याचा खुलासा करण्यात यावा. ब्रम्हपुरी भाग हा मुस्लीम बहुल क्षेत्र असल्यामुळे कामे जानिवपुर्वक करण्यात येत नाही काय याचा खुलासा करावा.

**स. शेर अली** मी सर्व सभागृहाचे अभिनंदन करतो की, सर्व पक्षीय सभासदाने ब्रम्हपुरी एरीयातील विकासाची कामे पुर्ण करण्यासाठी एकमताने आम्हाला साथ दिली आहे. विकासाच्या कामासाठी सभागृह हे एक आहे. ब्रम्हपुरी भागातील इन्फ्राची कामे पुर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. डीपीआरची तयार करण्यात येतो त्या डिपीआरनुसार त्या एरीयाचा घराच्या कामासोबत त्या एरीयातील इन्फ्राची कामे करण्यात येतात. या एरीयातील किती घराचे काम झाले आणि किती इन्फ्राची कामे करण्यात आली आहेत. जेवढी घरे मंजूर होती त्या प्रमाणात इन्फ्रा होणे आवश्यक असतांना तसे झालेले नाही. ब-याच वसाहतीमध्ये घरकुलाचे लाभार्थ्यी हीस्सा शिल्लक राहीलेला असतांना याच एरीयातील नागरीकांना हा हीस्सा भरण्यासाठी का सक्ती केली जात आहे. जो पर्यत लोक वर्गणीचा हीस्सा मिळत नाही तोपर्यंत इन्फ्राची कामे करण्यात येवू नये असे आम्हाला पत्र देण्यात येतात. हा कोणता न्याय आहे आमच्या एरीयातील इन्फ्राची कामे करण्यासाठी अशी भुमीका का घेण्यात येते, त्याचे कारण काय आहे. सर्व साधारण सभेची मान्यता न घेता 50 कोटीचा निधी इतर शिर्षकामध्ये का वळविण्यात आला. असे करु शकता काय याचा खुलासा करण्यात यावा. याबाबतचा मला खुलासा पाहीजे यामध्ये पक्षपाती होत आहे.बीएसयुपीचा किती पैसा आला होता किती पैशा खर्च झाला आहे जो पैशा शिल्लक आहे त्यामध्ये तरी इन्फ्राची कामे करण्यात यावी, याचा मला खुलासा पाहीजे.

**सभागृह नेता** सभा तहकुब होण्यापुर्वी सभागृहामध्ये जो प्रकार झाला आहे. तो प्रकार चांगला नाही. ब्रम्हपुरी एरीया नांदेड लगतचा होता. परंतू तो तरोडा एरीया बरोबर हा एरीया देखील 2009 साली मनपाकेत समाविष्ठ करण्यात आला. तत्कालीन मुख्यमंत्री मा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी या दोन्ही भागाचा विकास झाला पाहीजे यासाठी त्यावेळी असलेले सर्व लोकप्रतिनिधी यांनी प्रयत्न करुन तरोडा व ब्रम्हपरी या भागाचा विकास करण्यासाठी निधी देण्यात आला होता. त्या निधीमधुन त्या एरीयातील कामे करुन देवून त्यांना सुख दयावे. मागे 2011 साली उदघाटन झाले होते. परंतू आता 2016 आले तरी या एरीयातील कामे पुर्ण होत नाही. कारणे अनेक असतील पण त्या एरीयातील लोकांना सुविधा मिळाल्या पाहीजे ही सर्वाचीच भावना आहे. या डीपीआर मधील पैसे वळविण्यात आले आता झाले ते गले. आता प्रतिकात्मक त्या भागातील नगरसेवकाने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसे प्रशासना मार्फत होवू देता कामा नये. या भागातील कामे करण्यासाठी कॉग्रेसचे नेते, माजी महापौर अब्दुल सत्तार साहेब यांनी पाठपुरावा केला आहे. पण प्रशासना मार्फत कार्यवाही काही होत नसतांना दिसत आहे. आपण आले तेव्हा पासुन आणि मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे देखील हा प्रश्न मांडण्यात आला होता. परंतू काही गाडी पुढे सरकत नसतांना दिसत आहे. शासनाने मंजूर केलेला निधी पडून आहे. केंद्र शासनाकडील निधी आणण्यासाठी का प्रयत्न केले जात नाही. कामे पुर्ण करावयाचे झाल्यास त्या निधी साठी सुध्दा प्रयत्न करणे गरजेचे आहे. विकासाची कामे करीत असतांना लाभार्थ्यांचा निधी वसुल झाला पाहीजे आम्ही आपल्या सोबत आहोत. मालमत्ता कराची वसुली करण्यात येत आहे त्यासाठी कोणत्याही नगरसेवकाचा विरोध करीत नाहीत. ब्रम्हपुरी एरीयासाठी एक न्याय आणि इतर एरीयासाठी एक न्याय अशी भुमीका ठेवण्यात येवू नये. जे अधिकारी वसुली होत नाही म्हणून कामे थांबवित असतील तर त्यांना खडयासारखे बाहेर काढा. सभागृहात जी घटना होवू नये ती घटना घडत आहे, असे होवू नये. यासाठी लोकप्रतिनी यांनी असा प्रकार करणे म्हणेज आपल्यावर रोष आहे. मागील तीन महीण्यापासुन त्यांचा पाठपुरावा करणे चालू आहे. त्यासाठी ब्रम्हपुरी एरीयामधील कामे कसे करता येतील हे आपण पाहीले पाहिजे. तसेच स. सरजीतसिंघ गिल साहेबांनी अबचलनगर एरीयामधील चीनी मातीची ड्रेनेज लाईनचे कामासंबधीचा प्रश्न उपस्थित केला होता.त्या अबचलनगर एरीयातील काम सुध्दा मार्गी लावावे अशी मि विनंती करतो. सर्व स.सदस्यांना विनंती करतो की, सभागृहात असे भविष्यात प्रकार होवू नये आम्ही आपल्या सोबत आहोत सर्व सभागृह सोबत आहे. आपण काम करुन घेवू. पुन्हा असा प्रकार सभागृहात कोणीही करु नये अशी विनंती मी सर्व सदस्यांना करतो. तात्काळ ब्रम्हपुरी एरीयातील कामास सुरुवात करण्यात यावी.

**महापौर** मा.आयुक्त हे या प्रश्नाचा खुलासा करतील.

**आयुक्त** ब्रम्हपुरी एरीयातील कामे का झाली नाही याची माहिती घेण्यात येईल. तथापी काम सुरु करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या एजन्सी करीत नसतील तर इतर एजन्सी कडून कामे करुन घेण्यात येतील. या

एरीयातील कामे सुरु करण्याच्या सुचना देण्यात येत आहेत. या एरीयाचे कामे सुरु करण्यात येतील. जो निधीचा विषय आहे तो निधी कसा उपलब्ध करता येईल याची काळजी घेण्यात येईल. निधी अभावी कामे थांबणार नाहीत.

महापौर — हा जो सभागृहात प्रकार झालेला आहे. तो प्रकाराबाबत मला वाईट वाटत आहे. हा प्रकार का होतो, कारण टोकाची भुमीका घ्यावी लागते त्या वेळी असा प्रकार होतो. ब्रम्हपुरी एरीया मनपाकेत समाविष्ठ झाल्यापासुन मनपाने कोणत्याही मुलभुत सुविधा पुरविल्या नाहीत. मनपाचे आदय कर्तव्य आहे. ते केले नाही. हा ब्रम्हपुरी एरीया हा दुर्लक्षीत एरीया आहे. जो काही निधी इतर ठिकाणी वळविण्यात आला आहे. त्याचीही चौकशी करावी. लाभार्थ्यी हिस्साची अट ब्रम्हपुरी एरीयालाच का लावावी. शहरात ती अट कोठेही नाही. मालमत्ता कराची आपण वसुली करीत आहात त्यासाठी आम्ही प्रशासनाच्या सोबत आहोत. 2012 सालापासुन त्या ब्रम्हपुरी एरीयातील एकही काम झाले नाही. ते लोक नरक यातना ते लोक भोगत आहेत. ते लोक कशापध्दतीने राहत आहेत. याची कल्पना आपणास आलेली आहे. निधीच्या सबबीखाली कामे थांबविण्यात येवू नये. ड्रेनेजचे काम तात्काळ काम सुरु करावे. कोठलाही निधी त्या ठिकाणी खर्च करावा. कोणताही अभियंता किंवा कंत्राटदाराने काम करण्यात कुचराई करीत असेल तर त्याच्यावर कार्यवाही करावी.व संबंधीतास काम करत नसल्यामुळे काळया यादीत का टाकण्यात येऊनये या बाबतचा खुलासा प्रशासना मार्फत मागविण्यात यावा व येत्या 8 ते 15 दिवसात ड्रेनेजचे काम सुरु करावे, हे काम मार्गी लावावे.

अभिषेक सौदे — आमच्या वार्डाला एकही पैसा भेटला नाही. आमच्या वार्डाबाबत आपण बोलत नाही. आमच्याही वार्डाचा उल्लेख करावा. एक ही पैसा खर्च झाला नाही म्हणुन आपण सर्व शहराचे महापौर आहात. ब्रम्हपुरीचा विषय घ्या, सांगवी घ्यावे,कोठयाचा विषय घ्या, तरोडा या भागाचा विकास करावयाचा नाही काय. हे लोक टॅक्स भरत नाहीत काय. तुम्ही त्या लोकांचे तुम्ही महापौर नाही काय.

महापौर — श्री सौदे आपण आपल्या जागेवर बसावे. सध्या ब्रम्हपुरीचा विषय चालू आहे.

बाळासाहेब देशमुख — डीपीआर 10 चे पैसे कोठे गेले हे सांगावे.

अभिषेक सौदे — आमच्या एरीयाची आपणास अलर्जी आहे काय हे सांगावे. पुर्ण प्रशासनला घेवून आपण ब्रम्हपुरीला गेले होते पण कौठयाला का आले नाही, याचा खुलासा करण्यात यावा.

महापौर — शहरात कोणत्याही जाती निहाय कामे होत नसतात. सर्व शहरात समान काम होत असते, जाती-पाती पाहुन कामे करण्यात येत नसतात. भेदभाव केला जात नसतो.

गोंधळ चालू होता.

अब्दुल सतार — आपण दक्षिणचे आमदार व लोकप्रतिनिधींना घेवुन जावे.

अशोक उमरेकर — श्री अभिषेक सौदे यांचा फक्त एक विषय आहे की, कौठयाचा उल्लेख करण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे. कौठा या भागाचा उल्लेख येवू दयावी अशी मागणी आहे. त्यांना पाऊल वाट लागत नाही काय. ते टॅक्स भरत नाहीत काय. इतर भागासारखा याच्याही भागाचा उल्लेख करावा अशी त्यांची भावना आहे.

बाळासाहेब देशमुख — डीपीआर १० मध्ये 124 कोटी रुपयाचा निधी आला तो निधी गेला कोठे हे सांगा. अधिकारी हे उडवा उडविचे उत्तरे देत आहेत. जनता आम्हाला प्रश्न विचारत आहे. त्यांना आम्हाला उत्तेर दयावे लागते. रुपये 124 कोटी येवुन देखील काम होत नाही. याचा खुलासा करण्यात यावा.

महापौर — शहरामध्ये ज्या ज्या भागाचा विकास करणे आवश्यक आहे त्या त्या भागातील मुलभुत सोयी सुविधा पुरविण्याचे काम प्रशासनाने करावे. ब्रम्हपुरी, तरोडा, कौठा, सिडको हडको, वाघाळा, वसरणी जिथे जिथे नागरी वस्ती आहेत त्या वस्त्यामध्ये काम करणे आवश्यक आहे अशा सर्व ठिकाणी विकासाची कामे करण्यासाठी प्रशासनाला आदेशीत करते.

सौ.अंजली गायकवाड — सभागृहात हा जो प्रकार घडला आहे त्याचा प्रथम मी निषेध व्यक्त करते. आता पर्यत आयुक्त साहेबांन कडून कोठलेच उत्तर समाधान कारक भेटले नाही. अधिकारी योग्य पध्दतीचे आहेत त्यांनी हा प्रश्न योग्य पध्दतीने सोडवावे. दाखवणेसाठी त्यांनी केले आहे असे म्हणणे योग्य नाही. आतापर्यत बीएसयुपी योजनेचे 2007 पासुन कामे चालू आहे. बीएसयुपीचा कार्यकाल चालू आहे. काय परीस्थीती आहे हे पहावे. बीएसयुपीचे पॅकेज का दिले गेलेले नाही हे सांगावे. त्या एरीयातील अधिकारी यांनी काम का केले नाही नगरसेवक यांनी सांगीतल्यानंतर देखील काम होत नाही हे योग्य नाही. मा.महापौर मॅडम आपणास वाजंत्री लावून माझ्या वार्डात घेवून जाण्याची माझी इच्छा आहे की माझ्या वार्डातील लोकांची काय परिस्थीती आहे हे पहाण्यासाठी. कारण एकाच घरामध्ये संडासचे पाणी येते आणि ते लोक त्याच त्याठिकाणी बसुन खातात. गेल्या आठ महीण्यापासुन ते लोक राहतात. आपल्या घरामध्ये आपणास माशा सहन होत नाही ते लोक कसे राहत असतील याची थोडी कल्पना करावी. तात्काळ काम करण्यासाठी श्री स्वामी यांना सांगीतले होते परंतू काम त्यांनी काही केले नाही. हीच परिस्थीती ब्रम्हपुरीची आहे. पैशा त्या भागाचा कोठे गेला आहे. त्या भागाचे काम त्वरीत करण्यात यावे. मा. आयुक्त साहेबांन विंनती आहे की त्यांनी आमच्या वार्डासाठी 10 मिनीटाचा वेळ काढावा आणि माझ्या वार्डास भेट दयावी. आणि त्या ठिकाणची काय परिस्थीती आहे याची पहाणी करावी. ज्या ठिकाणी बीएसयुपी या योजनेतून नळाचे काम झालेले आहे त्या एरीयामध्ये छोटे छोट जोडणीचे का कामे केले नाही ती कामे करुन घ्यावी अशी मी विनंती करते. सावीत्रीबाई फुले नगरमधील ड्रेनेजची लाईन का

जोडण्यात आली नाही याचा देखील खुलासा करण्यात यावा. बीएसयुपीचा पैशा गेला कोठे हे दाखवा. नळाची चार इंची लाईन टाकावयाची होती ती तीन इंची का टाकण्यात आली याची चौकशी करण्यात यावी. नगरसेवक हा प्रशासन व नागरीक यांच्यामधील दुवा असतो. जर आम्ही नागरीकांना सुविधा दिल्या नाही तर नागरीकाना काय उत्तर दयावे हे कळत नाही.माझ्या वार्डातील प्रश्नाबाबत मा. महापौर यांनी खुलासा करावा.

**सभागृह नेता** झोन बी खुप मोठा झालेला आहे त्यामुळे त्या झोनला दोन भागामध्ये विभागणी करण्याची शहानीशा करावी. त्यामुळे कामे त्वरीत होण्यास मदत होणार आहे.

**सौ.अंजली गायकवाड** आम्हाला ठोस उत्तर मिळाले तर बरे होईल. या भागाची बैठक बोलावावी त्यांच्या काय समस्या आहेत हे आपण पहावे.

**महापौर** सौ. गायकवाड यांच्या वार्डातील समस्या जानुन घेण्यासाठी एक मीटींग लावण्यात यावी त्यात सर्व संबंधीत अधिकरी यांना बोलवावे.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** सभागृह हे प्रश्न मांडण्यासाठी आहे. मी काही गुन्हा केला नाही मी जर गुन्हा केला असेल तर मला निलबिंत करावे.

**महापौर** आपाण परवानगी घेवून बोलावे आम्ही आपणास वेळ देवू मध्येच बोलने योग्य नाही. परवानगी शिवाय बोलू नये.

**फारुख हुसेन बदवेल** इतवारा एरीयामध्ये लोक कसे राहतात. कारण मनपाने 7 वर्षापासुन गाळयाचे बांधकाम केलेले आहे. त्या दुकानाचा लिलाव केलेला नसल्याने त्याचा भाडा मीळत नाही. मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. जवळपास 7 वर्षाचे महिना दोन हजार जरी गृहीत धरले तरी अंदाजे 33 लक्ष 60 हजार रुपये एवढी रक्कम होत होती याला जबाबादार कोण आहे. मी आल्यापासुन या विषयासाठी पाठपुरावा करीत आहे परंतू कोणीही लक्ष देत नाही. या दुकानाबाबत काहीच का कार्यवाही करण्यात आलेली नाही याचा खुलासा करण्यात यावा.माझ्या प्रभागातील ड्रेनेज लाईनचे काम शिल्लक आहे. ते काम एएमआरसीला करण्यासाठी सांगितले असता तो म्हणतो की त्याला पैसे दिले जात नाही म्हणुन काम करीत नाहीत आणि मनपाचे पैसे एवढे वायाजात आहे. येत्या दिड वर्षानंतर लोकांच्या समोर जावे लागणार आहे. त्यांना काय उतर दयावे लागणार आहे. याला कोण जबाबदार आहे. प्रशासन आहे कि कोण जबाबदार आहे त्यांच्यावर कार्यवाही करावी,याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** इतवारा मार्केटचा स.सदस्यांनी जो प्रश्न मांडला आहे नांदेड शहरातील मनपाचे दुकाने ज्या ठिकाणी बांधण्यात आलेले आहेत त्याचा आढावा घेण्यात येत आहे. त्या ठिकाणची वसुली करण्यात येईल ज्या पध्दतीने घरपटटीची वसुली करण्यात येत आहे त्याच पध्दतीने मालमत्तेची वसुली करण्यात येईल.यात जास्त वाढ झाली असे निवेदन आलेले आहे. त्यांच्यासोबत तडजोड करुन ते अंतिम करण्यात येईल. ड्रेनेज लाईनचा उल्लेख केला आहे त्या ड्रेनेज लाईनची पहाणी करुन ते काम सुध्दा करण्यात येईल.

**श्री बाळासाहेब देशमुख(संविधानपार्टी)** मनपाला रमाई आवास योजनेची 35 कोटीरुपयाचे अनुदान आलेले आहे. पहीला हप्ता 11 कोटीचा मीळाला आहे. कालपरवा 17 कोटीचा दुसरा हप्ता मिळाला आहे. ही योजना डीआरडीएच्या व कास्टच्या प्रमाणपत्र असेल अशा लोकांना त्याचा फायदा दिला जातो. प्रधानमंत्री आवास योजनेचे 2 लक्ष 50 हजाराचे अनुदान आहे. आणि 6 लक्षाचे कर्ज आहे. मग 1 लक्ष 90 हजाराची मागणी कोण करेल. समाजकल्याण विभागाचा निधी खर्च करावयाचा आहे तो मागासवर्गीय समाजात हा निधी परत जाईल काय. जर परत गेला तर मनपाची बदनामी होईल. यासाठी मनपा सर्व साधारण सभेची मान्यता घेवून 1 लक्ष 90 हजाराच्या निधीत वाढ करुन तो 2.50 लक्ष किंवा रुपये 3 लक्ष केला तर तो निधी खर्च होईल. मागील आठ महिण्यापासुन रमाई आवास योजनेची यादी लागलेली नाही. यामध्ये आपल्या अधिकारी लोकांनी जावून सर्व्हे केलेला नाही.लोकांची मागणी आहे. ती यादी का लावण्यात आलेली नाही याचा खुलासा करावा. मालमता विभागाकडील गाळे आहेत ते भाडे तत्वावर देण्यात यावे. केवळ मागील वर्षापासुन चर्चा करीत आहोत गाळे भाडे तत्वावर दिले तर परतावा रक्कमेच्या माध्यमातून आपल्याला पैसा जमा होई. महीण्याच्या महीण्याला आपल्याला भाडे भेटले असते. त्यामुळे मनपाचे उत्पन्न वाढेल. शहरामध्ये मोकाट कुत्र्यांची जास्त संख्या झालेली आहे. मागील एका वर्षापासुन अधिका-यांनी त्या कुत्र्यावर काहीही उपाय योजना केलेली नाही.कुत्रे लोकांना चावत आहेत.त्याबाबत प्रशासनाने काय उपाययोजना केली आहे किंवा करत आहे याचा खुलासा करावा.

**आयुक्त** सध्या शहरामध्ये प्रधानमंत्री आवास योजना चालू आहे त्या योजनेत 2.50 लक्षाचे अनुदान असुन रमाई आवास योजनेचे अनुदानाची रक्कम रुपये 2 लक्ष आहे.हे अनुदान प्रधानमंत्री आवास योजनेच्या तुलनेने कमी आहे.या योजनेबाबत आम्ही शासनास मार्गदर्शन मागू आणि ही योजना प्रधानमंत्री योजनेत मर्च करता येईल काय असे मार्गदर्शन मागविण्यात येईल.शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. दुसरे म्हणजे मालमता गाळयाच्या संदर्भात आम्ही रिव्हजन करता येईल काय हे देखील तपासण्यात येत आहे. जे मोकाट कुत्र्याच्या संदर्भात प्रश्न होता त्या संदर्भात मोकाट कुत्र्याचा बंदोवस्त करण्यासासाठी लोकांची नियुक्ती करण्यात येईल.या लोकांच्या माध्यमातुन कुत्रे पकडण्यासाची कार्यवाही हाती घेण्यात येईल.

**महापौर** रमाई आवास योजनेचा लाभ देण्यासाठी डीआरडीएच्या प्रमाणपत्राचा आग्रह धरण्यात येवू नये. मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त त्वरीत करावा. अगदी गल्ली बोळातील कुत्र्याचा बंदोबस्त करावा. तसेच मुख्य रस्त्यावर मोकाट गायी, जनावराने रस्त्यावर फिरत आहेत त्याचा देखील बंदोबस्त करावा. कुत्र्याचे निर्बिजीकरण करणे बंद झालेले आहे ते निर्बीजीकरणाची करण्याचे सुरु करावे. या कुत्र्याचा शाळकरी मुलांना, वृध्द लोकांना फिरतांना त्रास होत आहे. त्यासाठी तात्काळ कार्यवाही सुरु करावी.

**अशोक उमरेकर** कुत्र्याचे खरच आपण निर्बीजीकरण करतो काय ? मला वाटत नाही आपल्या मार्फत योग्य पध्दतीने निर्बीजीकरण करत नाही. दुसरे असे की, मागे 10 ते 12 वर्षापुर्वी डीआरडीएचा सर्व्हे करुन घरे देण्यात आली होतीत्या घ्राचे आता छत गळत आहे आता त्या लोकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता येईल काय ?

**गोंधळ चालू होता.**

**महापौर** आता आपला वेळ संपला आहे. त्यामुळे आपण बोलू नये प्रश्न उत्तराचा तास सम्पल्यानंतरआपल्याला वेळ देण्यात येईल.

**सौ. श्रध्दा चव्हाण** बोलाना – बोलाना असे म्हणणारे आपण कोण ? आपणास हा अधिकार कोणी दिला. तुम्ही कोण होता की मला बोलाना म्हणणारे. आम्ही तुम्हाला प्रश्न विचारला नाही आणि त्याचे उत्तर देण्याचा अधिकार आपणास नाही. मा. महापौर मॅडम यांना आपण त्यांना त्यांच्या जागेवर बसवावे. आमच्या पक्षातील नगरसेवक बोलत आहेत तुम्ही का बोला असे म्हणता.

**गफार खान** एप्रील महीण्यापासुन आतापर्यत निवेदन देण्यात आलेले की बीएयुपीचे एन्फ्राचे कामे करण्यासाठी दिले होते. तयावर आपण सप्टेंबर महिण्यात मिटींग कॉल केली होती. बीएसयुपीचे व अधिकारी यांचेसह मिटींग कॉल केले होते. त्यांनी बजेट पोजीशन, इन्फ्राची कामे कसे करता येतील याची माहिती घेवून आले होते. त्यावेळी उपआयुक्त म्हणुन श्री वाघमारे साहेब होते. अपीलचे लोक देखील तीथे होते. त्यात एका-एका सदस्यांचा रिव्हीब घेण्यात आला होता. त्याची प्रोसिडींग देखील बनविण्यात आली होती. त्यावेळी अधिकारी यांचे ओपीनीयन घेण्यात आले होते. बीएसयुपीचा अर्थ आहे की बेसीक सर्व्हीसे टु अर्बण पूवर या बेसीक सर्व्हीसेस जर पुरविण्यात आल्या नाही तर काय उपयोग आहे.एरीयामध्ये घरकुल तयार केले आहेत परंतू रस्ते, नाल्या, ड्रेनेज, पाण्याची लाईन इत्यादी देण्यात आलेल्या नाहीत. एक अहवाल मिटींगमध्ये घेवून आले होते अधिकारी तो डाटा अत्यंत बोगस आहे असे मला वाटते. एवढा निधी आहे. ती प्रोसिडींग आज सुध्दा आहे. मा. महापौराच्या मिटींगमध्ये सांगण्यात आले होते की इतका निधी शिल्लक आहे. त्या एरीयाची अशी परिस्थीती आहे असे सांगण्यात आले होते. त्यावेळी 70 ते 80 टक्के लोकांकडून आम्ही मनपा तत्कालीन आयुक्त खोडवेकर व त्यांचे अधिकारी यांचे समक्ष लोक वाटा भरण्यात आला होता.परंतू एवढे करुन देखील त्या एरीयाची इन्फ्राची कामे करण्यात आली नाही. मी वेळोवेळी त्या विभागाचे संबधीत कार्यकारी अभियंता यांचे संपर्कात राहुन कामे करण्यात यावे. परंतू त्यांचे एक उतर होत की ते तसेच आहे असे उत्तर सांगत होते. ज्या वेळी मिटींग घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. मा. उप महापौर साहेब व आनंद चव्हाण आतापर्यत काय काय अंमलबजावणी करण्यात आली हा विषय विचारत होते. आम्ही विषय पास करतो. त्याचा रिव्हीव घेण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. मा. उप महापौर साहेब आपणास अधिकार नसतील परंतू रिव्हन तर आपणास घेता येतो. सर्व लोक बोलत होते की, मा. महापौर, माजी महापौर, आमदार, सदस्य हे लोक पाहनी करण्यासाठी गेले होते त्यावेळी मा. आयुक्त साहेब हे विना विचारता त्या ठिकाणावरुन निघून गेले परंतू ते का निघुन गेले त्यांची तातडी होती याचा काही खुलासा झालेला नाही. मागील मिटींग मध्ये त्यांनी टाईप उत्तर दीले होते की, मी सर्वाचे कामे करुन देईल. वसुलीच्या कामासोबत या देखील विषयाचा त्यांनी अभ्यास केला असेल किंवा त्या विभागाचे अभियंता/उप आयुक्त यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे. मी पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा या साठी डॉ. रईसोददीन यांचे कडे केली होती. ते म्हणतात कुत्र्याला मारता येत नाही. श्रीमती मेनका गांधी यांचे केसमध्ये कुत्र्याला मारण्यात येवू नये. परंतू सुप्रीम कोर्टाचे गाईडलाईन आहेत. त्यांचे उत्तर ठरलेले पिसाळलेल्या कुत्र्याचे मारणे साठी औषध नाही, अडव्हांस देण्यात येत नाही. पैसे नाही त्याचे अड्रेस नाही असे उत्तर होते. मी सकाळी मौर्निंग वॉक ला जात होतो त्यावेळी कुत्र्याने चावा घेताला होता. तेव्हा पासुन त्यांचे मागे आहे. मी सभागृहात विनंती आहे की या दोन्ही प्रश्नाचे उत्तर समाधान कारक मिळती अशी अशा व्यक्त करतो वेळ काढू उत्तर मिळणार नाही अशी अपेक्षा आहे.

**आयुक्त** पिसाळलेल्या कुत्र्याची एक समिती आहे त्या समितीने तो कुत्रा पिसाळलेला आहे किंवा नाही याची खात्री त्या समितीने करुन प्रमाणीत केले पाहिजे. त्या समितीत पोलीस निरीक्षक, संबधीत व्हेटरनरी डॉक्टर असतो आणि प्रशासकिय अधिकारी असतो. त्या समितीने प्रमाणीत केले आणि शासनाच्या ज्या सुचना आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**गफार खान** मा. आयुक्त महोदय, ब्रम्हपुरीच्या एरीयातील नगरसेवकाने जो प्रश्न उपस्थित केला आहे. फंन्ड वळविण्यात आला आहे तसे गोल गोल उत्तर आम्हाला अपेक्षीत नाही.

**आयुक्त** — बीएसयुपीचा जो निधी वळवण्यात आल आहे त्याची माहिती घेवून पुढील मिटींगमध्ये देण्यात येईल.

**सौ. श्रध्दा चव्हाण** — मागे पाऊस झाल्याने माझ्या प्रभागामध्ये गुडगाभर पाणी जमा झाले होते आणि आता देखील पाणी आहे. आयुक्त महोदयाचा कॉल गेला होता या ठिकाणची परिस्थिती खुप गंभीर आहे. त्यांनी असे सांगितले की रत्नाकर  वाघमारे यांना सांगतो, त्याचेशी संपर्क साधा. माझ्या प्रभागात जे जे अधिकारी आले त्यांनी त्यानंतर काय केले याचा खुलासा करण्यात यावा. शाळेमध्ये जातो त्याच एरीयामधील मुले शिक्षण घेत असतात त्यांना आम्ही काय उत्तर दयावे. विदयार्थ्यांना शाळेत येता येत नाही तर त्या मुलाना शिकवण्याचा प्रश्न येत नाही सर्व प्रकार गुंतागुंतीचा झाला झालेला आहे. जे अधिकारी आले होते त्यांनी काय काय केले याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** — आपल्या प्रभागामध्ये मी स्वतः आलो होतो त्या स्थळाची पहानी केली आहे. रात्री 11.00 वाजता आलो होतो व रविवारी सुध्दा त्या ठिकाणी आलो होतो.  आपल्या एरीयातील रस्ते उंच झाले आहेत.आणि वार्डाची रचना खोलगट आहे त्यामुळे त्या ठिकाणी पाणी साठले गेल आहे. ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे त्या त्या ठिकाणी लोकांना पाण्याचा वाट करुन  दिली होती ज्या ठिकाणी आवश्यक आहे  त्या ठिकाणी मुरुम टाकण्यात आला.

**सौ. श्रध्दा चव्हाण** — मागील 4 वर्षापासुन हेच ऐकत काढल्या गेले टाकल्या गेले हेच एकतो. त्या ठिकाणी नेमके काय  झाले आहे हे सांगावे.

**आयुक्त** — निश्चीतपणे त्या भागामध्ये पाणी साचुन राहते.कारण घरे ही खोलगट भागामध्ये झालेली आहे त्यामुळे पाणी त्या ठिकाणी पाणी साचुन आहे मी स्वतः त्या एरीयाची स्थळ पाहणी केली आहे. माझ्या अधिका-याने पाणी जाण्याचा मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे.

**सौ. श्रध्दा चव्हाण** — त्या ठिकाणी केवळ एक टक्के काम झाले आहे आणि 99 टक्केकाम झालेले नाही त्या ठिकाणच्या लोकांनी राहवे कि नाही हे सांगा.

**आयुक्त** — स.सदस्यांशी मी चर्चा केली आहे त्यांच्या एरीयात कोणते कामे प्राधान्याने घेणे आवश्यक आहे त्या कामाचे पत्र देण्यात यावे ती त्या प्रमाणे उपाय योजना करुन कामे करण्यात येतील.

**सौ. श्रध्दा चव्हाण** — त्या ठिकाणी आताही पाणी साचलेले आहे. आजपर्यंत कोणीही आलेले नाही. आम्ही काय सर्व साधारण सभेची वाट पाहावयाची काय ?   उत्तर मिळणार आहे काय की नाही.

**आयुक्त** — त्या एरीयामध्ये पाणी होते हे बरोबर आहे. पाऊस मोठा होता.त्यावेळी अधिका-याने काम केले आहे. मी सुध्दा त्या ठिकाणी होतो. स.सध्याची चर्चा करुन प्राधान्याने करावयाची कामे होती ती घेण्यात येतील.

**महापौर** — ब-याच भागामध्ये मुरुम टाकावयाचे राहील आहे त्या ठिकाणी मुरुम टाकण्यात यावा. व एरीयातील पाणी काढून दया असे स.सदस्य मागणी करतात. माझ्याच प्रभागामध्ये किती मागणी करुन सुध्दा वेळेवर मुरुम टाकण्यास विलंब झालेला आहे एएमआरसीचे कंत्राटादास तात्काळ आदेशीत करावे.

**विनय गुर्रम** — मा. महापौर मॅडम आपले काम होत नसतील तर आमचे काय खरे आहे.

**गोंधळ सुरु होता.**

**महापौर** — या वर्षी पाऊस जास्त झाला आहे. प्रशासनाने एएमआरसीच्या कंत्राटदारास तात्काळ आदेशीत करावे की, ज्या-ज्या एरीयामध्ये  मुरुम टकाणे आवश्यक आहे त्या त्या एरीयामध्ये मुरुम टाकण्यात यावा असे प्रशासनास आदेशीत करते.

**सभागृह नेता** — मा.आयुक्त साहेब आपण काम केले नाही असे नाही आपण काम केले आहे. परंतू नागरीकांच्या समाधान होवू शकले नाही ही वस्तूस्थीती  आहे. काही प्रयत्न अपुरे पडले असतील. ते पुर्ण प्रयत्न करावे. काही ठिकाणी कमतरता असेल तर ती पुर्ण करण्यासाठी आनखीन मुरुम टाकण्यात यावा.

**महापौर** — आणखीन मुरुम टाकावा व चालण्या योग्य रस्ते करुन दयावे.

**सौ.श्रध्दा चव्हाण** — गोविंद नगरमधील ड्रेनेज लाईन जोडणी करुन देण्यात यावी. आम्ही किती वर्षापासुन मागणी करीत आहे. आधिकारी म्हणतात त्याचे पैसे कपात करुन ठेवले आहे पैसे कपात करुन ठेवले तर त्या पैश्यामधून काम करावे. आमच्या महीला अंगावर रॉकेल ओतून घेतले आहे. त्यांना काही झाले असते तर  त्याला कोण जबाबदार आहे.आपणास पगार मीळतो त्या पगारीएवढे काम करता काय ? ड्रेनेजचे पैसे केले तर सुरळीत का करुन देत नाही याचा खुलासा करावा.

**महापौर** — आठ दिवसाचे आत चव्हाण यांच्या वार्डातील पाणी काढून  देतील सर्व कामे सुरळीत करुन देतील.

**सौ.सविता कंठेवाड** — एखादी मुरुमाची गाडी सुध्दा आमच्या वार्डात पडत नाही ही वस्तुस्थिती आहे. आमळी निवेदन देतो त्याचा काही उपयोग होत नाही.  जेव्हा मुड असते तेव्हाच त्या ठिकाणी मुरमाच्या गाडया पडतात. अन्यथा पडत नाहीत. त्यांचे उत्तर ठरलेले असते.  पाणी  खादानीत भरले आहे दोन दिवस पाणी थांबले की त्याचे दसरे उत्तर तयार असते कि, त्यांची बिले देण्यात आली नाहीत. माझ्या एका बंधु आणि भगिणीला  आत्मदहनाची वेळ आली आहे. त्यांनी प्रात्यक्षीक करुन दाखविले. आम्ही केले नाही. आपण मोठया पदावर बसले आहात. आत्मदहनाची वेळ आमच्यावर येत आहे. या बाबीचा मी निषेध करते. उन्हाळयात पाणी, आता चिखल त्या ठिकाणी मुरुम किंवा चुरी टाकण्यात येत नाही. आपण 3 कोटीची वसुली केली आहे त्या बददल आपले अभिनंदन करते. एखादा लाईट बसविण्यासाठी आम्हाला विचारणा

करण्यात येते की, त्याचा पोल नंबर आणा. विदयूत विभागाचे सुपरवायझर काय काम करतात. त्यांना सुटटी देऊन टाका.शनिवारी रात्री 8 वाजता विदयूत पोलला शॉक लागुन बैलाचा मृत्यू झाली ही इमेजेस आपणास पाठविली होती. नागरीकांना उत्तर मिळाले की पोल नंबर काय, एरीया कोणता. मी त्या ठिकाणी गेले असता मनपाच्या व एमएससीबीच्या लोकांना फोन केला व तेथील लाईट बंद करायला लावली. नाहीतर मोठी हानी झाली असती. अशा घटनेबददल बैठक लावणे आवश्यक आहे. यासाठी निधीही लागत नाही. मागील ४ वर्षापासुन तारीख पे तारीख, मिटींग पे मिटींग अशीच आमची अवस्था झाली आहे.आम्ही निवेदन देतो त्याच्यावरी का कार्यवाही केली नाही ती तुम्ही का केली नाही याचा अहवाल आम्हाला दयावा.निधीचा प्रश्न येतो त्यावेळेस आम्हाला लेखी देत रहावे. यामुळे सभागृहाचा व प्रशासनाचा वेळ वाचेल याबाबतचा सविस्तर खुलासा करावा.

**आयुक्त** पोलचा विषय होता त्या बाबत कार्यकारी अभियंता यांना त्या घटनास्थळी जाण्यास सुचना दिल्या होत्या. सध्या कार्यवाकरी अभियंता यांच्यावर या विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विदयूत पोलला जनावरे बांधली गेली नाही पाहीजे. पोल नंबरच्या बाबतीत हे प्रशासनाचे काम असल्यामूळे ते प्रशासनाने केले पाहिजे ते नगरसेवकांनी करणे अपेक्षीत नाही आपण जीआयएसची यंत्रणा जी केली आहे. त्या माध्यमातून पोल क्रंमाकचा विषय सोडवता येवू शकेल.

**सौ.ललिता बोकारे** महिला शिक्षण व बाल कल्याण समितीच्या उप सभापती या नात्याने शिक्षण विभागाचे काही प्रश्न आहेत. शहरात नविन भाग जसे, तरोडा, ब्रम्हपूरी या ठिकाणी मनपाच्या शाळा नाहीत. नगरसेवकाची मागणी आहे. या एरीयामध्ये मनपाच्या शाळा आवश्यक आहेत. खाजगी संस्थेमध्ये मोठया प्रमाणात डोनेशन घेण्यात येते. गरीब लोक हे डोनेशन भरु शकत नाहीत. म्हणुन माझ्या वार्डात किंवा इतर सदस्यांच्या वार्डात मनपाच्या शाळा देण्याची मागणी होत आहे. मनपा शाळेची पट संख्या खुप कमी आहे. १ ते ४ थी पय्रत एकुन 25 ते 30 विदयार्थी आहेत, खरे तर पहील्या वर्गामध्ये 30 ते 40 विदयार्थी असावेत.माझ्या असे लक्षात आले की, काही शिक्षक त्यांच्या शाळेत बाहेर जाऊन विदयार्थी आणतात. मनपाच्या शाळेला विदयार्थी का आणत नाहीत. एप्रील पासुन खासगी शिक्षक लोक मुलांसाठी बाहेर फिरतात. मग आमचे शिक्षक का फिरत नाहीत. आपले शिक्षणाधिकारी काय करतात. 1 ते 4 पर्यत सर्वे केला पाहिजे हे सर्वे करत नाही. सर्वे केला तर विदयार्थी मिळतील. आपल्याकडे सर्व सुविधा आहेत प्रयोगशाळेची मागणी केली होती. आपला शिक्षण विभाग कुचकामी झाला आहे. जीपीच्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्या शाळा मनपाच्या ताब्यात घेण्यात याव्यात. आमची कमीटी शिक्षण विभागाशी संबधीत आहे म्हणून कोणता विषय घ्यावयाचा झाल्यास कमीटीच्या समोर आणला पाहिजे. शिक्षण विभाग सक्षम केला पाहीजे. आमच्याकडे आरोग्यआहे. शहरात सध्या दुषीत पाणी पुरवठा होत आहे. शहरात मलेरीयाची लागण होत आहे. ड्रेनेज तुंबून रस्त्यावर येत आहे. नळाला पाणी बरोबर येत नाही. तुरटी कुठ गेली. पाणी अशुध्द येते. नगरसेवकाला तुम्ही शुध्द पाणी देता. शहरात पाच जलशुध्दीकरण केंद्र आहेत. ज्या तुरटीचा वापर करण्यात येतो त्याचा सविसस्तर अहवाल संबधीत अधिका-यांनी देण्यात यावा.शुध्द पाणी देणे हे या पावसाळयात गजर आहे. वृतपत्रात बातम्या येतात पण पाणी पुरवठा अधिकारी मौन धारण करतात. अशुध्द पाण्यामुळे रोगराई पसरलेली आहे. प्रशासनाने याची काळजी घेणे आवश्यक आहे. आता क्रिडा महोत्सव झाला माझ्या प्रभागामध्ये 52 सुवर्णपदके घेतलेली दिपा गवळे हिचा विषय आहे. आरोग्य शिक्षण या विषयाकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे या कडे प्रशासनाने दुर्लक्ष करु नये अशी माझी विनंती आहे, मला याचा खुलासा करावा.

**आयुक्त** स.सदस्यांनी नविन भागामध्ये मनपाच्या शाळा असाव्यात हा महत्व पुण्र मुददा घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा असतील तर त्या हस्तांतरीत करण्याचा विषय महासभेपुढे ठेवून कार्यवाही करण्यात येईल. पट संख्येच्या संदर्भात जे का उपया योजना करता येतील ते करण्यात येतील स. सदस्यांना विनंती की आयुक्त असतांना विभाग प्रमुखांनी माहिती दयावी हे संयुक्तीक नसुन ती जबाबदारी आयुक्तांची आहे. मनपा शाळेची एकुण पटसंख्या 2229 असुन पटसंख्येचे प्रमाण सध्या आपल्याकडे 59 शिक्षक कार्यरत आहेत. खाजगी शाळेकडे शहरातील नागरीकांचा कल कळत नकळत असतो.मनपाच्या शाळेमध्ये गुणवत्ता धारक शिक्षण आहे किंवा नाही असा नागरीकांमध्ये प्रश्न निर्माण होतो. मनपा मार्फत काही नाविण्यपुर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.

**सौ. ललिता बोकारे** शिक्षण अधिकारी बससोडे यांना खुलासा देण्यास सांगावे.

**गोंधळ चालू होता..**

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** जर शिक्षणाधिकारी उत्तर देत असतील तर बीएसयुपी साठीचा खुलासा संबधीती अधिका-याकडून देण्यात यावा.डीपीआर 10 चा खुलासा मला पण मिळाला पाहीजे.

**सभागृह नेता** उप सभापती आहेत विशेष बाब म्हणुन विभाग प्रमुखांने खुलासा करावा.

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** तरोडयाचा व ब्रम्हपुरीचा विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे माजी महापौर साहेब विभाग प्रमुखाला खुलासा करु दया.

**सरजितसिंघ गिल** मा. खोडवेकर साहेब स.सदस्यांच्या उत्तरेस होते त्याच पध्दतीने आपण देखील विभाग प्रमुखामार्फत उत्तर न देता आपण स्वतः उत्तर देता हा पायंडा आपण चालू ठेवल्याबददल आपले हार्दीक अभिनंदन. आपल्याला माहिती नसल्यास या ठिकाणी विभाग प्रमुख बसलेले असतात. त्यांच्याकडून माहीती घेवुन सभागृहात देण्यात यावी.

**दिपकसिह रावत** सभागृहातील सर्व विभाग प्रमुखांना न थांबवता केवळ आयुक्त साहेबांनी थांबवुन उत्तरे दयावी.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** डीपीआर 10 चे पैसे कसे काय वळविलेत याचा संबधीत विभाग प्रमुखाकडून खुलासा देण्यात यावा.

**सौ.ललिता बोकारे** शैक्षणीक वर्ष सुरु होण्यापुर्वी आम्ही मिटींग घेतली होते. शिक्षणाधिका-यांना बॅनर लावण्यासाठी सांगीतले होते. आपल्या शाळा डीजीटल आहेत. याची प्रसिध्दी करण्यात यावी.आपण काय सुविधा देतो याची प्रसिध्द देण्यासाठी सांगीतले होते. अशी सुचना देऊन सुध्दा तयांनी त्याची अंमलबजावणी का केली नाही. तरोडा,सिडको इतर महत्वाच्या ठिकाणी बॅनर लावण्यास सांगितले होते. त्यांनी बॅनर का लावले नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**सभागृह नेता** उप सभापती यांनी शहरात काहीतरी करुन दाखविण्यासाठी काही सुचना केल्या होत्या त्यांच्या मुल उददेश आहे. म्हणुन त्यांनी सुचना केल्या होत्या त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे होती. सुचनांचे पालन होत नाही. ही गंभीर बाब आहे. साधे बॅनर लावण्याची सुचना केली. बॅनर लागले नसतील तर हे शिक्षणाधिकारी काय कामाचे आहेत.

**विनय गुर्रुम** आमचे ज्या वेळी प्रश्न होते, त्यावेळी सभागृह नंता हे मधे मधे उठून का बोलत होते. आमच्या प्रश्नाचा यांनी का खुलासा करावा. तुम्ही सभागृहाचे नेते आहात तुम्ही बोलणे आवश्यक होत काय?

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** आमचा प्रश्न महत्वाचा आहे मा. महापौर आपण अगोदर खाली बसावे.

**गोंधळ चालू होता.**

**महापौर** आपणाला विषय पत्रीकेवर चर्चा होवू दयावची कि नाही हे सांगावे.

**डॉ.करुणा जमदाडे** माझ्या प्रभागामध्ये ड्रेनेजचा फार मोठा प्रश्न आहे ती स्लम एरीया आहे. दलित वस्ती आहे. माझ्या वार्डातील महिला आपल्याला भेटलेल्या आहेत शाहू नगर, राहूल नगर, लुंबीनी, वाघाळा येथे मुरुम टाकावा म्हणुन मागील पंधरा दिवसापासुन म्हणत आहे. एक मुली साप चावून मेली. त्या मुलीला दवाखान्यात नेण्यासाठी रस्ता नव्हता पाऊस कोसळत होता. दवाखान्यात नेण्यास वेळ झाला आणि त्या मुलीला जीव गमवावा लागला याला जबाबदार कोण आहे ? मुरुम टका या मुलभुत सुविधा देखील मिळत नाहीत. मी 19 एप्रीलला या सुविधा मिळाल्याव्यात म्हणुन पत्र दिलेले आहे. महापौर मॅडम संबधीत विभाग प्रमुखास पत्र दिले आहे. आज ऑगस्ट महीना उजाडला तरी सुविधा मिळालेल्या नाहीत. गुत्तेदारी वर्क ऑर्डर घेतली नाही असे उत्तर वषभर काम केले नाही तर लोक मरण्याची आपण वाट पहात आहोत काय याबाबतचा मला खुलासा देण्यात यावा. माझ्या वार्डात ड्रेनेजचा मोठा प्रश्न आहे गल्फर मशीन येत नाही. कितीही फोनकरावे लागतात. मनपा किती मशी बंद आहे. राहुलनगरमधील एकमेव लाईन चालू आहे मागील साडेतीन वर्षापासुन सभागृहामध्ये हा प्रश्न मांडत आहे. पंदे कन्स्ट्रक्शनने जे काम केले आहे त्याची कनेक्टीव्हीटी दिलेली नाही. जनतेने 15 ऑगस्टला उपोषणाचे पत्र दिले आहे. मी आमरण उपोषणाला बसणार आहे. एका फोनवर काम करावयाचे नसते तर 10 फोन लावावे लागतात. जनतेची आपण थटटा करत आहात याबाबतचा खुलासा करावा.

**महापौर** आजच ज्या ठिकाणी खिल झाला आहे त्या ठिकाणी मुरुम टाकण्यात येईल मनपाची जेट मशीन कुठे आहे याची चौकशी करण्यात येते.

**डॉ.करुणा जमदाडे** शहरात एक जेट मशीन आहे व ती बंद आहे दुरुस्त करण्यासाठी नागरुरला जावे लागते अशी माहिती मिळाली आहे ती कधी दुरुस्त होणार याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** ड्रेनेजीची कनेक्टीव्हीटी ब्रम्हपुरीसह व इतर ब-याच भागात देण्यात आली नाही त्याची पाहणी करुन कनेक्ट करण्यात येईल. लवकरात लवकर कनेक्टीव्हीटी करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. जेटींग मशीन चालू असते अथवा बंद असो.त्यासाठी ची आवश्यक ती उपाय योजना करणे आवश्यक आहे. ते करण्यात येतील. राहुल नगरमधील ड्रेनेज लाईनचा प्रश्न आहे तो देखील सोडवण्यात येईल.

**डॉ.करुणा जमदाडे** डीआरडीएचे आपण प्रमाणपत्र सक्तीचे केले आहे यावर्षी सक्तीचे केले असल्यामुळे प्रश्न निर्माण होत आहे. केवळा जातीच्या प्रमाणपत्रावर लाभ देण्यात यावा.

**सौ.रजिया बेगम** प्रत्येक कामाचे आम्ही निवेदने दिलेली आहेत. आजपर्यत त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. आज आमच्या एमआयएमच्या भगिनीने अंगावर रॉकेल ओतून घेतलेले आहे. एवढी गंभीर परिस्थिती परिस्थिती आमच्यावर आली आहे. आमच्या प्रभागामध्ये ड्रेनेजचे नाल्याचे पाणी वाहत आहे. प्रत्येक प्रभागात अशीच परिस्थीती आहे. रजिया मॅडमने अंगावर रॉकेल ओतून अशी वेळ इतरांवर येवू नये. प्रत्येक नगरसेवका बददल नागरीक रोष व्यक्त करीत असताना एमसीन चॅनलवर दिसून येत आहे. आपण महीला महापौर असल्याने अती दक्षता घेण्यात यावी. प्रभागातल्या सदस्या दुर केल्यास महिलावर अशी वेळ येणार नाही. माझ्या प्रभागात घरकुल झाली परंतू इंन्फ्राची कामे झाली नाहीत. नाल्या, ड्रेनेजचे काम झाले नाही.यामुळे लोकांच्या घरात घाण पाणी शिरते. महीलावर रॉकेल ओतून घेण्याची वेळ येवू नये. प्रशासनावर आपली पकड कायम ठेवावी.

| | |
|---|---|
| **महापौर** | आपल्या वार्डातील समस्या तात्काळ दुर करण्यासाठी प्रशासनाने काम करावे. |
| **लक्ष्मीबाई मोकले** | शासनाने महिलाना 50 टक्के आरक्षण दिले. 25 टक्के महीला बोलतात. आम्हाला बोलायला वेळ नाही. माझ्या प्रभागामधील अधिका-याला म्हटले की, मुरुम,चुरी, किंवा गिटटी तरी टाका पण वरील पैकी रस्त्यावर काहीही टाकण्यात आलेले नाही. इतके दिवस पाणी नव्हते आता पाणी आल. जरा मुरुम टाकण्याची कामे करावे. तुम्ही सुखी रहा आम्ही पण सुखी राहतो. |
| **विश्वास कदम** | अधिका-याला कर्तव्य बजावण्यासाठी सुचना करणे अपेक्षीत आहे काय ? |
| **आयुक्त** | आवश्यकतेप्रमाणे आम्ही काम करतच असतो. स.सदस्यांनी आम्हास सांगण्याची आवश्यकता भासु नये. |
| **विश्वास कदम** | रस्त्यावर अतिक्रमने मोठया इमारती उभ्या रहातात. झोन बी मध्ये रस्त्यावरील अतिक्रमणे काढली जात नाहीत तर सुचना देणे आवश्यक आहे काय ? |
| **आयुक्त** | आपण अतीक्रमणे हटविण्याची निश्चीतपणे कार्यवाही करीत असतो केवळ आमच्या आपण निदर्शनास आनुद दयावी. ही जबाबदारी अधिका-याचीच आहे यात शंका नाही. |
| **विश्वास कदम** | जर अधिका-याची जबाबदारी असेल तर त्याला सांगायची काय गरज आहे आहे एक पत्र त्यांना दिले आहे. पत्र देवून किती दिवस झाले तरी त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. का कोणाचे कनेक्शन किंवा इंटरेस्ट आहे का ? या पत्रावर काय कार्यवाही केली याची माहीती सभागृहात देण्यात यावी. |
| **महापौर** | श्री कदम याचे घर माझ्या वार्डात आहे. आनंदनगर येथील झालेल्या अतिक्रमाना बददल ते बोलत असतील अथवा सर्व झोन बी मधील अतिक्रमणाचा विषय असु शकेल. ही रस्त्यावरील अतिक्रमण काढून टाकण्यासाठी वारंवार सुचना केल्या होत्या. आनंदनगर चौकातून मुलांना जाणे कठीन झाले आहे. यावर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी याचा आयुक्तांनी खुलासा करावा. |
| **आयुक्त** | शहरात जेथे जेथे अनाधिकृत बांधकामे झाली आहेत त्याची पाहणी करुन त्यावर कार्यवाही करण्यात येईल. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निवासी वापरासाठीच्या काही गाईड लाइन्स आहेत. परंतू नविन बांधकामे पाडण्यासाठी तात्काळ कार्यवाही हाती घेण्यात येईल. |
| **विश्वास कदम** | इमारतीचे काम अनाधिकृत आहेतच रस्त्यावरील झालेली अतिक्रमणे काढण्यास काय अडचणी आहेत याचा खुलासा करावा. दहा दिवसापुर्वीच्या पत्राचे काय केले ते सांगा. प्रशासन असे करते तसे करते आम्हाला काय त्यांना फाशी दयायची नाही. अपेक्षा एवढीच आहे त्यांनी काम केले पाहीजे. केवळ गोड बोलतात काम काही करत नाहीत याचा खुलासा करावा. |
| **आयुक्त** | मा. महापौराच्या परवानगीने प्रशासनाला जर सर्व साधारण सभेच्या अगोदर प्रश्न मिळाले तर त्याचे उत्तर देणे सोईचे होईल. |
| **विश्वास कदम** | आपणाला माहीती नसेल तर विभाग प्रमुखाला माहीती देण्यास सांगावे. |
| **विनय गुर्रम** | सर्व सदस्याचे मत होते की, विभाग प्रमुखाला बोलू दया. आताच आपण म्हणले की मला एकच महिना झाला. यासाठी संबधीत विभाग प्रमुखाकडून माहिती घ्या व सभागृहात उत्तर दया. चार वर्षापासुन विभाग प्रमुख काम पाहतात. त्यांना सर्वच माहिती आहे. 53 व 54 च्या नोटीसा दिल्यानंतर किती दिवसात कार्यवाही करतात याचा खुलासा देण्यात यावा. |
| **महापौर** | झोन ब च्या क्षेत्रिय अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| **अविनाश अटकोरे(झोन ब)** | मनपाच्या झोन ब अंतर्गत अनाधिकृत बांधकाम होतात ती बांधकामावर कार्यवाही करण्यासाठी प्रथम 53 व 54 ची नोटीस देण्यात येते. |
| **विश्वास कदम** | अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात त्यांनी सांगीतले आहे रस्त्यावर अतिक्रमन होत आहे त्याच्या संदर्भात सांगीतले नाही अतिक्रमन तर तात्काळ काढता येते ते का काढले नाही याचा खुलासा देण्यात यावा. |
| **अविनाश अटकोरे(झोन ब)** | मा. महापौर मॅडम, मनपा रोडवर जे अतिक्रमण होत आहे ते अतिक्रमन काढण्यासाठी इमातर निरीक्षकांना झालेले अतिक्रमण काढण्याच्या सुचना दिलेल्या आहे. दोन दिवसात ते काढून घेण्यात येईल. |
| **विश्वास कदम** | आपल्या अधिकार क्षेत्रात आनंद नगर एवढाच भाग येतील काय इतर भाग आपल्याकडे नाही काय ? आनंदनगरच्या चौरस्त्यातुन माझी व महापौराची गवडी जाते. वयोवृध्द लोकांना त्या रस्त्यावरुन जाताना अडचणी निर्माण होतात, त्या रस्त्यावर सगळे गाडे लागतात, आयुक्त साहेब यावर कार्यवाही झाली पाहीजे त्यांना आताच सुचना दया. |
| **विनय गुर्रम** | मा. महापौर मॅडम, मी त्यांनही अतिक्रमण काढण्यास सांगीतले होते पण त्यांनही ते काढले नाही. |
| **महापौर** | तुमची वेळ संपलेली आहे इतरांना बोलू दया. |
| **विरोधी पक्षनेता** | विभाग प्रमुखांने काय खुलासा केला आहे. त्याच्यावर ते बोलत आहेत. |
| **विनय गुर्रम** | मा. महापौर मॅडम कालच आपण बैठकीत चर्चा करीत असतांना असे ठरले होते की, श्री दिपकसिंह रावत व श्री बंडू खेडकर यांच्या प्रश्नाला पुर्णपणे उत्तर देण्यात येईल आणि सभागृह नेता ते फक्त त्यात बोलतील असे ही म्हणणे उत्तर होते परंतू आता इतर नगरसेवक बोलत आहेत ते का ? 53 ,54 ची नोटीस दिल्यानंतर एका महीण्याच्या आत कार्यवाही करण्यात येते. मी त्यांना विचारु इच्छीतो की 4 ते 5 तक्रारी केलेल्या आहेत. जवळपास त्या तक्रारीना 5 महने झाले आहे. अनाधिकृत बांधकामे असे आहेत की, एक इमारत आपल्या मनपा इमारतीच्या अर्धी असेल ती पुर्णपुणे अनाधिकृत रित्या बांधण्यात आलेली आहे. |

त्या इमारतीला बांधकाम परवानगी दिलेली नाही. ती इमारत पुर्ण होवुन त्यात लोक राहायला केलेली आहेत. त्या इमारतीची वास्तु उभारुन शौ रुम चालू केलेली आहेत. त्यावर काही कार्यवाही केलेली नाही अशा अनेक तक्रारी दिलेल्या आहेत सभागृहात सांगतात 54, 54 ची नोटीस दिल्यावर एका महिन्यात कार्यवाही करण्यात येते. महाराणा प्रतापसिंह चौकात रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे. जो मुख्य नाला आहे ज्यामध्ये वर्कशॉप पासुन पाणी येते यावर अतिक्रमण झाले आहे त्यावर कार्यवाही केलेली नाही.

**गोंधळ चालू होता.**

**सभागृह नेता** — श्री कदम यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. एक अनाधिकृत बांधकाम दोन रस्त्यावरील अतिक्रमण असे विषय आहेत अतिक्रमण हे नगरसेवकाची तक्रार आल्यानंतर तक्रार काढण्यात यावे ही शहराची आवश्यकता आहे यात काही अडथळा नसेल शहरामध्ये बांधकाम परवानगी घेतलेले न घेतलेले या सगळयाच इमारती शहरात अनाधिकृत आहेत. 99 टक्के इमारती अनाधिकृत आहेत हे सर्व बांधकामे आपण तोडू शकणार आहोत काय ? सदस्याकडून असे प्रश्न उपस्थित करण्यात येवू नयेत. यामुळे नागरीकांना त्रास होवू शकतो. ज्या ठिकाणी रस्त्याची अडचण आहे अशा ठिकाणी ज्या इमारती पाडण्यात याव्यात.

**विरोधी पक्षनेता** — यांचे मत आहे की, अनाधिकृत बांधकामे झाली पाहीजेत ते तोडूच नयेत म्हणजे मनपाचे उत्पन्न बुडाले तर चालेल अनाधिकृत असेल तर तोडण्याची कार्यवाही केली पाहीजे.

**सभागृह नेता** — श्री विनय गुर्रुमला माझे आवाहन आहे की, माझ्या घरापासुन अनाधिकृत बांधकामाची सुरुवात करण्यात यावी. आणि सर्वाची बांधकामे तपासण्यात यावी. कोणाचे घर तोडायचे ते निश्चीतपणे सांगावे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. मोघम पत्र देवू नये.

**विनय गुर्रुम** — झोन क्र 2 मध्ये लेखी नोंद केली होती त्यावर काहीच कार्यवाही झाली नाही.

**गोंधळ चालू होता.**

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** — 1949 चे कलम आहे परंतू 1966 लिहणे श्री अटकोरे यांनी सभागृहाची दिशाभुल केलेली आहे हा सभागृहाचा अपमान आहे.

**सभागृह नेता** — मा. महापौर त्यांची वेळ संपलेली आहे म्हणून त्यांना आपण बोलू देवू नये.

**विनय गुर्रुम** — मी जो प्रश्न विचारला त्याचा खुलासा करण्यात यावा.

**आनंद चव्हाण** — आयुक्त साहेब हे दोन्ही नगरसेवकांच्या प्रश्नाचे एकदाच खुलासे करतील. गोंधळ चालू होता.

**विनय गिरडे** — त्यांचा प्रश्नो- उत्तराचा तास चालू असतांना एकही नगरसेवक बोललेला नाही. आम्ही प्रश्न उपस्थित करतांना त्यांनी चुपचाप ऐकुन घवे तुमचे असे चालू असतांना आम्ही मध्येच बोललो नाही श्री विनयजी हे घ्याना.

**विनय गुर्रुम** — माझ्या कार्यवाही करावी. आपली इच्छा असेल तर कार्यवाही करा.

**अ.सत्तार** — अजेंडा पास करण्यात यावा नगरसचिव अजेंडा सुरु करावा.

**विनय गर्रुम** — माझ्यावर कार्यवाही झाली तरी चालेल पण माझ्या प्रश्नाचे उत्तर मला आताच पाहीजे. ते सभागृहात बसून आहेत त्यांनी खुलासा करावा. चार महीण्याचा काल उलटून गेलेला आहे माझे समाधान करणे आवश्यक आहे.

**गोंधळ सुरु होता.**

**सभागृह नेता** — संबधीत स.सदस्य सभागृहात गोंधळ घालत आहेत त्यांना निलबिंत करण्यात यावे.

**किशोर भवरे** — माझ्या वार्डात जंगमवाडीची शाळा आहे तीची निविदा दोन वर्षापुर्वी निघालेली होती त्या शाळेची दुरुस्ती झाली नाही ती शाळा पाण्याच्या टाकीखाली टिनशेड मध्ये सुरु आहे. ते सुध्दा गळत आहे दोन रस्ते ओलांडून लहान मुलांना शाळेत जावे लागत आहे या शाळेत लहान मुलांना जाता येत नाही त्यामुळे दर वर्षी मुलांची संख्या 100 हुनही कमी होत आहे. या शाळेमध्ये मी आपल्याकडे आलो होतो. शिक्षण विभागतील अधिका-यांनी प्रत्येक मुलाच्या घरी जावून सर्वे करावा.

**अब्दुल सत्तार** — अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. त्या बांधकामावर त्वरीत कार्यवाही झाली पाहीजे काय 2 – 4 इमारती पाडायच्या ते पाडा.

**आयुक्त** — स.सदस्यांनी अनाधिकृत बांधकामाबाबत जी सुचना केली आहे त्या संदर्भात ज्या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यावर कार्यवाही करण्यात येईल आपला जो डीसी रुल होता. राज्य शासनाने नविन एक डीसी रुल तयार केला आहे. त्या नोटीफिकेशनची प्रत आपल्याकडे आलेली आहे जी हार्डशिपची प्रकरणे मंजूर झाली आहेत. त्या हार्ड शिप प्रकारणात काही अर्धवट प्रक्रिया राहीली असेल ती पुर्ण करण्यात येईल बांधकाम परवानगी प्रकरणाला मंजूरी दिली आहे. त्याचा निधी जर भरला नसेल तर ती बांधकामे अनाधिकृत समजूनच त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल.जे काही नविन डीसी रुल झालेले आहेत त्यामध्ये रहीवासी वगळून व आपण पावसाळयात शक्यतो बांधकामे पाडत नाही, चालू असलेली बांधकामे यावर निश्चीतच कार्यवाही झाल्याचे आपणास दिसुन येईल.

**विनय गुर्रुम** — कलम 53 व 54 ची नोटीस दिलेली आहे. त्यावर कार्यवाही केव्हा करण्यात येणार किती तशीच ठेवून देणार यावा खुप कालावधी गेला आहे तरी काही कार्यवाही झाली नाही.

**विनय गिरडे** आता खुलासा झालेला आहे आता शांत बसावे.

**सभागृह नेता** कार्यवाही ही वार्डवाईज करण्यात यावी.

**विनय गिरडे** स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ महाराष्ट्र अभियान चालू आहे त्या अंतर्गत सिडको एरीयातील मागील चार दिवसापूर्वी लोकांनी सहभाग घेतला आहे व अधिका-यांनी भाग घेतला आहे. सिडकोतील कचरा गोळा करुन साफसफाई केली. एट्झेड जो आपला कंत्राटदार आहे त्यांच्या कर्मचा-यांनी तीन दिवसापासुन काम बंद केले आहे. एट्झेडच्या आडमुठकी धोरणामुळे काम बंद ठेवले आपल्या मनपाने जे नियोजन केले आहे. घंटागाडीचे लोकांना या गाडीची एक वेळ निश्चीत झाली आहे त्या वेळेमध्ये नागरीक घरातील कचरा घेवून येतात. व घंटागाडीत टाकतात. मागील तीन दिवसापासुन काम बदं असल्याने घरामध्ये कचरा साचलेला आहे.तर काहीनी तर रस्त्यावर कचरा टाकत आहेत. अशा कंत्राटदारवर आपण काय कार्यवाही करणार आहात काय ? जर हा कंत्राटदार दर दोन महिण्याला असेच कामगारांना समोर करुन पैसे काढतो मला कालच माहीती मिळाली की त्याला धनादेश देण्यात आला आहे. त्याच्या या धोरणामुळे त्यावर आपण कार्यवाही केली पाहीजे. आपण तुप्पा येथील प्लान्ट बनवणार होतो. तो चालू करण्यासाठी सांगण्यात आले होते परंतू यात स्थायी समिती व सर्व साधारण सभेने ठराव घेतला आहे की त्याला काळया यादीमध्ये टाकावे. मागील दोन वर्षापुर्वी या गुत्तेदाराची मुदत वाढ संपलेली आहे. वारंवार त्याच गुत्तेदाराला काम वाढवून देण्यात येत आहे. भारत भर व महाराष्ट्र भर स्वच्छता मोहीम चालू आहे. या कंत्राटदारामळे मनपाला काळीमा फासण्याचे काम करत असेल तर त्याच्यावर कार्यवाही निश्चीत केली पाहीजे. तुप्पा प्लांन्टचे काम या गुत्तेदाराला होत नसेल तर त्याच्यावर काय कार्यवाही करणार आहात. कारण हा प्रश्न वारंवार सभागृहामध्ये प्रत्येक सदस्या प्रश्न उपस्थित करतो. बळीरामपुर तुप्पा भाग एकदम गरीब लोकांचा आहे. सकळया शहराचा कचरा त्यांच्या भागात जात आहे आणि त्यांना त्या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे त्यांची काळजी आपणास घेणे गरजेचे आहे आणि या गुत्तेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. कारण भविष्यात तो नागरिकांना वेठीस धरणार नाही यासाठी त्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी. घंटागाडीच्या कर्मचा-यांना घ्या आणि आमच्या भागात घंटागाडी फिरवा. लोकांच्या घरातील कचरा बाहेर गेला पाहीजे. त्यासाठी मनपाचे कर्मचारी लावले पाहीजे. या गुत्तेदाराला असेच सोडणार काय आणि जन्मभर त्यालाच कंत्राट देणार काय ? स्थायी समिती समोर निविदा आली होती. त्या आम्ही काही सुचना केल्या होत्या त्या प्रमाणे प्रक्रिया करण्यात यावी. हे एजन्सी काम करत नाही त्यामुळे 15 दिवसाच्या आत नविन टेन्डर प्रक्रिया करावी व याला काळया यादीत टाकावे. स्थायी समिती आणि सर्व साधारण सभेने ठराव करुन देखील त्यावर कार्यवाही करत नाहीत त्याला मुदत वाढ देण्यात येते. त्याला कोणाच्या अधिकाराने मुदत वाढ मिळते याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** घनकच-याच्या बाबतीत 2012 साली ही एजन्सी नियुक्ती केली होती त्यावेळी त्यांना पाच वर्षे अशी मुदत देण्यात आली होती. सुरुवातीला तीन वर्षाची आणि त्यानंतर एक-एक वर्षाची मुदतवाढ देण्याचे या विनीदेमध्ये असल्यामूळे मुदत वाढ देण्यात आली जरी मनपाने तीन महिन्याचे वेतन दिले नसल्याने आणि 14 वा वित्त आयोगाचा निधी झीरो झाला असल्याने आपल्या मनपा फंडातून निधी देण्यात येईल परंतू त्या निवीदा धारकांला तीन महिन्याचे पेमेट स्वतः केले पाहीजे. स.सदस्याने जो निवीदेचा प्रश्न उपस्थित केला आहे त्याची तपासणी करण्यात येईल व प्रोसेसिंग प्लॉन्टसाठी नांदेड शहराला 65 कोटी रुपयाचा निधी मिळू शकतो. यामध्ये 40 कोटीचे अनुदान असणार आहे. यासाठी ही प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. डीसेंबर अखेरपर्यत पुर्ण करु व नविन वर्षात हा प्रकल्प सुरु करु.

**विनय गिरडे** त्यामध्ये एक क्लॉज होता दरवर्षी त्याचे काम बघुन त्याला मुदत वाढ देण्यात यावी. त्याच्या कामकाजामध्ये तक्रारी जर असतील तर त्याची आपण निविदा रदद करु शकतो. यापुर्वी आपण ब-याच कंत्राटदाराच्या निवीदा रदद केल्या आहेत. सर्व साधारण सभेच्या सदस्यांनी या कंत्राटदाची वारंवार तक्रारी केल्या आहेत त्यामुळे त्याचे कंत्राट रदद करावे व निविदा प्रक्रिया नव्याने सुरु करावी तुप्पा येथील प्रकल्प चालू करावा असा क्लॉज होता तो त्यांने भंग केलेला आहे. आपण त्यावर काहीही कार्यवाही केली नाही.

**अब्दुल सत्तार** एटुझेड कंपनीला काम दिले त्यासाठी काय अटी होत्या तुप्पा प्रकल्प पुर्ण करणे ही त्याची जबाबदारी होती पण त्याने हा प्रकल्प पुर्ण केला नाही त्यामुळे त्याने मनपाचे नुकसान केलेले आहे. कंडीशन असल्याने त्याने काम केले नाही तर आणि त्याने 60 ते 70 लाखाचे पेमेंट केलेले आहे असे आम्हाला कळाले. ब्लॅक लिस्टसाठी ठराव केला होता ते न करता त्याला पेमेंट कोणत्या आधारे देण्यात आले याचा खुलासा करावा. हा प्रकल्प तीन वर्ष झाल्यानंतर 10 कोटीरुपयाचा निधी देण्यात यावा असे ठरले होते.त्याला दर महीन्याला 1 कोटी साठ लाख रुपये देतो तरी तो काम करीत नाही तो म्हणतो की, पेमेंट मिळाले नाही व काम बंद करतो ही कुठली पध्दत आहे. सभागृह एका साईडला आणि अधिकारी एका बाजूला हे कुठेतरी थांबले पाहीजे. कंत्राटदाराची ताकद नाही तर तो काम का करतो ? काय मनपानेच पुर्ण पैसा दयावा गुत्तेदार कशाला म्हणतात त्याने स्वतः पैसे दिले पाहीजे. कशासाठी मुदत वाढ देण्यात येत आहे. तो रात्री काम करायला पण माणसे किती आहेत. याचा खुलासा करण्यात यावा.माझ्या दोन

प्रभागामध्ये केवळ सात माणसे आहेत. एटुझेड चे माणसे किती आहेत असे एसआय ला विचारले तर तो म्हणतो मला माहिती नाही. त्याला बिल कशाला देता ? एसआय व झोन अधिकारी यांच्या सहीने जाते सगळया नाल्या भरलेल्या आहेत. साफसफाई नाही तरी देखील त्याला तीन कोटीचे पेमेंट केले आहे. शहरामध्ये कोणते मोठे काम केले 14 वा वित्त आयोगातुन दिले ते देण्याची काय गरज होती. आमच्या वार्डामध्ये 25-25 लाखाची कामे करण्यासाठी पैसे नाहीत मोठया गुत्तेदाराला पैसे देण्यासाठी आहेत. 14 वा वित्त आयोगामधील 16 कोटी देण्यात आले सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली नाही.आम्ही निवडून कशा साठी आलो आहोत. आमच्या वार्डाचा विकास झाला पाहीजे. एक मुरुमाची गाडी आमच्या वार्डात पडत नाही म्हणुन नगरसेवक लोक चिडून आहेत. तुप्पा येथे दुर्गंधी सुटलेली आहे. आमच्या कडेही होती ती आता तुप्पा येथे गेली आहे. तुप्पा मध्ये साफ पाहीजे की नाही आपण साहेब बारकाईने पहा. यात काय झालेले आहे. मी महापौर होतो वांरवार मीटींग घेत होतो.काम पुर्ण करण्यासाठी काय पुर्ण केले. आम्ही ठराव सुध्दा करुन दिला होता. कारण तो काम त्वरीत पुर्ण करेल म्हणुन पण काम काय पुर्ण झाले नाही. तो केवळ मलई खाण्यासाठी आहे काय ? त्याला काळया यादीत टाकावे.आपल्या हातून चांगले काम होवू दयावे. सर्व साधारण सभा तुमच्या पाठीशी आहे. तुम्ही करुनच दाखवा. पुढच्या सर्वसाधारण सभेमध्ये माहीती गोळा करुन दयावी अशी आमची विनंती आहे.

**सभागृह नेता** श्री विनय पाटील यांनी जो विषय मांडला आहे. तर 10-11 या एटुझेड कंपनीला नांदेडमध्ये आणले आहे. ही एजन्सी चंदीगडची आहे ती कंपनी फार मोठी आहे म्हणून गाजावाजा करण्यात आला होता. परंतू तसे काहि नाही. जो तुप्पा प्रकल्प मंजूर झाला होता त्यावेळी अनेक स्थायी समितीमध्ये आम्हाला आश्वासन दिले होते. त्याला काम देण्यात आले आणि त्याचे हे काम सबलेट करुन टाकले होते. मा.अशोकराव साहेबांनी मिटींगा घेतल्या होत्या. आयुक्तांनी देखील मिटींगा घेतल्या होत्या त्यांना ठनकावनू सांगीतले होते की, तुप्पाचा प्रकल्प या वर्षी पुर्ण करुन देण्यात यावा. कचरा उचलण्याची जबाबदारी नसुन तुप्पा प्रकल्प पुर्ण करण्याची संयुक्तीक जबाबादरी तयाच्यावर आहे. त्या जबाबदारीतून त्याला मोकळे करुन टाकले आहे. तेव्हा आयुक्तांना त्याला थ्रीसीसीची नोटीस दिली होती. पुन्हा त्याने येवून विनंती केली आहे हा प्रकल्प 12 महीण्यात पूर्ण करतो म्हणून सांगीतले होते आम्ही मोठे मन करुन मुदत वाढ दिल्या आहेत. कारण त्याच्याकडून तुप्याचा प्रकल्प पुर्ण करावयाचा होता म्हणून मुदत वाढ दिलेली आहे. पेमेंटदेखील वेळेवर दिलेले आहे. त्याला पुर्णपुणे सहकार्य केलेले आहे. त्याचे या कारणामुळे मनपाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. नगरविकास खात्याचे अधिकारी आले होते. आपल्याला नांदेड हे अग्रेसीव्ह असल्याचे चित्र दाखवता आले असते. या सर्व एटुझेड ने नांदेडला पाठीमागे आणणे तो प्रकल्प आपण त्यांच्याकडून काढूण घेतला थ्रीसीसीची नोटीस देतात आणि दुसरी एजन्सी नियुक्त होईपर्यत त्याच्याकडूनच काम करुन घेतात. टेंडर प्रोसेस करण्यासाठी गोगलगायीचे पाय आहे ते पाय 10 ते 12 लोकांचे आहेत तुम्ही करण्याचे प्रयत्न करता तुमचे अभिनंदन ते लोक पुढे जाऊ देत नाहीत हे खरे आहे. टेनर प्रोसेस 2-2 वर्ष लागत आहेत हे कितपत बरोबर आहे. काही लोकांची इच्छा आहे एटुझेड गेली नाही पाहीजे. हे लोक कोण आहेत? याची चौकशी करावी ते गोगल गायीचे पाय कापुन टाका. तुप्पाचा प्रकल्प आपल्या कार्यकाळात पुर्ण करावा अशी आमची इच्छा आहे. आम्ही तुमच्या सोबत आहोत. सिडकोतील काम बंद केले त्यांच्या विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** श्री विरेंद्रसिघ व अ.सतार यांनी सांगीतल्याप्रमाणे या सभागृहात एटुझेड ला ब्लॅकलिस्ट करण्यात आल्यानंतरही काम देण्यात आले. टेंडर थ्री सीची नोटीस देण्यात आली आणि एकीकडे तुप्पाची काम काढून घेण्यात आले. एकीकडे ठैवण्यात आले. आपले यात बरेचजण सहभागी आहेत. ज्यांनी टेंडर काढण्यात टाळाटाळ केली आहे त्यांच्यावर निश्चीत कार्यवाही करावी. सभागृह आपल्या सोबत आहे. जो अधिकारी टेडर करण्यास सक्षम नाही. गोगलगाईचे पाय कापा आणि एका महीण्यात टेंडर प्रोसेस अंतीम करा. शहरात मोठया प्रमाणात रोगराई पसरण्यास जबाबदार आहेत. अशा अधिका-यावर कार्यवाही करा. सगळया नाल्या मरुन आहेत. साफसफाई होत नाही व बिले उचलतो जो की काळया यादीत टाकलेला आहे. आपण यास जबाबदार असणार आहात. ब्लॅकलिस्ट केलेल्या कडून काम करुन घेता म्हणजे त्याचे व तुमचे नाते जुटलेले आहे. सत्तार साहेब म्हटल्याप्रमाणे चिरीमीरी तर होत नसेल ना ? तुम्ही कार्यवाही करा आम्ही तुमच्या सोबत सभागृहात आहोत. टेंडर त्वरीत रदद करा. दुस-या लोकांकडून काम करुन घ्यावे. तुम्ही पाईमपास करु नका नाहीतर तुमच्या विरुध्द ठराव पास करावा लागेल.

**सौ.रोहीणी कनकदंडे** सर्व सदस्य हे आपल्या समस्या आपल्या समोर मांडतात. परंतू त्याही काही उपाययोजना होत नाही. उन्हाळयाची परिस्थीती तीच होती व पावसाळयातही परिस्थीती तीच आहे. काहीच होत नाही तुम्ही कामे केलीच पाहीजेत आम्ही माईक घेवनू बोलतो आणि इथेच विसरुन जातो. पावसाळा सुरु होण्यापुर्वी प्रशासनाने जबाबदारी घ्यायला पाहीजे. नव्या साफ केल्या पाहीजेत. ड्रेनेज पाण्याच्या लाईन हे सर्व पाहणे गरजेचे असते. नालया तुडुंब भरल्या आहेत. शाळा कॉलेज, मंदीरे जवळ आहेत. त्यात लहाण मुले पडतात याकडे कोण लक्ष देते. अधिका-याला सुचना देता त्याची माहीती का घेत नाहीत. या पावसाळयापुर्वी आपण काय उपाय योजना केली याचा खुलासा पाहीजे. श्रीनगर, कैलासनगर या भागाची समस्व्या नसुल संपुर्ण शहराची समस्या आहे.

**आयुक्त** पावसाळयापुर्वी नाल्याची(मोठया) सफाई करण्यात येते आता आपल्या वार्डातील नाल्या तुबंल्या असतीत तर त्या ठिकाणी आमचे अधिकारी पाहणी करतील व आठवडयाभराच्या आत आपल्या वार्डातील नाल्या साफ करुन देतील.

**फारुख अली खाँ** सर्व नगरसेवकांनी आपले प्रश्न फार निष्ठेने आपल्यासमोर ठेवलेले आहेत आमची चार वर्षे पुर्ण झालेली आहेत. आम्ही म्हणतो की, खुलासा करा आयुक्त साहेब हे खुलासा करतात व आयुक्तांनी खुलासा केल्यानंतर आम्ळी खुश होवून जातो.आम्ही समजतो आमचे काम झाले आहे खुलाशावर खुलासे पे खुलासे हे गीत एकत आहोत महापौर नगरसेवकआणि मी सगळे जन एकच म्हणतात. खुलासा करावा.एटुझेड हा शब्द ए पासुन झेड पर्यत त्याचेच शब्द आहेत तुम्हाला कार्यवाही करता येणार नाही मी सर्व सदस्यांना सांगतो की, त्याच्यावर हे काहीच कार्यवाही करुच शकत नाहीत.

**गोंधळ चालू होता.**

आमच्या बहीनीला अंगावर रॉकेल टाकुन घेण्याची वेळ आली आहे. काम न झाल्यामुळे ही वेळ त्यांच्यावर आली आहे. प्रशासन आमच्या समस्याना थंड पाण्याने जाळण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण नविन आहात . आपण आमच्या समस्यांचे निराकरण कराल अशी मला आशा आहे. नगरसेवकांना त्यांच्या वार्डातील कामे करण्यासाठी पैसे नाहीत आणि या ठिकाणी फक्त खुलासेच चालू आहेत मग कामे कधी होणार. येणा-या काळात निवडणूकीला सामोरे जावे लागणार आहे. मतदाराकडे जावे लागणार आहे. आम्ही काय तोंड घेवनू त्यांच्यासमोर जावे. मुरुम गीटटी टाकावयाची आहे. की आम्हाला उत्तर मिळते की, पैसे नाहीत. सभागृहात न आणताही व टेन्डर न काढताही पैसे देत आहेत. आम्ही 40 ते 45 नगरसेवकांनी सहया करुन आमचा विरोध आहे. तरीही पैसे देण्यात आले मी नगरसचिवांना विचारले तर नगरसचिव उत्तर देतो आम्ही उत्तर दयायला तयार आहोत. प्रशासन हे अंगावरच येत आहे. ४ वर्ष झाली तुम्ही आमची ताकद ओढून घेतली आहे. आम्हाला शरम वाटत आहे. शरम को शरम आ रही है. इतनी बेशरम हुई है. काय आयुक्त साहेब आमची हालत केलेली आहे. आम्ही नगरसेवक आहोत की, तुमची झोलेबाजी ऐकण्यासाठी आलोत हेच कळत नाही याची आम्हाला लाज वाटत आहे. म्हणून मला सर्व नगरसेवकाचे प्रश्न एकुन मला गाण्याच्या ओळी म्हणून दाखवतो."दुनिया मे कितना गम है मेरा गम तो कुछ भी नही है. लोगोंका गम देख के मै अपना गम भुल गया. " महापौर साहेब ही सरण्याची वेळ नाही. आयुक्त साहेब ही गंभीर पणेविचार करण्याची वेळ आहे. येणा-या काळात आम्ळाला मतदाराकडे जावे लागणार आहे म्हणुन मी अशा व्यक्ती करतो आपण चांगले निर्णय घ्यावा आणि वार्डामध्ये विकासाची गंगा वाहीली कमीत कमी 25 ते 50 लाख रुपयाची कामे प्रत्येक वार्डात करण्यात यावीत.अशी आशा व्यक्त करतो.

**विनय गिरडे** आम्ही प्रश्न उपस्थित केला याची आपल्याला माहीती नसेल इतरही सदस्यांनी उपस्थित केले आहेत येत्या बैठकीत याची आम्हाला उत्तरे मिळाली पाहीजेत. कारण आपणास माहीत नाही असे उत्तर देता. एटझेड ची प्रक्रिया किती वेळा रदद केली होती ही माहीती दयावी तयाची कारणे काय ? 70 लाख रुनपये दिली ते कोणत्या आधारावर दिलेत प्रकल्प चालू झाल्यानंतर 3 वर्षाच्या नंतर पैसे दयावायाचेहोते या प्रश्नाची आपण नोंद करुन घ्यावी. एटुझेड ला दंड किती लावला ही माहिती ही आवश्यक आहे. स्वच्छ भारत मिशन याला कुठेतरी हा प्रकल्प पुर्ण झाला तर त्याचा फायदा मनपाला होईल.

**बालाजी कल्याणकर** मी आज जे सभागृहात ब्रम्हपुरीचा कामे झाली नसल्यामुळे रॉकेल ओतून घेण्याची वेळ आमच्या भगीनीवर आलेली आहे. याकडे मा.आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब गांभिर्याने लक्ष दयावे. पुढच्या बैठकीला सुध्दा मी आत्मदहन करीन करण कामे होत नसतील तर मला तरोडयाची मलनिस्सारणाचे कामे श्रध्दा कन्स्ट्रक्शनला दिले आहे. 66 लाखाचे कामे पुर्ण झाले आहे 33 लाखाचे काम शिल्लक राहीले आहे. ड्रेनेजचे कामा अतंर्गत का थांबवण्यात आले आहे हे काम का बंद आहे याकडे आपण लक्ष दयावे. जेएनएनयुआरएममध्ये 70 टक्के कामे पुर्ण झाली आहेत 30 टक्के शिल्लक राहीलेली आहेत. यामध्ये मनपाचा वाटा नसलयामुळे आपले हे अनुदान थांबलेले आहे. याबाबतचा मला खुलासा पाहीजे. शिवरोडची लाईन शेतक-यांनी थांबवलेली आहे.त्या शेतक-यांवर मनपा काय कार्यवाही करत आहे याची माहीती दयावी. माझ्या वार्डातील अंतर्गत जोडणीचे काम करण्यात आले नाही याची खुलासा करा खुलासा संबधीत विभाग प्रमुखाने दयावे.

**आयुक्त** तरोडा भागामध्ये ड्रेनेज व पाण्याच्या लाईन हे अमृत अभियानामध्ये समाविष्ठ करण्यात आली आहेत. अर्धवट राहीलेले प्रकल्प ते पुर्ण करण्यात या योजनतुन करण्यात येतील आम्ही प्रयत्न करीत आहोत 120 कोटीचे कर्ज हे घेण्याचा पुर्ण विचार करुन आणि पीएमडीओ यांच्याशी चर्चा करुन कर्जाची उभारणी करता येईल काय आणि मनपाचा त्यामध्ये निधी टाकुन राहीलेली कामे पुर्ण करण्यात येतील. ड्रेनेज लाईन ही शेतक-यामुळे अर्धवट राहीलेली असेल त्यातुनही आम्ही मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहोत. रुपये 66 लक्ष नसेल ते रु.66 कोटीचा निधी असेल.अंतर्गत असलेले ड्रेनेजचे काम जोडणी करण्यात येईल इतरही शिल्लक कामे पूर्ण करुन घेण्यात येईल. पुढच्या 7 ते 8 महीण्यात ही कामे घ्यावयाची आहेत. तीन वार्डातील असतील किंवा इतर मोठे कामे असतील ते करण्याचा पय्रतन करण्यात येईल. मोठे प्रकल्प आहेत त्याची अंमलबजावणी करणे सोईचे होणार आहे.

**आनंद चव्हान** सहाय्यक आयुक्त सेवा निवृत झाले आहेत त्यांना तुम्ही पेन्शन देता आणि श्री मोरे साहेब सेवानिवृत झाले त्यांचे पेन्शन हेतूपरस्पर थाबविण्यात आले आहे काय याचा खुलासा करावा. आता जे सहाय्यक आयुक्त काम करत आहेत त्यांच्या पगारी चालू आहेत त्यांच्या काम पगारी थांबत नाहीत. एकाला एक न्याय आणि दुस-याला एक न्याय असे करु नका. त्यांची पगार थांबवा. पेन्शन देवू नका. पंदेला नेहमी पैसे देत आहोत.दंड माफी केली आहे. स्थायी समितीकडे अपील करण्याचा अधिकार आहे. दंड लावला. तत्कालीन आयुक्तांनी मग त्यांनी अपिल स्थायी समितीकडे करावयास पाहीजे होते. त्यांनी अपील कोणाकडे आयुक्ताकडे केले आहे. या आयुक्तांना अधिकार आहेत काय अधिकार नसेल तर आयुक्तांने प्रस्ताव स्थायी कडे का पाठवला हे सांगा. स्थायी समितीची दिशाभुल केली आहे. मोरेश्वरच्या बाबत कलन (३) (क) नुसार तत्कालीन आयुक्तांनी रदद केले कि तो तत्कालीन रदद केले आणि तो उच्च न्यायालयाने सांगीतले प्रशासनाकडे जावे शासनाकडे जावे. ठराव करुन दिला 451 (4) नुसार शासनाने दिलेल्या आदेश रदद केला पुन्हा महापालिकेकडे त्यांनी अपील केले. ठराव घेतांना तत्कालीन आयुक्तांनी आम्हाला कोणतीच कल्पना दिली नाही आणि इतीवृत कायम होण्याच्या अगोदर त्या माणसाला पैसे दिले त्याची जिम्मेदारी फिक्स करा व त्यावर कार्यवाही करा आणि हायकोर्टात जावून मनपावर 19 कोटीचा दावा दाखल केला. पैसे दिले याला कोण जबाबदार आहे याबाबतचा खुलासा करावा.

**आयुक्त** सदस्यांनी सहाय्यक आयुक्ताचे पेन्शनचा जो मुददा आहे संबधीत कर्मचारी मला भेटला होता. मी आस्थापना विभागाला सुचना दिलेल्या आहेत. ज्या कर्मचा-याने काम केले आहे त्याचे आपण पेन्शन देतो त्यांना पैसे दया असे मी त्यांना सांगीतले आहे. रजा रोखीकरणाचे पैसे हे निधी अभावी राहीले असतील ते पण देण्यात येतील. पेन्शन हे कोणालाही थांबवता येत नाही व तो कोणाचा अधिकारही नाही. पंदेचा जो ठराव स्थायी समितीने घेतला आहे. तो शासनाने विखंडीत केला आहे असे आपण म्हणाले.

**आनंद चव्हाण** पंधेचा विषय नसुन तो मोरेश्वरचा आहे आपणास इत्यंभूत माहिती नसेल तर पुढील बैठकीत याबाबतची माहिती देण्यात यावी.

**आयुक्त** मी मा. महापौर महोदयांना विनंती करतो की, आपले जे प्रश्न आहेत ते 3 दिवस अगोदर दिल्यास त्याबददल सविस्तर माहिती सर्व साधारण सभेच्या सभागृहात देणे सोईचे होईल. महाराष्ट्र शासनाचे विधान सभेत जो प्रश्न उत्तराचा तास असतो.त्याच पध्दतीने आपली ही एक विधान सभाच आहे. जर प्रश्नाची यादी जर दिली तर त्याची निश्चीतपणे उत्तरे देता येतील.

**सभागृह नेता** प्रश्न उत्तराचा तास हा पक्ष निहाय न घेता विषय निहाय घेण्यात यावा अशी आपणास विनंती करतो. त्यावर सर्व पक्षातील नगरसेवकांना बोलणे सोईचे होईल.

**महापौर** तीन दिवस अगोदर सर्व सदस्यांनी प्रश्न दयावे त्यानुसार सर्वसाधारण सभे मध्ये त्याची उत्तरे देता येतील.

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** मागील आठ दिवसापुर्वी पत्र दिले होते त्यावर काही माहीती मिळत नाही.

**सतिश राखेवार** आनंदरावांनी जे मुददे मांडले आहे. त्याची खुलासा तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये माहिती देतो असे म्हणाले. आता अशी चर्चा आहे कि आपण सुटटीवर जाणार आहात आणि तुम्ही येणारच नाही अशी चर्चा आहे. मग त्याचा खुलासा कोण करणार.

**संजय मोरे** ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. लोकांनी त्याचे कनेक्शन घेतलेले आहे. याला प्लो नाही विषय अत्यंत गंभीर आहे हे बोलते वेळेस आम्ळी बोललेलो नाही.

**दिपकसिंह रावत** आम्ही खाली बसुन आहोत आम्ही उभे नाही असे असंविधानिक शब्द वापरण्यात आले.

**गोंधळ सुरु होता.**

**संजय मोरे** मी माझे शब्द वापस घेतो. रोडची जागा आहे ते लेआऊट झालेले आहेत ड्रेनेजची लाईन जाऊ देत नाहीत. जर एखादा माणुस त्याचा लेआऊट मधुन लाईन जावू देत नसेल तर ऐक्टच्या तरतुदीनुसार त्यावर काय कार्यवाही करणार आहात. लाईन टाकु शकता तर आतापर्यत का टाकण्यात आली नाही याचा खुलासा करण्यात यावा. आपल्याकडे दवाखाने आहेत, शाळा आहेत, सर्वानी जबाबदारीने काम केले तर आपणास काही अडचण येणार नाही कोणीही जबाबदारीने काम करायला तयार नाही. जेएनएनयुआरएममध्ये भुसंपादन करावयाचे आहे. ते करुन घ्यावे अशी विनंती आहे. अक्ट मध्ये तरतुद असेल तर किती दिवसात काम होणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** स.सदस्यांने अर्धवट कामाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे आपला पहिला पहिला प्राधान्यक्रम असा राहील की,यामधील जे काही अडथळे असतील ते तत्काळ दुर करण्यात येतील.जर भुसंपादनाची गरज असेल ती त्वरीत पुर्ण करुन घेण्यात येईल रस्ता, ड्रेनेज लाईन करण्यासाठी कोणी जर अडथळा करत असतील तर त्यावर निश्चीत अक्टमध्ये तरतुद आहे. जे कामे करणे आवश्यक आहेत ती लेखी देण्यात यावी.

**संजय मोरे** विभाग प्रमुखासमोर येवून कामे केली पाहीजेत. समोर येवूनकाम करण्यास कोणीही तयार नाही. ती माहिती आपणास दयावी.साईटवर यावे 4- 4 वर्षापासुन आम्ही पाठ पुरावा करीत आहोत.

**डॉ.करुणा जमदाडे** आम्ही 4-4 वर्षापासुन पाठ्पुरावा करीत आहोत मग त्याची दखल अधिकारी का घेत नाहीत. आम्ही दिलेल्या पत्राचे प्रशासन उत्तर देवू शकले नाही आम्ही टॅक्स भरतो कि नाही.

**दिपससिंग रावत** स्थगन प्रस्तावाचे वाचन करावे.

दिनांक १०.०८.२०१६ रोजीच्या मनपा सर्वसाधारण सभेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार कलम २ (व्ही) व कलम २ (ट) नुसार खालील सथगन प्रस्ताव देत आहे.

**प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील नियमबाहय सहाय्यक कार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता श्री गिरीष जाबवंतराव कदम यांच्या निवड सदर्भातील प्रक्रियेतील मान्यता दिलेल्या नियमबाहय प्रस्ताव व निवड संदर्भात चर्चा करुन महाराष्ट्र शासनाच्या संबंधीत विभागास अहवाल देणे बाबत.

**सुचक** :- रावत दिपकसिंह काशिनाथसिंह **अनुमोदक** :- गुरुखुदे सुंदरलाल

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

नावाशमनपा सभा कामकाज १९९७ मधील २ (ट) नुसार नांदेड वाघाळा शहर किंवा त्यातील रहिवासी यावर परिणाम होईल अशा अत्यंत निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या निश्चित गोष्टीवर चर्चा घडवुन आणण्यासाठी पालिका / आयुक्त / पिठासन अधिकारी यांचे समंतीने स्थगन प्रस्ताव मांडण्याची तरतुद आहे.

स. सदस्य यांनी सादर केलेला प्रस्ताव सेवाविषयक बाबीशी निगडीत असुन ही बाब सार्वजनिक हितासंबंधी निगडीत नाही त्यामुळे स्थग्न प्रस्ताव स्विकारणे नियमाकुल ठरणार नाही त्यामुळे सदर प्रस्ताव नाकारण्यात यावा.

**नगरसचिव** स्थगन प्रस्तावाचे वाचन केले....

**दिपससिंग रावत** आम्हाला स्थगन प्रस्ताव टाकण्याची ही वेळ का आली. किती दिवसापासुन या विषयावर माझी तक्रार होती.ती का सोडवता आली काही याचे उत्तर का मीळाले नाही.या मनपात कर्मचारी हे 40 टक्के बेकायदेशीर आहेत. मग मी त्यांना फासावर लटकु असे आयुक्तांच्या भेटीत त्यांनी सांगीतले. आपल्याकडून अशी भाषा वापरणे योग्य नाही या प्रश्नावर आस्थापना विभागातून मला उत्तर पाहीजे त्याची नियुक्ती कायदेशीर / बेकायदेशीर आहे कारण आयुक्त हे माहिती घेवून सांगतो असेच उत्तर देतात त्यामुळे आस्थापना विभागाने उत्तर दयावे. मला अशी माहिती मिळाली आहे की,असा प्रश्न देता येत नाही या भुमिकेत आयुक्त आहेत म्हणुन आयुक्तांची काय भुमीका आहे त्यांनी प्रथम स्पष्ट करावी.कारण हा विषय अत्यंत गंभीर आहे.तो नांदेड शहराच्या नागरीकाशी संबधीत आहे. म्हणुन त्यांना रेगुलर केले काय याची माहिती आस्थापनेने दयावी त्यांना टीएस करण्याचे अधिकार आहेत काय हे सांगावे. गुरु ता गददीमध्ये यांना टीएस करण्याचे अधिकार होत काय त्यांच्या या चुकिमुळे मनपाचे 17 कोटी रुपये गेले. मा. आयुक्त काय महापौर काय बोलतील हे मला मिनीटसवर पाहीजे. मी यांना निवेदन दिले होते त्यावर मला खुलासा मीळालेला नाही. मी यानंतर जे प्रश्न उपस्थित केरेल ते देखील मिनीटसवर आले पाहिजे मला या संदर्भात कोर्टात जावे लागेल. जर मला प्रशासनाने, सभागृहाने न्याय दिला नाही तर मी सीएम कडे तशी तक्रार केलेलीच आहे. मी नगरविकास खात्याचे मंत्री श्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे देखील लेखी तक्रार केलेली आहे. आपले जे पीए असतील त्यांना विचारा शासनाकडून ई-मेल आला कि नाही. शासनाने 23.7.2016 रोजी आपल्या कडे पत्र पाठविलेले आहे याचा अहवाल देण्यात यावा मला वाटते तुमच्या खालचे लोक मिसगाईड करीत आहेत. एखादया कर्मचारी बेकायदेशीर असु शकतो सगळेच कसे असु शकतात. एखादा जरी बेकायदेशीर असु शकतो. एखादा जरी बेकायदेशीर असला तरी ती तुमच्यावर जबाबदारी नाही काय ? हा जो नियम बाहय कार्यकारी अभियंता आहे. गिरीष कदम यांनी शहर अभियंता पदासाठी अर्ज केला होता. ते शहर अभियंता पदासाठी मुलाखतीसाठी पात्र करण्यात आले होते. मग ते कार्यकारी अभियंता झाले कसे ? मुलाखतीच्या वेळी चार लोक आले होते त्या समितीने शेरा मारला आहे की, चारही उमेदवार पात्र नाहीत. मग तत्कालीन सर्वसाधारण सभेने सहाय्यक कार्यकारी अभियंतासाठी प्रस्ताव आला होता. आणि इतीवृत तयार करत असतांना कार्यकारी अभियंताचा प्रस्तावात आला. सर्व साधारण सभेतील सदस्यांना कोणालाही माहित नव्हते. श्री विरेंद्रसिंघ, गील महाराज, सुधाकर पांढरे हे सभागृहात होते यांनी या इतीवृतात आक्षेप नोंदविला होता. तेव्हाचे महापौरानी आक्षेप स्विकारला होता. कार्यकारी अभियंता राहु दयावे. कार्यकारी अभियंता करत असतांना तीन वर्षाची कमीत कमी अनुभव पाहीजे. त्यांना एकच वर्षात कार्यकारी अभियंता कसे केले. या पदाची मान्यतानसतांना त्यांना लाभ देत आहोत. त्या पदाचे सर्व सुख सुविधा देत आहोत. गाडी, कॅबिन, खुर्ची या सुविधा पुरविल्या आहेत. या सोयी कोणत्या आधारे देत आहोत. 16 नोव्हेबर 2006 ला कोल्हापुर मनपात मिराशे यांनीकेस दाखल केली होती. त्या संदर्भात शासनाचे एक परीपत्रक निघाले होते की, नियुक्तीच्या संदर्भात काही कोणाचे आक्षेप असले तर त्यात आयुक्तांना दोषी धरण्यात येईल असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे या संदर्भात दुसरे असे की, सर्वोच्च न्यायालयात उमादेवी विरुध्द कर्नाटक अवैध नियुक्ती झालेली आहे. त्यामध्ये आयुक्तांना जबाबदार धरण्यात येईल दि.17.6.2016 चा एक निर्णय आहे संदीप विरुध्द राजगोरे या केसमध्ये यामध्ये सुध्दा कोर्टाने मार्गदर्शन केले. जर अवैदय नियुक्ती झाली असेल तर त्यास आयुक्त जबाबदार असतील.आयुक्त जर दोषी नसतील तर आमच्या पत्राला उत्तर दिले असते. कलेक्टर साहेब, खोडवेकर साहेब हे सभागृहात राहत होते, खोडवेकर साहेबानी उत्तर दिले की यांची नियुक्ती पर्यवेक्षीत काळापुरती केली आहे. आणि तेही सर्व साधारण सभेच्या मान्यतेने मग उदया आमचा शिपाई राठोड यांना तुम्ही सर्व साधारण सभेच्या मान्यतेने उपायुक्त करता काय ? आम्ही सभागृहात ठराव करुन देऊ

तुम्ही करता काय ? कलम 451 म्हणुन आयुक्तांना अधिकार नाहीत काय आणि मग मा. आयुक्त साहेब दि.12.10.2013 नुसार एक परिपत्रक आपणास दिले होते. जे शासकिय कर्मचारी त्याच्या मुळ पदासाठी पात्र नव्हते अशावर कार्यवाही करण्यात यावी हे तर लेखी झाले आयुक्त साहेब तुमच्या खालचे जे कर्मचारी आहेत मंत्रालयातून पत्र येते व ते तुम्हालादाखवत नाहीत शासनाकडून पत्र हे ईमेलच्या सहाय्याने पाठविण्यात येते तुमचा पीए असेन किंवा ऑपरेटर पंतगे असेल यांनी तुम्हाला ईमेल दाखवित नसेल काय हया पत्रावर आपा काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.आम्हाला तर कोर्टात जावयाचे आहेच मग तत्कालीन आयुक्त असो किंवा रनिंग आयुक्त असो किंवा कोणी असो. मुख्यमंत्री असेल किंवा नगर विकास विभागाचे कोणी असतील मंत्रालयातून चंद्रकांत पाटील साहेबांनी त्या पत्रावर मोस्ट आयएमपी असा शेरा मारुन मेल केला होता. चुक असेल तर आम्हाला उत्तर देऊन टाका आमच बोलेणे फेटाळा ही बाब मिनीटसवर येवू दया केवळ आम्हाला आपल्या अहवालाची गरज आहे म्हणून तीन महिने थांबलो आहे. केवळ मला सर्वसाधारण सभेचे इतिवृत व आपले मत पाहिजे आहे.मी कोर्टात जोने निश्चीत केले आहे.मंत्र्याच्या पत्राला आपण उत्तर देत नाही तर सामान्य नगरसेवकाच्या पत्राचे उत्तर कसे दणार मी आपणास एवढे परिपत्रक दिले आहे. त्या परिपत्रकाच्या आधारे काय अहवाल देणार हे सांगावे.भविष्यात आकृतीबंध आहे. यामध्ये कोणाचेही नुसकान होऊ नये आम्ही कर्मचा-याच्या पोटावर मारणारी माणसे नाहीत. जे कोणी चुकीचे बरतील त्यांना आम्ही वेठीस धरु. नगरसेवकांनी चुक केली तर त्याला आपण धरता ही एकठया दिपकसिंग रावतची बाजू नसतून सर्व जनतेची बाजू आहे. भविष्यात भरती होणार आहे त्या भरत्या तुम्ही बेकायदेशीर करणार आहात काय याचा खुलासा करण्यात यावा. आपले सेवा नियमच अंतीम झालेले नाहीत. तत्कालीन आयुक्त श्री जी. श्रीकांत यांनी सर्व साधरण सभेची मान्यता घेवून शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यावेळेस पाठविलेला आणि आतातच्या नियमात बरीच तफावत आहे. शासनाने जी माहीती मागीतली होती ती माहीती आपण का दिली नाही मी पत्र दिले त्याचे ही उत्तर दिले नाही त्यावेळेस तुम्ही चौरे व पाटील यांना बोलू नका मला बोला म्हणून आयुक्त साहेब सभागृहात मी तुम्हालच बोलता, तुम्ही या प्रकरणात काय कार्यवाही केली हे सांगावे. तुम्ही कर्मचा-यांच्या समोर आम्हाला बोलता की त्यांना बोलायचे नाही मग आम्ही इथे कशासाठी आलो आहोत. आपण एक जबाबदार व्यक्ती आहात तुम्हाला दोन वर्षानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी व्हावयाचे आहे. या संदर्भात आमच्या कडून काही चुक होवू नये याचा आम्हाला खुलासा करावा.

**आयुक्त** — महापौराच्या परवानगीने स्थगन प्रस्तावावरती आता एका कर्मचा-यांच्या संदर्भात विचारणा झालेली आहे की 2006 च्या दरम्यान या कर्मचा-याची भरती करण्यात आली होती या भरती संदर्भात शासनास निश्चीतपणे अहवाल पाठविण्यात येईल.

**दिपकसिंह रावत** — संबधीत संगणक विभागाच्या कर्मचा-यास विचारणा करा इमेल आला काय जर आला नसेल तर तो माझ्याकडे आहे मी आपणास देतो. इमेलची व पत्राची प्रत माझ्याकडे आहे ती देतो नगरसेवकांनी प्रश्न विचारला की, माहिती देतो. खुलासा करतो असे म्हणता पण कार्यवाही करा हे मी कोर्टात जाणार आहे.

**आयुक्त** — जो प्रश्न स.सदस्याने घेतलेला आहे त्यात आयुक्त जबाबराद आहेत व आयुक्तच जबाबदार राहतील. जर एखादया कर्मचा-याच्या संदर्भात मागील दहा वर्षापुर्वी तीस वर्षे चाळीस वर्षापुर्वी जे निर्णय घेण्यात आलेले आहेत त्याला आता तपासतांना कायदयाच्या चौकटीत राहुन निर्णय घ्यावे लागतात. आम्ही त्यांना पाठीशी घालत आहो किंवा कर्मचा-यांना संरक्षण देत आहोत असे काही नाही. या मनपात कदाचीत नसेल कर्मचा-यांच्या हातून काही गोष्टी होवू शकतात. ब-याच वेळा अधिका-यावर दबाब तंत्राचा वापर करण्यात येतो अशा वेळी त्या कर्मचा-याच्या बाजूने प्रशासन राहु शकते. या संदर्भात नियुक्तीचा स्पेसीफीक जो विषय आहे की, त्यांना शहर अभियंता म्हणून का घेण्यात आले ही नियुक्ती 2006 ची आहे आणि ती सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने घेण्यात आलेली आहे. सर्व साधारण सभेने मान्यात करण्यात आली आहे. माझी अशी भुमीका असणार आहे की, अनाठायी अधिकारी कर्मचारी यांच्यावर दबाव तंत्राचा वापर होवून शकतो. 2006 साली सक्षम प्राधिकरणाने उप कार्यकारी अभियंता की कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती केलेली आहे. आता जो त्यांना शहर अभियंताचा अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. अतिरीक्त कार्यभार ही पर्यायी व्यवस्था होईपर्यत देता येवू शकतो मी इथुन काय जाणार नाही. पिठासन अधिकारी हे निर्णय देतील त्या वेळेसच्या महासभेने घेतलेला निर्णय आता तपासण्यासाठी दिलेला आहे. त्याची तपासणी करुन त्याचप्रमाणे निश्चीतपणे कार्यवाही करण्यात येईल. शहर अभियंता जो पर्यत मिळणार नाही. तो पर्यत कार्यभार हा त्यांच्यावर राहील. त्यांच्या कडुन सुध्दा वारंवार सुचना येतात की हा पर्यायी व्यवस्था होईपर्यत देता येवू शकते. पिठासन अधिकारी हे निर्णय देतील त्यावेळेसच्या महासभेने घेतलेला निर्णय आता तपासण्यासाठी दिला तर त्याची तपासणी करुन त्याच प्रमाणे निश्चीतपणे कार्यवाही करण्यात येईल. शहर अभियंता जो पर्यत मिळणार नाही. तोपर्यत कार्यभार हा त्यांच्यावर राहील. त्याच्या कडुन सुध्दा वारंवार सुचना येता की हा शहर अभियंता या पदाचा कार्यभार काढून घेण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे. त्यामुळे सक्षम अधिकारी मिळाल्यानंतर

त्यांच्या कडील कार्यभार काढून घेण्यात येईल. मनपा अधिकरी / कर्मचारी यांच्यावर दबाची भुमीका असू नये. या भुमीकेत आहे या मनपाकेत नसेलही असे मला वाटते तत्कालीन 2006 ला सर्व साधारण सभा ही सक्षम प्राधिकरणाने घेतलेला निर्णय आहे.

**दिपकसिंग रावत** त्या अधिका-याचे आपण पाठ राखन करीत आहात. शहर अभियंता यांचा कार्यभार अधिकृत आहे. त्याची भरती बेकायदेशीर आहे. बेसीकच बरोबर नाही तर त्यांच्याकडून काय काम करुन घेता त्यांची नियुक्ती ही कायदेशीर आहे असे आपण म्हणा ते मिनीटसवर येवु दया व त्याच्या कापीज मला देवुन टाका.

**आयुक्त** मा. महापौराच्या परवानगीने 2006 साली सक्षम प्राधिकरणाने म्हणजे महासभेने घेतलेला तो निर्णय आहे जर महासभेने पुर्नविचार करायला सांगीतले तर त्यांनतर कार्यवाही करण्यात येईल.

**दिपकसिंग रावत** महापौराच्या परवानगीने बोलतो. शासनाचे पत्र आले त्याचा काय अहवाल दिलेला नाही माझ्या पत्राचे उत्तर का दिले नाही.मला माझ्या पत्राचे लेखी उत्तर देण्यात यावे परीणाम काय येतील हे आम्हास सांमू नये त्या कर्मचा-याच्या बाबतील आम्हाला लेखी दयावे.

**महापौर** आपणास लेखी देण्यात येईल आता आपण आपल्या जागेवर बसावे.

**सभागृह नेता** बोलतांना ब-याच काही गोष्टी बोलून गेल्या आणि तरीही कर्मचा-याच्या बाबतीत मागील 25 वर्षापासून सभागृहात आहोत. कधीही कर्मचा-याच्या बाबतीत आक्षेप घेतलेला नाही मागे तर एक कमीशनर होता तो एके 56 होता त्यांने 56 लोकांना बडर्तफ केले. एका कमीशनरने तर 50 लोकांना निलंबीत केले काम मी तुम्हाला म्हणालो की सणा सुदीचे दिवस आहेत. श्री देशमूख व कुलकर्णी यांना कामावर घेण्यात यावे. या सभागृहातील सर्व सदस्य हे कर्मचा-यांच्या कामावर घेण्यात यावे. या सभागृहातील सर्व सदस्य हे कर्मचा-याच्या पाठीशी ताठपणे उभे राहतात. आयुक्तांनी टरमीनेट केले तर येवलेच्या संदर्भात आम्ही टर्मीनेशन न्यायालयातील बाबी मागे घेण्यास सांगीतले या सभागृहाने नेहमीच कर्मचा-याची पाठराखन केली आहे. हा विषय या ठिकाणी का आला हेही महत्वाचे आहे. नियम काय म्हणतात यात मी खोलवर जात नाही श्री दिपकसिंग यांनी म्हटल्याप्रमाणे आम्ही या विषयावर सगळयात जास्त इतीवृत मीच जास्त बोललो आहे. आम्ही 5-5 तास एका विषयावर बोललेलो आहोत. रत्नाकर वाघमारे यांची नियुक्ती 1980 ला झालेली आहे त्यांच्यावरही काही प्रश्नावाबत नागरीक तक्रारी करतात. दिपकसिंग हे मागील 15 वर्षापासुन मनपात आहेत. त्यांनी कधीही कोणत्याही अधिका-यांची तक्रार केलेली नाही. त्यांनी उलट कर्मचा-याची पाठराखन केलेली आहे. आज त्यांनी स्थगन प्रस्ताव मांडण्यापर्यंत आलेले आहेत. इतक्या पाठीमागे लागण्याचे कारण काय आहे हे सर्वात महत्वाचे आहे. तिथपर्यंत पोहचणे आवश्यक आहे हे सभागृह त्यांच्या पाठीमागे आहे तसे तुम्हीही आहात. कर्मचा-यानीही काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहीजे. हे प्रकरण वाढले का याची आपण शहानिशा करावी. भुमिका दोघांची संयमाची राहीली पाहीजे एकाने संयमानची व दुस-याने ताठर भुमिका घ्यायची हे बरोबर नाही. जसे तुम्हाला मनपात काम पाहीजे त्यासाठी प्रत्येकाचा मानसन्मान केला पाहिजे. मागील दोन वर्षापासुन काही घटना पाहील्या तर गिरीष कदम यांचे चुकले आहे. दुस-याचा आपमान करीत असतांना आपला सन्मान जातो याचा आपण विचार केला पाहीजे. श्री दिपकसिंगचे एक कारण नाही तर 2-3 कारणे आहेत तेव्हापासुन चालू आहे त्यामुळे त्यांनी ही भुमिका घेतली आहे. श्री कदम बददल राग ब-याच लोकांच्या मनात आहे. पाठराखन करतांना तुम्ही त्यांना तंबी दिली पाहीजे पदाधिका-या सोबत नगरसेवकासोबत कसे वागायचे हे सांगा आमची कामे होतील नाही होतील.कामाबददल त्यांची तक्रार नाही आहे. सर्वाचा मान सन्मान राखला पाहीजे. पदाधिका-याने बोलविले तर कसे बोलावे कारण त्यांना आचारसंहिता आहे. नगरसेवक बोलतील. पदाधिका-याचा मला राखलापाहीजे. मान राखरा नसल्यामुळे हे घडत आहे. त्यांच्या कामाबदल आम्हाला आक्षेप नाही पण त्यांच्या बागण्याबददल आक्षेप आहे. यासाठी आम्ही दिपकच्या पाठीमागे आहोत.एखादा कर्मचारी नगरसेवकासोबत उध्दटपणे वागत असेल तर त्याची पाठराखन करु नये. मी महापौराना विनंती करतो त्याची सविस्तर माहीती श्री कदम यांच्याकडून घ्यावी त्यांनी चुक झाली असे आम्हालाही सांगीतले.

**महापौर** लोक प्रतिनीधीला बोलताना स्वत:चा ही सन्मान राहीला पाहीजे. स.सदस्याचाही सन्मान कसा राहील याची काळजी घेण्या यावी इतक्या वर्षापासुन सगळे एकत्र काम करीत आहोत. आपल अधिकारी/ पदाधिकारीअसे संबंध राहीले नाही तर ते घरगुती संबध सगळयाचे झालेले आहेत. आपण बोलत असतांना कोणाला बोलत आहोत. पदाधिकारी हे व्यवस्थीत बोलत असतात. अधिका-याने देखील वैयक्तीक न घेता कदमाच्या बाबतीत ब-याच तक्रारी आलेल्या आहेत. ते उध्दटपणे ते पदाधिका-याशी / स.सदस्याची बोलतात. श्री कदम यांना मी आदेश देते की त्यांनी सव्र सभागृहाच्या समोर दिलगीरी व्यक्त करावी त्यांची कडून काही चुक झाली असेल तर त्यांनी येथे येवून दिलगीरी व्यक्त करावी. स्थगन प्रस्तावावर चर्चा झालेली आहे याचा महाराष्ट्र शासनाला अहवाल पाठवावा.

**सरजितसिंघ गिल** महापौर मॅडम हे प्रकरण आपणास सामजंस्याने मिटवावयाचे आहे. तर अहवाल पाठविण्याची काही गरज नाही आता जर स्थगन प्रस्ताव आहे की नाही याच्यावर चर्चा करावी लागणार आहे. परंतू पदाधिकारी व अधिकारी याचा ताळमेळ चांगला राहीला पाहिजे त्या दृष्टीने आयुक्त आणि महापौर यांना आपल्या कक्षामध्ये दोघाला

| | |
|---|---|
| | एकत्र बोलवावे व सामजंस्याने प्रकरण मिटवले पाहीजे. कारण स्थगण प्रस्ताव होवू शकत नाही त्याच्या स्वभावामुळे मनस्थाप झाला असेल यात वाद नाही. |
| **दिपकसिंह रावत** | पत्रकाराला धमकी दिली होती. कपडे काढले होते. त्यांना हैपर स्टेशन आहे त्याची पाठराखन श्री गिल महाराज करु नये अशी माझी इच्छा आहे. मी नियमानेच बोलत आहे. |
| **महापौर** | माझ्या कक्षात श्री दिपकसिंह व श्री गिरीष कदम यांना बोलावून घेईल त्यांच्यातील काही मदभेद असतील तर ते त्या ठिकाणी मिटवून घेण्यात येतील. |
| **दिपकसिंह रावत** | मला केवळ लेखी देवून टाका आयुक्त साहेब हे शहानिशा करतील. |
| **सभागृहनेता** | श्री दिपकसिंह यापुर्वी कोणत्याही कर्मचा-या पाठी मागे लागले नाही जानुन बुजून हे कृत्य केलेले नाही. या ठिकाणी येवून कदम यांनी खुलासा करावा त्यांचेकडून काय चुक झाले ते या ठिकाणी येवून करावा. |
| **आनंद चव्हाण** | मा. महापौर मॅडम नगरसचिवानी सांगावे की हा स्थगन प्रस्ताव होतो का हे सांगावे. आणि त्यांना काय कारणे आहेत हे सांगा. त्यानंतर त्यांना येथे बोलवावे स्थगन प्रस्ताव केव्हा येतो. |
| **दिपकसिंह रावत** | जातीपातीचे राजकारण या ठिकाणी करु नये हा सार्वजनिक विषय आहे. |
| **आनंद चव्हाण** | स्थगन प्रस्ताव होत की नाही हे प्रथम सांगावे प्रथम यावर आपण बोलावे श्री कदम यांना बोलू नका. प्रथम हा प्रस्ताव होत का ते नियमाने सांगावे. |
| | **गोंधळ चालू होता.** |
| **अब्दुल सतार** | स्थगन प्रस्ताव घेता येते का ? या पत्रकार लोक आपणास बघत आहेत यांना आपल्या कॅबीनमध्ये घेवून जावे. त्या ठिकाणी यांचा प्रश्न सोडवावा. |
| **आनंद चव्हाण** | स्थगन प्रस्ताव होतो का हे सांगा. नगरसचिव यांनी या ठिकाणी नमुद करावे अगोदर सभागृहात सांगावे. |
| **दिपकसिंह रावत** | महापौराचा अधिकार आहे. त्यांनी तो स्विकारला आहे. |
| **उप महापौर** | महापौर मॅडम व स. सभागृह नगरपालिका कोणत्याही संस्थेचे कामे निवडून आलेले प्रतिनिधी प्रशासन यांच्या समन्वयाने करीत आलेलो आहोत. काही शिकायते ही प्रशासनाची आहेत आम्ही नगरसेवकाची सुध्दा आहेत. कारण आम्ही या पेक्षा जास्त कठोर वेळ बघीतली आहे तेंव्हा बेबनाव होतांना त्या वेळी सुध्दा पाहीले आहे. परंतू आम्ही संस्थेच्या हीतासाठी आम्ही समोर राहीलेलो आहे. आमच्या मतभेद खतम केले श्री दिपक रावत हे चांगले नगरसेवक आहेत अभ्यासु आहेत, मी वैयक्ती विनंती करतो की, कायदयाच्या भाषेत न जाता ब-याच गोष्टी समोर येतील त्यांच्या देखील येतील आणि आमच्या देखील समोर येतील याच्यातून संस्थेचे नुकसान होईल. मी दोघा नाही विनंती करतो की त्यांनी हा प्रश्न या ठिकाणी मिटवण्यात यावा या ठिकाणी कदम यांनी यावे. |
| **आंनद चव्हाण** | पहीले प्रस्ताव होते का हे सांगा |
| | **गोंधळ चालू होता.** |
| **विरोधी पक्ष नेता** | उपमहापौर यांनी एवढे सांगितल्यानंतर ही अग्रेसिव्ह भुमिका घेण्याची काय गरज आहे. काय या ठिकाणी जातीवादीचे राजकारण करावयाचे आहे काम हे सांगा आम्ही सामंजस्याची भुमिका घेत आहोत त्यांना एवढे अग्रेसिव्ह होण्याचे कारण काय ? |
| **महापौर** | श्री गिरीष कदम यांनी समोर येवून खुलासा करावा. |
| **श्री गिरीष कदम** | मा. महापौर यांच्या परवानगीने बोलतो. यापुर्वीही मोबाईलवर श्री दिपकसिंग रावत स. सदस्य यांची माफी मागीतली आहे आणि या ठिकाणी सभागृहात दिलगिरी व्यक्त करतो. |

**ठराव क्रं.४९** **ठराव**

श्री दिपकसिंह रावत यांनी जो स्थगन प्रस्ताव मांडला होता त्यास श्री गिरीष कदम कार्यकारी अभियंता यांनी सभागृहात दिलगीरी व्यक्त केल्याने सदस्य व अधिकारी या दोघांचे एकमेका बद्दलचे मतभेद संपुष्टात आलेले आहेत त्यानुसार स्थगन प्रस्ताव सर्वानुमते नामंजुर करण्यात येते

**महापौर** विषय पत्रिका चालु करावी.

## कार्यक्रम पत्रिका

## विषय क्र.०१

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१६ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

**वैद्यकिय आरोग्य अधिकारी** मुला मुलींची गुणवत्ता यादी सादर करण्यात येत आहे त्याची नोंद घेणे बाबत.

**एकूण जन्म २०१६**

| अ.क्र. | महिना | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १६३९ | १४५० | ३०८९ | ८८४.६९ |
| २ | फेब्रुवारी | १६३२ | १४८१ | ३११३ | ९०७.४७ |
| ३ | मार्च | १६५७ | १३९६ | ३०५३ | ८४२.४८ |
| ४ | एप्रिल | १०२२ | ९३३ | १९५५ | ९१२.४८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मे | ९३४ | ९११ | १८४५ | ९७५.३७ |
| ६ | जुन | ८०८ | ७४२ | १५५० | ९१८.३७ |
| ७ | जुलै | ८५३ | ८७७ | १७३६ | १०२०.९५ |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं.५०** **ठराव**

नावाशमनपा हद्दीतील लिंग गुणोत्तर मुला मुलींचे प्रमाणाची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**एकूण जन्म २०१६**

| अ.क्र. | महिना | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १६३९ | १४५० | ३०८९ | ८८४.६९ |
| २ | फेब्रुवारी | १६३२ | १४८१ | ३११३ | ९०७.४७ |
| ३ | मार्च | १६५७ | १३९६ | ३०५३ | ८४२.४८ |
| ४ | एप्रिल | १०२२ | ९३३ | १९५५ | ९१२.४८ |
| ५ | मे | ९३४ | ९११ | १८४५ | ९७५.३७ |
| ६ | जुन | ८०८ | ७४२ | १५५० | ९१८.३७ |
| ७ | जुलै | ८५३ | ८७७ | १७३६ | १०२०.९५ |

## विषय क्र.०२

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे

**सौ. अनुजा तेहरा** मला यावर बोलावयाचे आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियांन अंतर्गत कांही दिवसापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालये येथे VC झाली होती त्या VC मधून आम्ही भारतातील इतर शहराची स्वच्छ अभियानाची तयार पाहीली ब-याच शहरांनी फारच नियोजनबध्द तयारी केली त्यादृष्टीने आपल्याला अजून बराच मोठा कार्य करावे लागणार त्या दिवशीच्या VC मध्ये कैंद्रीय मंत्री मा. व्यंकय्या नायडूजी यांनी संबोधीत केले ही VC एकाच दिवशी एकाच वेळी भारतातील सर्व प्रमुख शहरा मध्ये Live होती. स्वच्छ महाराष्ट्र अभियान मध्ये OD Free City करण्याचे आपला लक्ष आहे यामध्ये सुध्दा छोठया मोठया Technical बाबीमुळे खरे लाभार्थी वंचीत राहत आहेत `` घर तेथे शौचालय `` ही संकल्पना सत्यता उतरविण्याकरिता तांत्रिक बाबींमध्ये न अडकता प्रत्यक्ष काम घेणे अत्यंत आवश्यक आहे असे माझे स्पष्ट मत आहे. शोचालय बांधकाम केलेल्या लाभार्थ्यांना वेळेच्या वेळी त्यांनी केलेल्या बांधकामाचे धनादेश वितरीत करण्याच्या प्रणाली मध्ये तात्काळ सुधारणा आवश्यक आहे.

सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर प्रशासनाने विषय आणायचा व आपण केवळ त्याची नोंद घ्याची अशाने भागणार नाही या विषच्या अनुषंगाने आपण साधक बाधक चर्चा करणे आवश्यक आहे असे मला वाटते. तसेच संपूर्ण शहरामध्ये जे लाभार्थी शौचालय योजनेपासुन वंचीत राहीले आहेत त्यांचा फेरसर्व्हे करण्यात यावा अशी माझी सुचना आहे.

**डॉ. करुणा जमदाडे** सिडको एरीया मध्ये सर्व्हे झालेले नाही त्या ठिकाणी ब-याच लोकांना याचा फायदा मिळालेला नाही स्वच्छ महाराष्ट्र अभियांन आपण आढावा घेण्याचे सांगीतले आहे आरक्षीत व दलीत वार्ड यांचा देखील विचार व्हावा. लुंबिनीनगर,राहुलनगर, वाघाळा या वस्त्या गेल्या 25 वर्षापासुन असुन यामध्ये ड्रेनेज लाईन नाही. जेएनएनयुआरएम या सर्वेमध्ये हा भाग आलेला नाही गेल्या चार वर्षापासुन मी याचा पाठपुरावा करीत आहे आजही ते लोक उघडयावर शौचास जातात आपण स्वच्छ भारत स्वच्छ महाराष्ट्र करण्याच्या मागे लागलेलो नाही. आज आम्हाला लोकांना उत्तरे देणे अवघड झाले आहे. आम्ही मनपाचा कर भरतो कि नाही दलीत वस्त्या सुधारल्याशिवाय स्वच्छ महाराष्ट्र होणार नाही आणि देशही स्वच्छ होणार नाही स्वच्छ शहर कितीही म्हणले तरी ते होणार नाही भिंती रंगवल्या म्हणुन शहर स्वच्छ होत नाही दलीत वस्तीतील कामे पुर्ण करावी लागतील. रस्ते, ड्रेनेज, नाल्या नाहीत. हे सर्व आजही प्रलंबित आहे. आधी दलित वस्त्या स्वच्छ करण्यात याव्यात मगच या योजनेचा फायदा होईल अन्यथा सर्व काही झीरो राहील.

**नगरसचिव** उपआयुक्त स्वच्छ महाराष्ट्र अभियांन यांचे पत्र क्रं स्वमअ/६१७५/१६ दि. ०९.०८.२०१६ महासभेत प्राप्त दिनांक १०.०८.२०१६ अन्वये प्रशासकिय टिप्पणी खालील प्रमाणे सादर करण्यात आलेली आहे

| **आजपर्यंत झालेली कार्यवाही** | **दि.०९.०८.१६ अखेरची** |
|---|---|
| एकूण वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी प्राप्त अज | ५०७३ |
| व्यक्तीक शौचालय बांधकामाची तपासणी व मान्यता (अभियंत्याव्दारे) | २५८४ |
| नाकारलेल्या अर्जाची संख्या | २४८९ |
| कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांची संख्या | १२५५ |
| खात्यात जमा केलेल्या निधी लाभार्थीची संख्या | ०७३६ |

| | |
|---|---|
| एकूण कार्यारंभ दिल्याची संख्या | १९९१ |
| सुरु असलेल्या कामांची संख्या | १२५५ |
| कंत्राटदारानी पुर्ण केलेल्या कामांची संख्या | ११४९ |
| लाभार्थ्यांना सुरु केलेल्या कामांची संख्या | ०२२० |
| बांधकामपुर्ण झालेल्या कामांची संख्या | ११४९ |
| संकेतस्थळावर फोटो अपलोड झाल्याची संख्या | १०७२ |
| एकूण प्राप्त अनुदान (सर्व घटकांसाठी) | ३.२४ कोटी |
| एकूण खर्च | १.५३ कोटी |
| स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत झालेला खर्च | ६४.६६ |
| ७३६ लाभधारकांना वितरीत केलेला निधी | ००.४४ कोटी |
| चौदाव्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतुन झालेला खर्च | ४१.३४ कोटी |
| **एकूण** | **२.०१५ कोटी** |

**महापौर** शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. ५१** **ठराव**

नावाशमनपाकेतील उपआयुक्त स्वच्छ महाराष्ट्र अभियांन यांचे पत्र क्रं स्वमअ/६१७५/१६ दि. ०९.०८.२०१६ महासभेत आढावाची माहिती सादर केलेली असुन त्याची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

| **आजपर्यंत झालेली कार्यवाही** | **दि.०९.०८.१६ अखेरची** |
|---|---|
| एकूण वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी प्राप्त अज | ५०७३ |
| व्यक्तीक शौचालय बांधकामाची तपासणी व मान्यता (अभियंत्याव्दारे) | २५८४ |
| नाकारलेल्या अर्जाची संख्या | २४८९ |
| कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांची संख्या | १२५५ |
| खात्यात जमा केलेल्या निधी लाभार्थीची संख्या | ०७३६ |
| एकूण कार्यारंभ दिल्याची संख्या | १९९१ |
| सुरु असलेल्या कामांची संख्या | १२५५ |
| कंत्राटदारानी पुर्ण केलेल्या कामांची संख्या | ११४९ |
| लाभार्थ्यांना सुरु केलेल्या कामांची संख्या | ०२२० |
| बांधकामपुर्ण झालेल्या कामांची संख्या | ११४९ |
| संकेतस्थळावर फोटो अपलोड झाल्याची संख्या | १०७२ |
| एकूण प्राप्त अनुदान (सर्व घटकांसाठी) | ३.२४ कोटी |
| एकूण खर्च | १.५३ कोटी |
| स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत झालेला खर्च | ६४.६६ |
| ७३६ लाभधारकांना वितरीत केलेला निधी | ००.४४ कोटी |
| चौदाव्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतुन झालेला खर्च | ४१.३४ कोटी |
| **एकूण** | **२.०१५ कोटी** |

## विषय क्रं.०३

नावाशमनपा चा वर्ष २०१२-१३ चा स्थानिक निधी लेखापरिक्षा (मनपालेप) औरंगाबाद यांना लेखापरिक्षण अहवाल प्रापत झाला असुन सदरील अहवालास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७ (अ) नुसार सदर लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करेल त्यानंतर आयुक्त मनपा महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार अहवालावर आवश्यकती पुढील कार्यवाही करेल असे नमुद आहे त्यामुळे सदर लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभे समोर सादर करुन मान्यता प्राप्त घेण्यात यावी तदनंतर अहवालावर आवश्यकती पुढील करण्यात येईल **(सुलभ संदर्भासाठी सोबत वर्ष २०१२-१३ च्या अहवालाची छायांकीत प्रत जोडण्यात येत आहे)**

**महापौर** लेखा परिक्षण अहवालास मान्यता देण्यात येते . या लेखा परिक्षण अहवालावर आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.५२** **ठ रा व**

स्थानिक निधी लेखा परिक्षा औरंगाबादने नांदेड वाघाळा शहर महागनरालिकेचे सन २०१२-२०१३ लेखा परिक्षण केलेले असून या लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती सर्व स.सदस्यांना देण्यात आलेल्या आहेत. करीता नांदेड वाघाळा शहर महागनरालिकेचे सन २०१२-२०१३ चे लेखा परिक्षण अहवालास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. आयुक्तांनी नियामानुसार या लेखा परिक्षण अहवालावर पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

## विषय क्र.०४

श्री सय्यद महेमुद सय्यद करीम यांना सक्तीने सेवानिवृत्त केल्या बाबत श्री स. लायख पिता स. महेमुद याला अनुकंपा तत्वावर सेवेत घेण्याबाबत नावाशमनपाकेच्या सर्व साधारण सभेने दिनांक ३०.११.२०१५ रोजी समंत केलेला ठराव क्रं. ९३ अन्वये ठराव

समंत केलेला होता. तथापि सदरचा ठराव प्रशासकिय टिप्पणीच्या विरुध्द व नियमबाहय असल्याने सदरचा ठराव विखंडीत करणेसाठी शासनस प्रस्ताव सादर करण्यात आला असता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-२०१६/प्र.क्र.१५/नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २० मे २०१६ च्या शासन निर्णयाव्दारे सदरील ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदरचा ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१(१) मधील तरतुदी विचारात घेता निलंबीत करण्यात आला आहे त्याची नोंद घेणे बाबत. **(सुलभ संदर्भासाठी शासन निर्णयाची छायांकीत प्रत जोडण्यात आली)**

**अब्दुल सतार** एक समिती गठीत करण्यात यावे.

**महापौर** शासनाने मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. ९३ दि. ३०.११.१५ निलंबीत केलेला असुन त्यांची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते

**ठराव क्रं. ५३** **ठराव**

श्री सय्यद महेमुद सय्यद करीम यांना सक्तीने सेवानिवृत्त केल्या बाबत श्री स. लायख पिता स. महेमुद याला अनुकंपा तत्वावर सेवेत घेण्याबाबत नावाशमनपाकेच्या सर्व साधारण सभेने दिनांक ३०.११.२०१५ रोजी समंत केलेला ठराव क्रं. ९३ अन्वये ठराव समंत केलेला होता. तथापि सदरचा ठराव प्रशासकिय टिप्पणीच्या विरुध्द व नियमबाहय असल्याने सदरचा ठराव विखंडीत करणेसाठी शासनस प्रस्ताव सादर करण्यात आला असता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-२०१६/प्र.क्र.१५/नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २० मे २०१६ च्या शासन निर्णयाव्दारे सदरील ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदरचा ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१(१) मधील तरतुदी विचारात घेता निलंबीत करण्यात आला आहे त्याची नोंद हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

## विषय क्रं.०५

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/२४९७/१६ दिनांक २७.५.१६ अन्वये महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रं. निमवा/२०१६/प्र.क्र.१६/सेवा-४/ दि. ६ फेब्रुवारी १६ अन्वये महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे निवृत्ती वेतनावर का.आ.क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/१५६६६/१६ दि. ०१. मार्च १६ च्या आदेशानुसार दिनांक १ जुलै १६ पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ११३% वरुन ११९% करण्यात आला असुन सदर महागाई वाढीची रक्कम दिनांक १ फेब्रुवारी १६ पासुन रोखीने अदाई करण्यात येत आहे.

दि. २८ एप्रिल १६ च्या शासन निर्णयानुसार दि. ०१ जुलै १५ ते ३१ जानेवारी १६ या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकी रक्कम रोखीने देण्या बाबतचे शासन आदेश निर्गमीत करण्यात आलेनुसार मनपा निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे मुळ निवृत्ती वेतनावर मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. २६ दि. २८.०५.२००२ अन्वये मान्यतेनुसार कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन दि. १ जुलै १५ ते ३१ जानेवारी १६ या कालावधीतील महागाई भत्ता ११९% या दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सादर.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. ५४** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/२४९७/१६ दिनांक २७.५.१६ अन्वये महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रं. निमवा/२०१६/प्र.क्र.१६/सेवा-४/ दि. ६ फेब्रुवारी १६ अन्वये महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे निवृत्ती वेतनावर का.आ.क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/१५६६६/१६ दि. ०१. मार्च १६ च्या आदेशानुसार दिनांक १ जुलै १६ पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ११३% वरुन ११९% करण्यात आला असुन सदर महागाई वाढीची रक्कम दिनांक १ फेब्रुवारी १६ पासुन रोखीने अदाई करण्यात येत आहे.

दि. २८ एप्रिल १६ च्या शासन निर्णयानुसार दि. ०१ जुलै १५ ते ३१ जानेवारी १६ या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकी रक्कम रोखीने देण्या बाबतचे शासन आदेश निर्गमीत करण्यात आलेनुसार मनपा निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचे मुळ निवृत्ती वेतनावर मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. २६ दि. २८.०५.२००२ अन्वये मान्यतेनुसार कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन दि. १ जुलै १५ ते ३१ जानेवारी १६ या कालावधीतील महागाई भत्ता ११९% या दराने रोखीने प्रदान करण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

## विषय क्रं.०६

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ४० नुसार दारिद्रय निर्मुलन योजनांमधील लाभ धारकामध्ये किमान ३ टक्के नि:समर्थ (अपंग) लाभार्थी असावेत अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या दारिद्रय निर्मुलन योजनामध्ये ३ टक्के निधी नि:समर्थ लाभार्थ्यांच्या / अपंगाच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवणे व तो खर्च करणे बंधनकारक आहे.

सदर ३% अपंग निधी हा महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. सकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२० मंत्रालय मुंबई दिनांक २८ ऑक्टोंबर २०१५ अन्वये खर्च करावयाचे आहे.

त्यान्वये दिनांक २८ ऑक्टोंबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार मुख्यलेखाधिकारी मनपा नांदेड यांचे अभिप्राय दिनांक ०१.०७.२०१६ अन्वये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामधील दारिद्रय निर्मुलन योजनेच्या (४९.८३ कोटीच्या) ३% निधी म्हणुन रुपये १,४९,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त) ऐवढा निधी नि:समर्थ लाभार्थ्यांच्या / अपंगाच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्याकरिता सदरचा प्रस्ताव मनपा सर्व साधारण सभे समोर निर्णयास्तव सादर.

**महापौर** प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ५५** **ठराव**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ४० नुसार दारिद्रय निर्मुलन योजनांमधील लाभ धारकामध्ये किमान ३ टक्के नि:समर्थ (अपंग) लाभार्थी असावेत अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या दारिद्रय निर्मुलन योजनामध्ये ३ टक्के निधी नि:समर्थ लाभार्थ्यांच्या / अपंगाच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवणे व तो खर्च करणे बंधनकारक आहे.

सदर ३% अपंग निधी हा महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. सकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२० मंत्रालय मुंबई दिनांक २८ ऑक्टोंबर २०१५ अन्वये खर्च करावयाचे आहे.

त्यान्वये दिनांक २८ ऑक्टोंबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार मुख्यलेखाधिकारी मनपा नांदेड यांचे अभिप्राय दिनांक ०१.०७.२०१६ अन्वये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामधील दारिद्रय निर्मुलन योजनेच्या (४९.८३ कोटीच्या) ३% निधी म्हणुन रुपये १,४९,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त) ऐवढा निधी नि:समर्थ लाभार्थ्यांच्या / अपंगाच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यास व पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यास ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

## विषय क्रं.०७ प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेत कार्यरत असलेल्या कर्मचारी कु. नेहा विठठलराव जिवतोडे हया कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/ आस्था-सेल/६५४४/२०१४,दिनांक ०४.०७.२०१४ अन्वये रु ५२००-२०२००/- ग्रेड पे १९००/- मध्ये इ.मा.व. महिला प्रर्वगातुन आरक्षित असलेल्या लिपीक या पदावर दिनांक १४.०७.२०१४ रोजी रुजु झालेल्या आहेत.त्यांचे वडील दिनांक ३०.०६.२०१५ रोजी सेवानिव्रत झ्रालेले असुन त्यांचा लहान भाऊ मतीमंद असल्यामुळे, त्याचा उपचार नागपुर येथे डॉ.चंद्रशेखर मेश्राम यांचेकडे सुरु आहे. वडील सेवा निव्रत झाल्यामुळे कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावर असुन नांदेड येथे नौकरी करीत असतांना त्यांना कुटुंबाची जबाबदारी पार पाडणे शक्य होत नाही. तसेच संबंधीतांच्या वैवाहीक कारणास्तव त्यांनी नागपुर महापालिकेत सेवा वर्ग होणे गरजेचे आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका सेवा ( सेवा भरती सेवांचे वर्गाकरण नियम २००८ मधील (६) अन्वये एका महापालीकेतुन दुस-या माहानगरपालीकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनीयमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालीकांतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर खालील बाबींच्या अधीन राहुन बदलीने नियुक्ती देता येईल.

अ) पदोन्नतीने भरण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही.फक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करीता राखुन ठवण्यात आलेल्या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

ब) अशा नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

उक्त तरतुद विचारात घेता तसेच ज्या दिनांकास संबधीत हया नागपुर महापालीकेत रुजु होतील तो दिनांक त्या पदाच्या संवर्गात कनिष्ठ राहील व संबंधीताचे वेतन संरक्षीत करुन सेवा समायोजीत करुन त्यांचे अंशदायी कुटुंब निव्रती योजनासाठी कार्यवाही ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेतील त्यांच्या रुजु दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल या अटीवर त्यांची सेवा वर्ग करण्यास हरकत नाही .

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहुन कु.स्नेहा विठठलराव जिवतोडे, लिपीक, यांना नागपुर महानगरपालीकेत सामावुन घेणेसाठी पत्रव्यवहार करुन पुढील वैधानिक कार्यवाही नांदेड महानगरपालीका प्रशासनाने करावी. सदरचा ठराव या सभेमध्ये ठेवुन कायम करण्यात यावा.

**सुचक** :- संजय मोरे **अनुमोदक** :- उमेश पवळे

**प्रशासकिय टिप्पणी**

सदर प्रस्तावात महाराष्ट्र मनपा सेवा, सेवा भरती वर्गीकरण नियम-२००८ चा दाखला नमुद केलेला आहे. नावाशमनपाकेचे सेवा प्रवेश नियम शासनाकडे मंजुरीसाठी सादर असुन ते मंजुर होई पर्यत उक्त नियमाचा दाखला देता येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ०३.०६.२०११ च्या शासन निर्णयातील अट क्रं. ३ नुसार कर्मचा-यांची सेवा ५ वर्ष असणे आवश्यक असून अपवादात्मक परिस्थीत किमान ०३ वर्ष सेवा असणे आवश्यक आहे.

कु. नेहा विठ्ठलराव जिवतोडे यांची नावाशमनपाकेत सरसळसेवेने का.आ.क्रं. आस्था-सेल/६५४४/१४ दि. ०४.०७.१४ रोजी लिपीक या पदावर इमाव महिला या प्रवर्गातुन नेमणुक झालेली असुन त्या दिनांक १४.०७.१४ रोजी रुजु झालेल्या आहेत. नियुक्ती आदेशानुसार त्यांचा परिविक्षाधीन कालावधी २ वर्षाचा दिनांक १३०७.१६ रोजी संपलेला असुन त्यांची दिनांक १०.०८.१६ रोजी सेवा फक्त २ वर्ष २२ दिवस झालेली आहे त्यामुळे सेवा वर्ग करण्यासाठी दिनांक ०३.०६.११ च्या शासन निर्णयानुसार पात्र नसल्याने त्यांची सेवा वर्ग करणेसाठीची कार्यवाही करता येणार नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ५६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेत कार्यरत असलेल्या कर्मचारी कु. नेहा विठठलराव जिवतोडे हया कार्यालयीन आदेश क्र. नावाशमनपा/ आस्था-सेल/६५४४/२०१४,दिनांक ०४.०७.२०१४ अन्वये रु ५२००-२०२००/- ग्रेड पे १९००/- मध्ये इ.मा.व. महिला प्रर्वगातुन आरक्षित असलेल्या लिपीक या पदावर दिनांक १४.०७.२०१४ रोजी रुजु झालेल्या आहेत.त्यांचे वडील दिनांक ३०.०६.२०१५

रोजी सेवानिव्रत झालेले असुन त्यांचा लहान भाऊ मतीमंद असल्यामुळे, त्याचा उपचार नागपुर येथे डॉ.चंद्रशेखर मेश्राम यांचेकडे सुरु आहे. वडील सेवा निव्रत झाल्यामुळे कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावर असुन नांदेड येथे नौकरी करीत असतांना त्यांना कुटुंबाची जबाबदारी पार पाडणे शक्य होत नाही. तसेच संबंधीतांच्या वैवाहीक कारणास्तव त्यांनी नागपुर महापालिकेत सेवा वर्ग होणे गरजेचे आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका सेवा ( सेवा भरती सेवांचे वर्गाकरण नियम २००८ मधील (६) अन्वये एका महापालीकेतुन दुस-या माहानगरपालीकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनीयमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालीकांतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर खालील बाबींच्या अधीन राहुन बदलीने नियुक्ती देता येईल.

अ) पदोन्नतीने भरण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही.फक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करीता राखुन ठवण्यात आलेल्या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

ब) अशा नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

उक्त तरतुद विचारात घेता तसेच ज्या दिनांकास संबधीत हया नागपुर महापालीकेत रुजु होतील तो दिनांक त्या पदाच्या संवर्गात कनिष्ठ राहील व संबंधीताचे वेतन संरक्षीत करुन सेवा समायोजीत करुन त्यांचे अंशदायी कुटुंब निव्रती योजनासाठी कार्यवाही ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेतील त्यांच्या रुजु दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल या अटीवर त्यांची सेवा वर्ग करण्यास हरकत नाही .

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहुन कु.नेहा विठठलराव जिवतोडे, लिपीक, यांना नागपुर महानगरपालीकेत सामावुन घेण्यासाठी हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

## विषय क्रं.०८ प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत आरोग्य विभागा मार्फत जनतेस आरोग्य सेवा पुरवली जाते परंतु आज पर्यंत अंदाजे १५ ते १६ वर्षा पासुन शासन नियमान२सार जो जी.आर. आहे त्यानुसार बिएएमएस पदविधर महिला डॉक्टर यांची मनपा मध्ये सेवाभरती झालेली आढळून येत नाही तेंव्हा शासन जी.आर. २५ टक्के प्रमाणे बिएएमएस डॉक्टरांची संख्या अपुरी असून यापुढे होणारी डॉक्टरांची भरती बिएएमएस महिला पदवीधरच करण्यात यावी.

कारण यापुर्वी एमबीबीएस महिला भरपुर घेण्यात आलेल्या आहेत. बीएएमएस ची डॉक्टर मंडळी बंधन पाळून रुग्ण सेवा तत्परतेने देण्याचा योग्यतो प्रयत्न करतात सेवेत टाळाटाळ करीत नाहीत असे दिसू येते तेंव्हा हया पुढील डॉक्टरांची होणारी भरती महिला बिएएमएस पदवीधरच असावी यासाठी सर्वसाधारण सभा एकमुखाने मान्यता देते.

**सुचक**:- डॉ. करुणा जमदाडे **अनुमोदक** :- सतिष राखेवार, संजय मोरे, उमेश पवळे, फारुख अली खाँ

**प्रशासकिय टिप्पणी**

नावाशमनपा अंतर्गत आरोग्य विभागा मार्फत वैद्यकिय सेवा पुरविले जाते मनपाने सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध मंजुरीकरिता शासनाकडे सादर करण्यात आला असून शासनाने यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव सादर करावा असे निर्देशित केले असुन त्यानुसार तो सर्वसाधारण सभेसमोर सादर आहे मनपा सर्वसाधारण सभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर तो शासनाकडे सादर करण्यात येईल तदनंतर मनपा सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर बी.ए.एम.एस. पदवीधर महिला डॉक्टरांची भरती करण्याची कार्यवाही शासन निर्णय व सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात येईल.

**सतिष राखेवार** महिला बिएएमएस पदे भरतांना विशेष मागास प्रवर्ग (SBC) या जात प्रवर्गातुन भरण्यात यावी अशी दुरुस्ती करुन सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** स. सदस्यांच्या दुरुस्ती प्रस्तावास मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ५७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत आरोग्य विभागा मार्फत जनतेस आरोग्य सेवा पुरवली जाते परंतु आज पर्यंत अंदाजे १५ ते १६ वर्षा पासुन शासन नियमान२सार जो जी.आर. आहे त्यानुसार बिएएमएस पदविधर महिला डॉक्टर यांची मनपा मध्ये सेवाभरती झालेली आढळून येत नाही तेंव्हा शासन जी.आर. २५ टक्के प्रमाणे बिएएमएस डॉक्टरांची संख्या अपुरी असून यापुढे होणारी डॉक्टरांची भरती बिएएमएस महिला पदवीधरच करण्यात यावी.

कारण यापुर्वी एमबीबीएस महिला भरपुर घेण्यात आलेल्या आहेत. बीएएमएस ची डॉक्टर मंडळी बंधन पाळून रुग्ण सेवा तत्परतेने देण्याचा योग्यतो प्रयत्न करतात सेवेत टाळाटाळ करीत नाहीत असे दिसू येते तेंव्हा हया पुढील डॉक्टरांची होणारी भरती महिला बिएएमएस विशेष मागास प्रवर्ग (SBC) या जात प्रवर्गातुन करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

## विषय क्रं.०९ प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील विविध विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांना आकृतीबंधानुसार महापालिका सेवेत कायम न करता, त्यांची वेगळयाने आवश्यक त्या त्या मंजुर पदानुसार जाहिरात काढून सरळसेवेने आस्थापना विभागाकडून भरती प्रक्रिया करणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व आस्थापना विभागाकडून आवश्यकती कार्यवाही तात्काळ पार पाडणे आदेशीत करते.

**सुचक**:- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**प्रशासकिय टिप्पणी**

नावाशमनपाकेच्या निकड व आवश्यकता लक्षात घेऊन मनपाकेने विविध विभागा करिता कंत्राटी तत्वावर विविध पदावर अधिकारी / कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

संबंधीत सर्व कंत्राटी अधिकारी / कर्मचा-यांची प्रथम सहा महिण्याकरिता नेमणुक करण्यात आली होती. सहा महिण्याचा कालावधी संपल्यानंतर मनपा सर्वसाधारण सभेने मान्यता प्रदान केल्यानुसार संबंधीत सर्व कंत्राटी अधिकारी / कर्मचा-यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधीत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांना आकृतीबंधानुसार महापालिका सेवेत कायम न करता त्यांची वेगळयाने आवश्यक त्या मंजुर पदावर जाहिरात काढून सरळसेवेने भरती प्रक्रिया करणेसाठीचा प्रस्ताव स. सदस्यांनी मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर केलेला आहे.

प्रस्तावाच्या अनुषंगाने नावाशमनपाकेने सेवा प्रवेश नियम व आकृतीबंध मंजुरी करिता शासनाकडे सादर करण्यात आला असून शासनाने यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव सादर करावा असे निर्देशित केले असून त्यानुसार तो सर्वसाधारण सभेसमोर सादर आहे. मनपा सर्वसाधारण सभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर तो शासनाकडे सादर करण्यात येईल. तदनंतर मनपा सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधास शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर आवश्यकते प्रमाणे विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सरळसेवेने भरती प्रक्रिया करण्यात येईल.

**महापौर** शासना मार्फत आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर कंत्राटी कर्मचा-यांना कायम / आस्थापनेवर नियुक्ती करण्यापुर्वी नावासहीतचा प्रस्तावास महासभेची मंजुरी घेवुन नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. ५८** **ठराव**

शासनाने आकृतीबंध मंजुर केल्यानंतर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील विविध विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांना कायम/आस्थापनेवर नियुक्ती देण्यापुर्वी त्यांच्या नावासहीतचा प्रस्तावास महासभेची मंजुरी घेवुन नेमणुक करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते. तसेच सरळसेवेने अधिकारी/कर्मचा-यांची आस्थापना विभागाकडून भरती प्रक्रिया करुन निवड केलेल्या उमेदवारांची नेमणुकपुर्वी महासभेची मान्यता घेण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानंमुते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

## विषय क्रं.१० **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत स्थानिक संस्था कर बंद झाल्यापासुन आजतागायत **Assessment** ची प्रक्रिया गेल्या वर्षभरापासुन चालु आहे. या कामी अनेक कर्मचारी कार्यरत आहेत. आजरोजी पर्यंत किती **Assessment** पूर्ण करण्यात आले आहे. किती **Assessment** प्रलंबित आहेत व त्या पासुन महापालिकेत किती उत्पन्न प्राप्त झाले आहे. प्रलंबित **Assessment** असल्याचे कारण काय, प्रलंबित **Assessment** बाबत प्रशासनाचे कायम नियोजन आहे, भविष्यात प्रलंबित **Assessment** पासून किती उत्पन्न अपेक्षित आहे व त्या ठिकाणी कार्यरत कर्मचारी व त्यांचे कामकाजाची शहानिशा याबाबत प्रशासना मार्फत सविस्तर अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे व त्याबाबत चर्चा करणे

**सुचक**:- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले, आनंद चव्हाण

**प्रशासकिय टिप्पणी**

दिनांक 01.08.2015 पासुन ज्या व्यवसायीकांची वार्षिक उलाढाल रु. 50 कोटीपेक्षा कमी आहे अशा व्यवसायीका करीता स्थानिक संस्था लागु नाही. ज्या व्यवसायीकांचे वार्षिक उलाढाल रु.50 कोटीपेक्षा जास्त आहे. अशा व्यवसायीका करिता स्थानिक संस्था कर चालु आहे. या महानगरपालिकेत एकच व्यवसायीकांची वार्षिक उलाढाल रु.50 कोटीपेक्षा जास्त आहे. त्यांच्याकडून प्रतिमहा रु. 40 ते 60 लक्ष स्थानिक संस्था कर प्राप्त होत आहे.

**निर्धारणाबाबतचा गोषवारा**

| झोन क्र. | प्राप्त संचिका (विवरणपत्र) | | | निकाली संचिका | | | शिल्लक संचिका | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नियमीत विवरण | अभय योजना विवरण | एकुण विवरणपत्र | नियमित निर्धारण | अभय योजना निर्धारण | एकुण निर्धारण | नियमीत विवरण | अभय योजना विवरण | एकुण विवरणपत्र |
| 01. | 1112 | 343 | 1455 | 331 | 191 | 522 | 781 | 152 | 933 |
| 02. | 2359 | 856 | 3215 | 1114 | 359 | 1473 | 1245 | 497 | 1742 |
| 03. | 1278 | 250 | 1528 | 455 | 166 | 621 | 823 | 84 | 907 |
| 04 अ | 847 | 1353 | 2200 | 355 | 635 | 990 | 492 | 718 | 1210 |
| 04 ब | 1483 | 1205 | 2688 | 474 | 258 | 732 | 1009 | 947 | 1956 |
| 04 क,ड | 1894 | 1108 | 3002 | 17 | 394 | 411 | 1877 | 714 | 2591 |
| 05. | 827 | 274 | 1101 | 151 | 151 | 302 | 676 | 123 | 799 |
| **एकुण** | **9800** | **5389** | **15189** | **2897** | **2154** | **5051** | **6903** | **3235** | **10138** |

आजतागायत एकुण **5051** विवरणपत्राचे निर्धारण पूर्ण करण्यात आले आहे. निर्धारणानंतर एकुण रक्कम रु.**95121668/-** आली. ज्यामध्ये अभय योजनेत व्याज व दंडाची रक्कम रु. **21841718/-** माफी देण्यात आली. वसुली प्राप्त रक्कम रु.**73279950/-** होती. त्यामधुन रु.**65236601/-** वसुल झाले. सद्या रक्कम रु.**8043349/-** वसुली शिल्लक आहे सदर वसुलीचे काम चालु आहे.

वरिल विवरणपत्राचे निर्धारण करतांना पूर्ण एक वर्षाचा हिशोब तपासावा लागतो यामध्ये वार्षिक खरेदीसह ताळेबंद पत्रक, व्हॅट रिटर्न या मधील खरेदी तसेच परतावा असलेल्या प्रकरणात सदर माल बाहेरगावी विक्रि झाल्या संबंधात देयक (बील) तपासावे लागतात व हे काम काळजीपूर्वक करणे आवश्यक असते. त्यामुळे निर्धारण करतांना जास्तीचा कालावधी लागतो. त्यामुळे निर्धारण संचिका प्रलंबित आहेत.

प्रलंबित निर्धारणा संबंधात प्रशासनाचे नियोजन खालील नमुद केल्याप्रमाणे आहे.

सद्या एकुण प्रलंबित प्रकरणे 10138 आहेत. यामध्ये अभय योजनेची 3235 व अभय योजना वगळून 6903 इतकी शिल्लक आहेत.

शासन अधिसूचना दि.03.06.2015 नुसार स्थानिक संस्था कराची मुळ रक्कम वसुल होण्याकरिता शासनाने स्थानिक संस्था कर अभय योजना घोषीत केली. त्यामध्ये अनु.क्र. 03 मध्ये असे नमुद आहे की, व्यापा-याने देय असलेल्या संपूर्ण कराचा भरणा केल्यास व्याज व दंडाची माफी द्यावी असे आदेशित आहे. तसेच मुदतीत करनिर्धारण न केल्यास त्यानंतर करदात्यावर व्याज व दंडाचे दायीत्व राहणार नाही असी अट आहे. सदर मुदत दिनांक 31.03.2017 पर्यंत आहे.

करिता सद्या अभय योजनेतील प्रलंबित विवरणपत्राचे निर्धारण दि.31.03.2017 पूर्वी पूर्ण करण्याकरिता प्रतीमहा 600 निर्धारण करण्याचे नियोजन केले आहे. याबरोबरच अभय योजने शिवाय इतर विवरणपत्राचे निर्धारण त्या त्या वर्षापासुन 05 वर्षाच्या आत पूर्ण करण्याचे नियमात असल्यामुळे पहिले अभय योजनेस प्राधान्य देऊन त्यानंतर उर्वरीत निर्धारणाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

वरिल नमुद केल्याप्रमाणे शासनाने अभय योजना घोषीत केल्यामुळे अनेक मोठया व्यापा-यांनी अभय योजनेचा फायदा होण्याकरिता या योजनेत मुळ कराचा भरणा केला. ज्यामध्ये जुलै 2015 मध्ये रु. **8.12** कोटी रक्कम स्थानिक संस्था करापोटी जमा झाली आहे. या रक्कमेत जवळपास रु.**3.50** कोटी रक्कम ही अभय योजनेमुळे जमा झाली आहे. या रक्कमेमुळे सदर रक्कमेवरील प्राप्त होणारे व्याज व दंड जवळपास **3.5** कोटी माफ होऊ शकते. त्यानुसार वरील नमुद केल्याप्रमाणे सद्या आतापर्यंतच्या निर्धारणावरील माफीची रक्कम रु.**21841718/-** कोटी आहे. भविष्यात वरील प्रलंबित करनिर्धारणापासुन **3** कोटी रुपये अपेक्षित आहेत. या विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या कामकाजा बाबत थोडक्यात माहिती पुढे नमुद केल्या प्रमाणे आहे.

स्थानिक संस्था करा अंतर्गत प्राप्त झालेल्या विवरणपत्राचे निर्धारण योग्य प्रकारे व्हावे. याकरिता कर्मचा-याची रचना खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | झोन क्रमांक | क्षेत्रिय अधिकारी | लिपीक | शिपाई |
|---|---|---|---|---|
| 01. | 01 व 05 | 01 | 02 | 01 |
| 02 | 02 | 01 | 02 | 01 |
| 03 | 03 | 0 | 01 | 01 |
| 04 | 04 अ | 01 | 02 | 01 |
| 05 | 04 ब | 01 | 02 | 01 |
| 06 | 04 क,ड | 01 | 01 | 01 |
| 07 | वसुली निर्धारणाची रक्कम वसुल करणे करिता | 0 | 01 | 01 |
| | | 05 | 11 | 07 |

| अ.क. | कार्यालयीन कर्मचारी | लिपीक | शिपाई |
|---|---|---|---|
| 01. | आस्थापना विभाग /कार्यालयीन पत्र/आवक जावक | 03 | 02 |
| 02 | संगणक चालक | 03 | 0 |
| 03 | टपाल वाटप | 0 | 01 |
| | | 06 | 03 |

स्थानिक संस्था कर प्रणालीत प्राप्त विवरणपत्राच्या निर्धारणाबाबत इतर महानगरपालिकेकडून माहिती घेण्यात आली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

| महानगरपालिनकेचे नांव | प्राप्त | | | निकाली | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अभय योजना वगळून प्राप्त विवरणपत्र | अभय योजनेतील प्राप्त | एकुण | अभय योजना वगळून | अभय योजना प्राप्त | एकुण |
| अमरावती महानगरपालिका | 12589 | 1536 | 14125 | 3898 | 825 | 4723 |
| सोलापुर महानगरपालिका | 11902 | 16263 | 28165 | 238 | 675 | 913 |
| मालेगाव महानगरपालिका | 2330 | 2091 | 4421 | निरंक | निरंक | निरंक |
| सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका | 7867 | 3967 | 11834 | 27 | निरंक | 27 |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका | 98000 | 5389 | 15189 | 2897 | 2154 | 5051 |

वरील नमुद केल्याप्रमाणे इतर महानगरपालिकेच्या तुलनेत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागातील कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी मोठया प्रमाणात वार्षिक विवरणपत्राचे निर्धारण केले आहेत.

सद्या अभय योजनेतील विवरणपत्राचे निर्धारण दि.31.03.2017 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. त्यामुळे विवरणपत्राच्या निर्धारणाचे काम पूर्ण झाल्यानंतर या विभागातील कर्मचारी आवश्यकतेनुसार इतर विभागाकडे देण्यात येतील.

**महापौर** प्रशासकिय अहवालानुसार

**ठराव क्रं. ५९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत स्थानिक संस्था कर बंद झाल्यापासुन आजतागायत **Assessment** ची प्रक्रिया गेल्या वर्षभरापासुन चालु आहे. प्रशासनाने वरील प्रमाणे दिलेल्या सविस्तर अहवालाची नोंद ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

## विषय क्रं.११

**प्रस्ताव**

मनपा हद्यीत वसरणी भागातील जवाईनगर हा भाग लातुर रोडवरुन उंच टेकडयावर आहे वरील भागात जाण्यासाठी रस्ता नाही तेथील कांही लोकांचे म्हणणे आहे की, हि जागा आमची आहे संबंधीत व्यक्तीच्या जागेची मालकी पाहुन खाजगी असल्यास सदरची जागा भुसंपादन करुन जावाईनगर येथील नागरीकांसाठी तात्काळ रस्ता करुन देण्यासाठी हि सर्वसाधारण सभा मान्यता देते.

**सुचक**:- संजय गंगाधरराव मोरे **अनुमोदक** :- स.विरेंद्रसिंघ गाडीवाले, उमेश पवळे

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ६०** **ठराव**

मनपा हद्यीत वसरणी भागातील जवाईनगर हा भाग लातुर रोडवरुन उंच टेकडयावर आहे वरील भागात जाण्यासाठी रस्ता नाही तेथील कांही लोकांचे म्हणणे आहे की, हि जागा आमची आहे संबंधीत व्यक्तीच्या जागेची मालकी पाहुन खाजगी असल्यास सदरची जागा भुसंपादन करुन जावाईनगर येथील नागरीकांसाठी तात्काळ रस्ता करुन देण्यासाठी हि सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**नगरसचिव** प्रशासनाचा एक आयत्या वेळचा प्रस्ताव आहे जे मी वाचुन दाखवत आहे

**विषय क्रं.१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-१३ कलम १९४ व प्रकरण-२५ चे कलम-३९७ नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील अनाधिकृत नळ जोडणी नियमीत करणेसाठी अभय योजना लागण करणेसाठी नावाशमनपा हद्यीत सद्य:स्थीतीत शहरातील मालमत्तेच्या संख्येच्या तुलनेत नळजोझीची संख्यामध्ये वाढ झालेली असण्याची शक्यत आहे व यामध्ये अनाधिकृत नळ असण्याची शक्यता आहे. तरी मनपाचे आर्थीक उत्पन्नवाढविणेसाठी अनाधिकृत नळ नियमीत करणेसाठी अभय योजना राबवुन पुढील प्रमाणे फिस आकारुन अनाधिकृत नळ नियमीत करणे आवश्यक आहे. नविन नळ जोडणीसाठी मनपा मार्फत रु. ४०३८/- ऐवढी फिस आकारली जाते. तथापी जास्तीत जास्त अनाधिकृत नळ नियमीत करणेसाठीच्या दृष्टीने रु. २५००/- इतके शुल्क आकारुन अनाधिकृत नळ जोडणी नियमीत करण्याचे प्रशासना कडून प्रस्तावित करण्यात येत आहे. चालु आर्थीक वर्ष २०१६-१७ मध्ये दिनांक १५ ऑगस्ट २०१६ ते १५ नोव्हेंबर २०१६ पर्यंत मुदत देवुन रुपये २५००/- भरुन नियमीत करणेसाठी सवलत योजना जाहिर करण्यात यावी. दिनांक १५ नोव्हेंबर २०१६ नंतर ज्या मालमत्ताधारकाकडे अनाधिकृत नळ जोडणी आढळून येईल अशा मालमत्ता धारकांना रुपये २५,०००/- (रुपये पंचेवीस हजार फक्त) दंड आकारण्यास व फौजदारी कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेला आयत्यावेळीचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ६१** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-१३ कलम १९४ व प्रकरण-२५ चे कलम-३९७ नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील अनाधिकृत नळ जोडणी नियमीत करणेसाठी अभय योजना लागण करणेसाठी नावाशमनपा हद्यीत सद्य:स्थीतीत शहरातील मालमत्तेच्या संख्येच्या तुलनेत नळजोझीची संख्यामध्ये वाढ झालेली असण्याची शक्यत आहे व यामध्ये अनाधिकृत नळ असण्याची शक्यता आहे. तरी मनपाचे आर्थीक उत्पन्नवाढविणेसाठी अनाधिकृत नळ नियमीत करणेसाठी अभय योजना राबवुन पुढील प्रमाणे फिस आकारुन अनाधिकृत नळ नियमीत करणे आवश्यक आहे. नविन नळ जोडणीसाठी मनपा मार्फत रु. ४०३८/- ऐवढी फिस आकारली जाते. तथापी जास्तीत जास्त अनाधिकृत नळ नियमीत करणेसाठीच्या दृष्टीने रु. २५००/- इतके शुल्क आकारुन अनाधिकृत नळ जोडणी नियमीत करण्याचे प्रशासना कडून प्रस्तावित करण्यात येत आहे. चालु आर्थीक वर्ष २०१६-१७ मध्ये दिनांक १५ ऑगस्ट २०१६ ते १५ नोव्हेंबर २०१६ पर्यंत मुदत देवुन रुपये २५००/- भरुन नियमीत करणेसाठी सवलत योजना जाहिर करण्यात यावी. दिनांक १५ नोव्हेंबर २०१६ नंतर ज्या मालमत्ताधारकाकडे अनाधिकृत नळ जोडणी आढळून येईल अशा मालमत्ता धारकांना रुपये २५,०००/- (रुपये पंचेवीस हजार फक्त) दंड आकारण्यास व फौजदारी कार्यवाही करण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**<u>पुरवणी विषय पत्रिका</u>**

**विषय क्रं.०१**

दिनांक ०५.०१.२०१६, २९.०२.२०१६, १९.०३.२०१६ रोजीची अंदाजपत्रकिय विशेष सभा ३१.०५.२०१६, ०२.०७.२०१६ रोजीची अंदाजपत्रकिय विशेष सभा दुपारी ३.०० वाजता, ४.३० वाजता व ५.३० वाजता मागील झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**महापौर** इतिवृत्त कायम करण्याचा विषय पुढील सभेत ठेवण्यात यावा सदरचा विषय, विषय पत्रीकेवरुन वगळण्यात येतो.

**विषय क्रं.०२**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,मंत्रालय मुंबई यांनी शासन निर्णय क्रं. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रं. ठामपा2002/821/प्रक्र.86/नवि-23/दि.2 जुलै, 2008 नुसार शासनाने महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी मॉडेल सेवा प्रवेश नियम तयार करण्याच्या दृष्टिने कालबध्द कृती कार्यक्रम आखुन दिला त्यानुसार महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले त्यात सरळ सेवेने भरावयाचे विविध संवर्गातील पदाबाबत वयाची अट ही महाराष्ट्र शासनाचे धोरण आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी विहित केलेली विविध पदांची वयोमर्यादा निश्चीत करण्यात आली तसेच पदोन्नतीसाठी आवश्यक अनुभवाची मर्यादा शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक 25.02.2005 च्या शासन निर्णयातील निर्देशानुसार कर्मचारी/अधिकारी यांच्या हरकती व सुचनांवर रितसर सुनावणी घेऊन नमुना सेवा प्रवेश नियम तयार करून दिनांक 20.09.2008 रोजी सर्व साधारण सभे समोर मान्यतेसाठी सादर केले होते सर्वसाधारणसभेने दिनांक 08.08.2011 रोजीच्या सभेत ठराव क्रमांक 94 द्वारे महापालिकेच्या प्रस्तावीत मॉडेल सेवा प्रवेश नियमास मान्यता प्रदान केल्यानंतर महानगरपालिकेने दिनांक 09 जुलै 2012 रोजी तयार केलेले मॉडेल सेवा प्रवेश नियम शासन असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी शासकीय मुद्रानालय औरंगाबाद येथे प्रसिध्दीसाठी पाठविलेले आहेत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 4 मे 2006 अन्वये राज्यातील अ ते ड वर्ग महानगरपालिकेत 38 पदांचा आकृतीबंध निश्चीत केला असून उर्वरीत पदासाठीचा आकृतीबंध निश्चीत करण्यात बाबत आवश्यकते निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेचे वाढीव क्षेत्रफळ, लोकसंख्या व आस्थापना खर्च 35 % ची मर्यादा ज्यामध्ये वेतन,निवृत्ती वेतन, कार्यालयीन खर्च, वहान, इंधन, स्टेशनरी व बैठकावरील खर्च या सर्व बाबी विचारात घेवून आकृतीबंध निश्चीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत त्यानुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेने 31.08.2013 रोजी ठराव क्रमांक 126 द्वारे महापालिका आयुक्तांनी लवकरात लवकर महापालिकेतील कर्मचारी आकृतीबंधाचा प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा अशी मान्यता दिलेली आहे त्यानुसार महापालिका कर्मचारी आकृतीबंधाचा प्रस्ताव तयार करण्यापुर्वी कार्यालयीन पत्र क्रमांक 22939/2013 दिनांक 16.12.2013 च्या परिपत्रकाद्वारे सर्व विभाग प्रमुखांना आवश्यकती माहिती सादर करण्यास सुचना देण्यात आल्यानंतर सर्व विभाग प्रमुखांची आकृतीबंध अंतीम करण्यासाठी दिनांक 30.05.2014 रोजी बैठक आयोजीत करण्यात आली आणि विभाग प्रमुखांच्या सुचनांनुसार या कार्यालयाचे पत्र दिनांक 16.03.2015 अन्वये आकृतीबंधाची कार्यवाही अंतीम टप्यात असल्याचे शासनास कळविण्यात आले.

शासनाचे पत्र दिनांक 17.08.2015 चे पत्रास अनुसरून शहराची वाढती लोकसंख्या, नागरी भागाचा विकास, शासनाच्या विविध योजना व त्यानुरूप वाढलेले कामकाज या बाबीचा विचार करून महानगरपालिकेच्या विभाग प्रमुखा मार्फत आवश्यक असणा-या पदांचा आढावा घेवून भविष्यातील 25 वर्षाच्या दृष्टिने उपयोगी पडणारा कर्मचारी आकृतीबंधचा प्रस्ताव, उपसचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या सुचनेनुसार वसई विरार महानगरपालिकेचे कर्मचारी आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन शासनाने मंजुरी दिलेली आहे त्याच धर्तीवर कर्मचारी मॉडेल सेवा प्रवेश नियमासहीत कर्मचारी आकृतीबंधाचा प्रस्ताव दिनांक 05.09.2015 च्या पत्राद्वारे शासन मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग (नवी-24) चे कक्ष अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.28.01.2016 अन्वये कळविले की, मा.महापौर यांनी सेवा प्रवेश नियम व कर्मचारी आकृतीबंधाचे अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार अहवाल सादर करावा त्यास अनुसरून या कार्यालयाचे पत्र क्रमांक 14450/2016 दिनांक 05.02.2016 अन्वये महापालिकेचा ठराव क्रमांक 94 दिनांक 08.08.2011 आणि ठराव क्रमांक 126 दिनांक 31.08.2013 नुसार मॉडेल सेवा प्रवेश नियम आणि कर्मचारी आकृतीबंधाचा संयुक्त प्रस्तावाचा अहवाल शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरचा मॉडेल सेवा प्रवेश नियम आणि कर्मचारी आकृतीबंधाचा संयुक्त प्रस्ताव महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दिनांक 02 जुलै 2008 मधिल निर्देशांनुसार मान्यतेस्तव महापालिका सर्वसाधारणसभे समोर सादर करण्यात येत आहे.

**विरोधी पक्ष नेता** आकृतीबंधाचा विषय दाखवण्यात येणार होता. 2012-13 चा आकृतीबंध दाखवण्यात आलेला नाही कोणाच्या सहीने हा दिलेला आहे. एका उपायुक्ताने टिप्पणी लिहलेली संचिका पाहीलेली आहे आणि त्याच्याच सहीने आकृतीबंध पाठवलेला आहे.एवढी गडबड का झाली आणि सभागृहाची दिशाभुल का केली व सभागृहाकडे हा विषय प्रलंबीत आहे असे कळवण्यात आले होते. मा. महापौर साहेब आपल्या सभागृहाकडे हा विषय प्रलबिंत होता काय ? 38 दिवस झाले आपल्याकडे हा विषय आलेला नाही. आपली दिशाभुल केलेली आहे. शासनाकडे सांगण्यात आले की, सभागृहापुढे हा विषय प्रलबीत आहे हे कोणाच्या सहीने गेले याचा खुलासा करावा. आकृतीबंधात असे ही बघितले की, उपायुक्ताने त्याच्या सोयीसाठी सहाय्यक आयुक्ताना पदविधर पाहीजे आणि उपायुक्तांना पदवीधर नाही पाहीजे हे कोणत्या उपायुक्ताने पाठविले त्याचे अभिनंदन करणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब हे सांगा की, सहाय्यक आयुक्त मोठा की उपायुक्त मोठा याचा खुलासा करण्यात यावा. 10 वी नापासवाला उपायुक्त होवून आयुक्त रजेवर गेल्यानंतर त्यांच्याकडे चार्ज जाईल आणि मग आम्ही म्हणावे की आयुक्त दहावी नापास अशी वेळ येईल. हे कोणाच्या सहीने गेले याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** आकृतीबंधाचा जो प्रस्ताव आहे दोन वेळेला शासनाकडे हे संदर्भ गेले होते. प्रभारी उपायुक्त श्री येवले यांच्या सहीने प्रस्ताव गेलेला होता. तत्कालीन आयुक्तांनी शासनाला एक पत्र पाठवून त्यांच्या मान्यतेने प्रस्ताव पाठविला आहे असा खुलासा शासनाकडे केला आहे.

**विरोधी पक्ष नेता** मा. सचिवाला पत्र पाठवत असतांना उपायुक्त यांच्या स्वाक्षरीने कि मा. आयुक्त यांच्या स्वाक्षरीने प्रस्ताव पाठविला पाहीजे याचा खुलासा करावा. उपायुक्ताच्या सहीने असा प्रस्ताव पाठवता येतो का हे सांगा. शासनाला मुख्यमंत्र्याना माहिती पाठवत आहात. आपण मंत्रालयात काम केले आहे. त्यामुळे आपणास याची माहिती आहे. ज्या उपायुक्तांनी हा प्रस्ताव पाठविला त्यामध्ये त्याने त्याच्या अटी शिथील करुन घेतल्या आहेत. त्यामध्ये 1979 चा जीआर लावला आहे तो जीआर कुठला आहे. उपायुक्तांच्या सहीचे पत्र स्विकारले जाते काय हे सांगावे.

**आयुक्त** साधारणतः महत्वाचे जे संदर्भ असतात ते आयुक्तांच्या स्वाक्षरीने गेले पाहीजे.

**दिपकसिंह रावत** सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत. ते सेवा नियम राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे. राजपत्रात प्रसिध्द करणे आणि सर्वसाधारण सभेची मान्यता झाल्यावर परत ते सभागृहात येणे योग्य आहे काय ? त्यानंतर श्री जी. श्रीकांत साहेबानी 2.7.2018 चे परिपत्रक आहे की, कर्मचारी लिपीक असो की उपायुक्त पर्यंत सर्वांना शैक्षणिक अर्हता लागु केली होती. आताचा आकृतीबंध आहे तो विरार मनपाच्या धर्तीवर केलेला आहे असे तत्कालीन आयुक्त यांनी म्हटले आहे. मी त्याचा अभ्यास केला असता. एस.सी., एस.टी, एन.टी. यांनाही न्याय मिळाला पाहीजे. खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना न्याय मिळावा ही आमची भुमीका आहे. चंद्रपुर, औरंगाबाद मनपा इतर मनपाचा आकृतीबंध पाहीला तर कोणत्याही पदाची शैक्षणीक अर्हता शिथील करण्यात आलेली नाही. आता आमचे मीत्र बंडू खेडकर यांनी म्हटल्या प्रमाणे जो प्रस्ताव सादर करण्यात आला दिनांक 5.9.2015 ला पत्र मा. प्रधान सचिवाला गेले आहे. आयुक्त करीता म्हणुन सही केलेली आहे हे नियम बाहय असलेल्या सहाय्यक आयुक्तांने सही केलेली आहे तो श्री येवले साहेबांना अधिकार आहे काय ? आम्ही समजू शकतो मा. आयुक्त हे दौ-यावर गेलेले आहेत. पुन्हा 10.9.2015 ला परत पुन्हा स्मरणपत्र म्हणुन आयुक्त करीता म्हणुन पत्र पाठवले. इतकी काय घाई होती की, 5 दिवसात पुन्हा पत्र पाठवले काय एमरजन्सी होती. परिपत्रक 2008 चे तत्कालीन आयुक्तांनी सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून प्रस्ताव पाठवलेला आहे पाच दिवसात मा. मुख्यमंत्री महोदयांची सही झालेली होती मा. महापौर व मा. खासदार यांचे अभिनंदन करतो की, या दोघांमुळे हा आकृतीबंध थांबला गेला. यांच्या विनंतीला मान देवून मा.मुख्यमंत्री यांनी ते बाजूला ठेवले आणि मा. मुख्यमंत्री साहेबांनी सुध्दा त्रुटीकेली की, जोपर्यंत सर्वसाधारण सभेची मान्यता होणार नाही तो पर्यंत प्रस्ताव मान्य करु नये. सदरचा आक्षेप मा. महापौर व मा.खासदार यांचा होता. इतकी काय घाई होती जे करायचे आहे ते नियमानेच करायचे आहे कोणाच्या पोटावर मारायचे नाही. सहाय्यक आयुक्ताची अर्हत काय पाहीजे. आताच्या आकृतीबंधात आपण पाहीले असेल. उपायुक्ताची पदे एकुण 5 आपल्याकडे 3 उपायुक्त आहेत. नवनिर्मित पदाची संख्या 2 आहे. सहाय्यक आयुक्त सहा आहेत एकावर अन्याय होणार नाही काय ? उपायुक्ता करीता म्हणुन पत्र पाठविण्याचा अधिकार आहे काय ? आयुक्त नसतांना अक्टींग कमीशनरची पत्रावर सही का घेण्यात आली नाही. जो सहाय्यक आयुक्त आहे. त्याला सुध्दा त्याच्या पदाच्या निर्मीतीचा विषय आहे. त्याच्या पदाची शैक्षनिक अर्हता शिथील केली. माझा असा प्रश्न आहे की, सहाय्यक आयुक्त या पदाचा 5 वर्षाचा अनुभव असा ही लिहलेला आहे सहाय्यक आयुक्त पद हे 2007 पासुन मान्यता प्राप्त झालेले नाही. मग ते 5 वर्षाचा अनुभव कसा घेणार. चुकीची माहीती सभागृहा समोर आली. सभागृहाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न आहे. मा. आयुक्ताला वेठीस धरण्याचा प्रश्न आहे. नांदेड शहरामध्ये अनेक माहितीच्या अधिकारात माहिती घेणारे आहेत त्यांनी माहितीच्या अधिकारात कॉपी मागीतली तर आणि नेहमी प्रमाणे पास केले तर आणि ते मॅटर कोर्टात गेले तर तुम्हा आम्हाला हथकडी लागले. सहाय्यक आयुक्तीची मान्यता नाही त्याला पाच वर्षाचा अनुभव कसा धरता येते साहेब. असा अनेक त्रुटी आहेत. मा. महापौर मॅडम कोणत्याही कर्मचा-यावर अन्याय होवू नये आमचे कर्मचारी 20-25 वर्षा पासुन सेवा करतात. वेळ प्रसंगी नगरसेवकाना व आधिका-याला तोंड दयावे लागते. जे कर्मचारी खरच पात्र आहेत त्यांच्या पाठीशी आहोत. ज्याची शैक्षणिक अर्हता नाही आणि तो पदधारन करणार नाही त्याचा विचार करु नये. जी श्रीकांत साहेबांनी केले ती फाईल आपण मागवावी. श्री बंडू खेडकर व श्री सत्तार भाई यांनी सांगीतलली फाईल मागवावी. या दोघामध्ये काय तफावत आहे शासन निर्णय काय आहे. आम्हाला वाटते आमच्या कर्मचा-यावर अन्याय होणार नाही आयुक्त आले त्यांच वेगळ, जे आयुक्त गेले त्यांच्या समाजाला आम्हाला मारायचे नाही. एकाला एक न्याय व दुस-यावर अन्याय असे होवू नये. आमच्याकडे एससी एसटी ची समीती आली होती. त्या समितीने यांचा आकृतीबंध मंजूर नाही. दिनांक 27.4.2006 ला एक पत्र आले की ज्यांचा आकृतीबंध मंजूर नाही ते मंजुर करुन घेणे बंधनकारकच आहे असे नगरसेकवकास सांगण्यात आले या पत्रात स्पष्ठ असे काही नाही. एससी एसटीवर अन्याय होवू नये असा त्या पत्रावर शेरा आहे आमची ही भुमीका एससी, एसटी,एनटी, डीएनटी, व्हीजेएनटी, ओबीसी व ओपन यांच्यावर अन्याय झाला नाही पाहीजे. सभागृहात आकृतीबंधाचा विषय आहे त्याला निश्चीतच पास करावयाचे आहे पण त्याच्या काही तफावत असेल तर ती दुर करण्यात यावी. भविष्यात आम्हाला कोणीतरी कोर्टात घेवून लाईल. या करीता मा. महापौर साहेब याचा सखोल अभ्यास करावा. तत्कालीन आयुक्त, सर्वसाधारण सभेत प्रशासनाने मान ठेवावा राजपत्र प्रसिध्द झाले

आहे त्याची प्रत मी आपणास देतो. आकृतीबंध मंजूर करण्या अगोदर सेवा प्रवेश नियम मंजूर करुन घ्यावे. आपण सेवा नियमावली व आकृतीबंध हा एकच आणलेला आहे. सेवानियमावली अगोदर मंजूर करणे बंधनकारक आहे. भविष्यात आमच्यावर 420 चा गुन्हा दाखल झाला तर 80 नगरसेवकासह महापौरावर गुन्हे दाखल होतील प्रशासन म्हणेल की सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल आहे त्यावेळी आम्ही काय करावे. आयुष्यभर काय आम्ही कोर्टाची पायरी चढावी म्हणून आयुक्त महोदयांना विनंती आहे की, सुचना, विनंत्या, प्रस्ताव याचा सारासार विचार करावा विशेष करुन जे आम्ही म्हणलो त्यावर आपण विचार करावा.

**विरोधी पक्ष नेता** — त्या फाइलवर कोणाची सही आहे ते जरा पहावे त्यासाठी ती फाईल सभागृहात मागवावी. सभागृहात सर्वांना माहित व्हावयास पाहीजे. इतका अनागोंदी कारभार मनपात चालू आहे हे सर्वांना समजू दया. त्या उपायुक्तांला इतकी काय गडबड झाली कि दोन पत्र दिले जग बुडून जाणार आहे. शासन दरवारी पत्र पाठवण्यासाठी आमच्या महापौर हुशार होत्या, खासदाराचे श्री दिपकसिंह यांनी अभिनंदन केले आहे. त्यांच्यामुळे थांबले आहे. नाहीतर आम्ही जेलमध्ये गेलो असतो. नोटींग कोणी टाकली आहे. ती फाईल पहावी त्या फाईलमध्ये राजपत्र देखील नाही सभागृहात फाईल मागवावी.

**महापौर** — चर्चेतुन असे लक्षात आले की शासनाला आकृतीबंध पाठवण्याची घाई का झाली हे कळाले आहे.

**विरोधी पक्ष नेता** — यांनी सभागृहाची दिशाभुल केली आहे त्यामुळे त्यांच्यावर 420 चा गुन्हा दाखल होतो की ,नाही ते सांगा. मग कार्यवाही का करण्यात येत नाही सभागृहात तुम्ही तरी रुलींग दयावी.

**दिपकसिंह रावत** — दिनांक 4 मे 2006 च्या शासन निर्णयात आकृतीबंध तयार करण्याच्या गाईड लाईन आहेत. यामध्ये तीन विभाग केलेले आहेत. 1) तांत्रीक 2) प्रशासकिय 3) लेखा विभाग त्यामध्ये प्रशासकिय विभागातील जे कर्मचारी आहेत त्यांना नियमानुसार सहाय्यक आयुक्त करता येते व या 38 कर्मचा-याचा शासन निर्णय आहे या शासन निर्णयामध्ये श्री सादीक, श्री मिर्झा बेग, नगरसचिव यांच्या पदाचा ही उल्लेख नाही. आणखीन कोणी असो प्रशासकीय अधिकारी आहेत यांच्यावर का अन्याय करावा आहे.

**अभिषेक सौदे** — प्रभारी उपायुक्ताने त्याच्या सहीने शासनाला प्रस्ताव पाठवलेला आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे. नगर विकास विभागात हा जो प्रस्ताव तयार करुन सादर केलेला आहे. तयात त्यांचे स्वतःचे हित होते त्यांच्या पदोन्नतीचा विषय होता. मी बीजेपी तर्फे मागणी करतो की, संबंधीत अधिका-यास तत्काळ निलंबीत करावे आणि चौशी होईपर्यत आकृती बंधाचा विषय पेडींग ठेवण्यात यावा.

**डॉ.करुणा जमदाडे** — आकृतीबंधाचा नेमका काय विषय आहे ? शासन परिपत्रका प्रमाणे तो तयार झाला काय ? हे अगोदर सभागृहासमोर आणावे व त्यानंतरच विषय पास करावा. अभ्यासासाठी हा विषय देण्यात यावा.

**सौ. ललिता बोकारे** — आकृतीबंध तयार करतांना तीन बाबीचा विचार करावा 1) सेवानियमावली 2) शैक्षणीक अर्हता 3) सेवा जेष्ठता त्याच्या नंतरच आकृतीबंध सादर करावा.

**विरोधी पक्ष नेता** — सभागृहात संचिका मागवण्यात यावी आणि आम्हाला या महा प्रकरणात जेलमध्ये जायचे नाही चर्चा हावू दया पण अगोदर फाईल पाहण्यासाठी महापौर मॅडम फाईल मागवा. फाईल मागविण्या यावी. संचिका सुध्दा गायब होत आहेत त्यासाठी संचिका मागवा.

**महापौर** — फाईल मागविण्याची आवश्यकता नाही कारण मा. आयुक्तांनी मान्य केलेल आहे की त्यांच्यवर आपला विश्वास आहे.

**गोंधळ चालू होता.**

**गणपत धबाले** — त्याच्यावर काय कार्यवाही करणार आहात ते अगोदर सांगा त्यांच्यवर कार्यवाही करा. श्री प्रमोद खेडकर काय खोटे बोलत आहेत काय ? मग कार्यवाही करा आपणा दोघांना माहिती असेल परंतू फाईल आम्हाला दाखवा. हा अधिकारी नेहमीच चर्चेत असतो.

**विरोधी पक्ष नेता** — त्यांच्या सहीने प्रस्ताव गेला मग त्याच्यावर गुन्हा दाखल होवू शकतो की नाही. आयुक्तांने त्यांच्यावर पत्र जोडले नाही किंवा चार्ज दिलेला नाही याचा कुठेही उल्लेख नाही. स्वतःची टिप्पणी स्वतःच पत्र तयार करुन प्रस्ताव पाठवला ही कुठही नियमावली आहे. मा.आयुक्त साहेब ही संचिका मागवा व सगळया सभागृहाला दाखवा अशी विनंती आहे. कोणताही अधिकारी असे भविष्यात करणार नाही यासाठी फाईल मागवा.

**फाईलच्या मागण्यावरुन गोंधळ चालू होता.**

**सभागृह नेता** — फाईल आपल्या अधिकारात ठेवून घेण्यात यावी. फाईल गायब होतात. या फाईलीतील राजपत्र कुठे गेले. त्यासाठी संचिका मागवा.

**विनय गुर्रुम** — सगळया सभागृहात संचिका दाखवा सही कोणाची आहे हे ओपन होवू दया.

**गणपत धबाले** — सभागृहात तीन महिने सहा महीने वर्षाला त्या अधिका-याची चर्चा होत असते कोणाची बदनामी होत आहे सगळे अधिकारी एकीकडे व दुसरीकडे तो एकटा आहे. त्यासाठी फाईल मागविण्यात यावी.

**अशोक उमरेकर** — श्री येवले साहेब सभागृहातुन उठून गेलेत त्यांनी तुमची परवानगी घेतली होती का ?

**दिपकसिंह रावत** — कायदयाने महापौराची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**गोंधळ चालू होता**

**सरजितसिंघ गिल** ज्या अधिका-यावर आरोप आसेल त्या अधिका-याने सभागृहात बसु नये आणि तसा नियम सुध्दा आहे बाहेर गेले असतील तर चांगले झाले आहे.

**आयुक्त** जे शासनाला पत्र पाठवले आहे ते टिपणीवर आयुक्तांची सही नाही असे मला दिसले 5 सप्टेंबर जे पत्र आहे त्या पत्रावर श्री येवले यांची उपायुक्त म्हणुन सही आहे. तदनंतर आयुक्तांनी शसनाला दिले आहे की, माझ्या मान्यतेने प्रस्ताव शासनाला पत्र पाठवलेले आहे. जो राजपत्राचा विषय आहे. श्री जी. श्रीकांत साहेबांनी 2012 ला जी प्रोसिजर केली होती एमएमएचे कलम 57 (3) नुसार शासनाला प्रस्ताव पाठवला होता. त्यावर शासनाने ऑबझेक्शन व सजेशन मागविलेले आहेत त्यानुसार आता प्रारुप म्हणुन प्रसिध्द करण्यात आला होता. गॅझेट झाले असेल तर प्रस्तावा प्रोसेसनुसार सेवानियमातील अटीस शासनाची मान्यता आवश्यक आहे ते प्रसिध्द झाल्यावर अंतीम होईल. त्यासाठी शासनाने पुन्हा आपल्याकडे आपल्या मान्यतेसाठी पाठवलेले आहे.

**दिपकसिंह रावत** अगोदर सेवानियमावली तयार केली पाहीजे आणि आजच सभागृहात का आले इतके दिवस का आणण्यात आले नाही याचा खुलासा करण्यात यावा. आपले जे खालचे अधिकारी आहेत त्यांनी आपली दिशाभुल केलेली आहे. मी आपल्या निदर्शनास ती गोष्ट आणुन दिली आमचे वाचन करुन आपण सभागृहामध्ये उत्तर देत आहात याचा अर्थ असा आहे की, आपणास या पुर्वी काही माहीत नव्हते. सेवानियमावली काय व आकृतीबंध काय हे ब-याच नगरसेवकांना माहिती नाही. कारण सभागृहाची अशी धारणा आहे भरती व्हायची आहे काय? हे आकृतीबंध काय आहे. कमीत कमी तेव्हढी तर हया नगरसेवकास समजून सांगावे. हे प्रशासनाचे काम आहे. त्यामध्ये कंत्राटी/सेवा नियम/आकृतीबंध हे समजावावे. कंत्राटी लोकांना कायम करावे काय हे कळवा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे त्या निर्णयाचे अधिन राहून हे काम होणार काय ? काही लोकांनी तर धंदा चालू केला आहे. पैसे जमा करण्याचा यात अधिकारी आहेत/कर्मचारी आहेत. यांच्याकडून पैसे जमा केले आहेत. हमारे 10 आदमी है करलो सर, असी चर्चा एकलो आहे. मी कंत्राटी कर्मचा-याला विनंती करतो की, त्या अधिका-याला पैसे देवू नका जो पर्यत सर्वसाधारण सभा व सन्मानिय न्यायालय निर्णय आहे. सर्वसाधारण सभा निर्णय घेत नाही तो पर्यत कोणतीही कार्यवाही पुढे करता येत नाही त्यांच्या पोटावर लाथ मारु नये निलबींत असलेला कर्मचारी मंत्रालयात फे-या मारतो. आणि मी करुन आणतो असे म्हणत फीरत आहे. श्री मोरे साहेबांनी सहाय्यक आयुक्त म्हणुन सेवा दिली आहे. त्यांच्यावर आम्ही अन्याय होवू देणार नाही 45 (4) ची मान्यता नव्हती त्याचे पैसे थांबविण्यात आले आहे लेखा विभागाबदल विचारावयाचे आहे कर्मचारी सेवा निवृती होतो. श्री मोरे साहेब आमचे सेवा निवृती होता व आणि जे कार्यरत आहेत त्यांना पगार देता. संबधीत अधिका-याला पत्र देता की तुमच्या पदाची मान्यता नाही म्हणुन तुम्हाला पेन्शन भेटत नाही. आत्महत्या कर्मचा-या वेळ येईल असे अनेक कर्मचारी आहेत त्यांच्यावर अन्याय होवू नये असे मला वाटते. ज्या ज्या लोकानी आकृतीबंधावरच्या संचिकेत सही आयुक्तांची नाही आहे. त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करणार हे याचा खुलासा सभागृहात करण्यात यावा. आकृतीबंध व सेवा नियम यात काय फरक आहे हे दाखविण्यात यावे.

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** आकृतीबंध व सेवा नियमावलीवर एवढी चर्चा झाली माझी सभागृहाला विनंती आहे की, सन 2011-2012 आकृतीबंध पास झालेला आहे ते कशा प्रकारे पध्दतीने पास झाला कोणत्या नियमाने / पास झाला. त्याचे नागपुर ऑडीटने त्यामध्ये ताशेरे केलेले आहे. तर अनावधानाने पास झाले असते तर आज जागृत /अभ्यासु नगरसेवक आहेत आणि महापौर अभ्यासु आहेत म्हणून सर्व सभागृहाला कळाले आहे. मात्र हे जर पास झाले असते तर मनपा नागपुरमध्ये सर्व नगरसेवकांना हात कडया लागल्या आहेत. त्यापध्दतीने आम्हाला माता भगीनीसह सर्वाच्या हातकडया लागल्या असत्या. तर ते होवू नये. कोणाच्या सहीने फाईल गेली मंत्रालयापर्यत जावून ती फाईल पर्यत जावून वापस येते. मा.महापौर / मा. खासदार अशोकराव चव्हाण यांचे अभिनंदन करतो. त्यावेळी आयुक्तांनी लेखी चार्ज दिला आहे काय ? आयुक्त रजेवर होत काय ? या दिवशी याचा सुध्दा सभागृहामध्ये खुलासा करावा फाईल मागवावी आम्हाला कळु दया.

**विरोधी पक्ष नेता** महापौर मॅडम, तत्काळ मागवण्यात यावी आम्ही 20 मिनीटापासून ही फाईल आणण्याची विनंती करीत आहोत नजरेच्या समोर एकदा फाईल येवू दयावी, तुम्हाला फाईल मागविण्याचा अधिकार आहे. त्या फाईलमध्ये काय त्रुटी आहेत हे दाखवायच्या आहेत.

**महापौर** आपल्या बोलण्यावर आमचा विश्वास आहे. त्यामुळे संचिका मागविण्याची आवश्यकता भासत नाही.

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** संचिका मागवण्यात यावी आणि संचिका मागविली नसल्यास त्यामुळे आम्हाला जेलमध्ये जायची वेळ येईल.

**अभिषक सौदे** एका अधिका-याला तुम्ही किती दिवस वाचवणार त्यासाठी एकदा संचीका घेवून या व त्या अधिका-यावर कारवाई करा.

**सभागृहनेता** विषय क्र 2 वर चर्चा झालेली आहे यात दोन विषय आहेत 1) आकृतीबंध पाठविण्यासाठी अनियमितता झाली अधिकार नसताना अधिकाराचा वापर झाला प्रथम दर्शनी आम्ही ही संचीका पाहीलेली आहे.

त्यावर आयुक्तांची कुठेही सही नाही व नोटींगवरही मान्यता नाही नोटींग लिहीली पण त्यावर सही केलेली नाही शासनाला कळवाच आणि नोटींगवर सही करायची नाही अशी स्थीती आताही आहे. अनियमीतता झाली त्या दोषीवर कार्यवाही करणे. 2) 2005 पासुन आकृतीबंधराचा विषय प्रलंबीत आहे. शासनाने 2005 ला आर आर व आकृतीबंध सादर करुन मंजूर करुन घ्यावा आज 2016 उजाडले आहे. मा. महापौर व मा. अशोक चव्हाण साहेब यांची अभिनंदन करतो. त्यांनी पत्र देवून हे थांबवले स्वत:चा काही इंटरेस्ट हेता की काय यासाठी घाई करण्यात आली. मुख्यमंत्रयाची सही झाल्यानंतरही मुख्यमंत्रयांनी सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी परत पुन्हा आपल्याकडे पाठवावी. यासाठी शासनाचेही धन्यवाद. नाहीतर हा अधीकार सर्वसाधारण सभेला मिळाला नसता 2008 ला आयुक्तांनी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवला होता. 2008 चा प्रस्ताव आपण 2011 ला पास केला. 2011 ला पास झाल्यावर सजेशन्स व ऑब्जेक्शन मागवण्यात आले. श्री जी. श्रीकांत साहेबांचे जे लाडके कर्मचारी होते त्यांच्यानुसार सगळे झालेले आहे. आणि आता श्री खोडवेकर साहेब आले त्यांचे लाडके अधिकारी त्यांच्यावर करण्यात आले व पाठवण्यात आले याबाबत आम्हाला न्यायीक भुमीका पाहीजे सर्व कर्मचारी आमच्यासाठी समान आहेत. उपायुक्तांनी 1976 चा शासन निर्णय लावला आहे एससी समाजातील अधिका-यांना शैक्षणिक अर्हता शिथील करण्यात यावी. 1976 ची व 2016 च्या परिस्थीतीत खुप मोठा फरक आहे. त्यावेळी मागासवर्गीय बांधव अशिक्षीत होत हे सगळयांना माहित आहे. यशवंत कॉलेजची कटऑफ लिस्ट पाहीली तर ओपन चे 83 वर व मागासवर्गीयांचे 80 वर दिसून येते. मागासवर्गीयात ग्रॅजवेशन भेटत नाही असे नाही. शैक्षणीक शिथीलता कशासाठी पाहीजे असे चुकीचे यात घेतलेले आहेत. 1985 पासुन काम करणा-या कर्मचा-याना 1997 ला घेतले आहे. 12 वर्षानंतर यांची सेवा नियमीत झाली. महापालिका झाल्यावर कर्मचा-याची गरज होती. त्यांना घेतले काही कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आली श्री सुशीलकुमार शिंदे साहेब अण्णाभाऊ साठे पुतळयाच्या उदघाटणासाठी आले होते त्यावेळी त्यांनी कर्मचा-यांना न्यायमिळवुन दिला. जेएनएनयुआरएम व बीएसयुपी साठी कर्मचा-यांची आवश्यकता भासत होती. महापालिकेत कर्मचारी कमी पडत होते. म्हणून इंजीनिअर, डॉक्टर यांना आपण घेतले, रोड कारकुन, डाटा इन्ट्री ऑपरेटर हे सुध्दा घेतले. 2007 साली या कर्मचा-याचे वय 24-25 वर्षे असेल आता त्यांना 10 वर्षे झालेली आहेत ते आता एजबार झाले आहेत. त्यांना आता कोण नौकरी देणार आहे. जो पदे भरती कलेली आहेत ती शासनाच्या नियमानेच भरली आहेत. जाहीरात, मुलाखत, घेवून भरली आहेत. आकृतीबंध लवकर व्हावा महापौराकडे शिष्ठमंडकआले होते. महापौरांनी अभिवचन दिले की आम्ही लवकरात लवकर आकृतीबंध अंतीम करुन देवू तीथे श्री विलास गजभारे हा महापौराला जाब विचारण्यासाठी आला होता. जीतकी काळजी तुम्हाला आहे तीतकीच काळजी आम्हालाही आहे. त्यासाठी काम करावे लागते. आम्ही सगळे होतो. आम्ही शब्द दिला होता आम्ही आपल्या पाठीशी आहोत. जे लाडके कर्मचारी होते त्यांच्यासाठी आयुक्तांनी जी भुमिका घेतली होती ते सर्व बदल करण्यात यावे जे आवश्यक बदल आहेत ते तात्काळ करुन शासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** कोणत्याही कर्मचा-यावर अन्याय होवू नये अशी आमची भुमीका आहे. आकृतीबंध हा नियमास विसंगती करुन होत असेल त्याचे परिणाम काय होतील हे सभागृहात सांगावे आर आर होते. ते 2012 नंतर सभागृहात आणणे गरजेचे होते. आम्ही सभागृहाने आकृतीबंध मंजूर केला तो पुन्हा ईथे येणार की नाही येणार हे सांगावे. लखापरीक्षण असवाल सभागृहात आजला अभ्यासासाठी वेळ मागीतला. आकृतीबंधाची जी सत्य परीस्थिती आहे ती सभागृहाला कळली पाहीजे. प्रत्येक नगरसेवकाला त्याची प्रत देण्या यावी अशी आपणास विनंती करतो.

**आनंद चव्हाण** श्रेणी-4 मधील कर्मचारी पदविधारक आहेत ते वर्ग 3 मध्ये घेण्यासाठी ते प्रमाण 50 टक्के आहे. त्याऐवजी 75 टक्के करण्यात यावे. चतूर्थश्रेणी कर्मचा-याचा विचार त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार केला पाहीजे.

**बाळासाहेब देशमुख/दिपकसिंह रावत** आपण एकत्र आलो त्यामुळे सर्वाना एकच न्याय करण्यात यावा सर्व कर्मचा-यांना न्याय देण्यात यावा.

**स. शेर अली** 2012 ला ऑर्डीनस झाल्यावर त्यात आपणास दुरुस्ती करण्याचे अधिकार आहेत याचा खुलासा करण्यात यावा. जे बदल करुन पाठवण्यात आले आहेत ते आमच्यासमोर ठेवण्यात यावे हे आमच्यासमोर अजून ठेवण्यात आलेले नाही 2011-12 ला जे आरआर रुल काय आहेत ते देखील समोर आणावेत यासाठी आरआर ला शासनाची मान्यता लागते आरआर वर प्रथम विचार करण्यात यावा व त्यांनतर आकृतीबंधाचा विचार व्हावा आरआर मंजूर नाही झाले जी 58 टक्के जे बजेट खर्च दाखवला आहे तो रियाली्स्टीक खर्चाच्या आधारावर आहे काय आणि तो पुन्हा 35 टक्के दाखवण्यात आला आहे. जे आम्ही बजेट बनवतो ते बजेट फुगीर असते. जो खर्च दावण्यात आलेला आहे तो रियालिस्टीक बजेटवर आधारभुत ठरवून दाखवण्यात आलेला नाही. त्याच बरोबर अग्नीशमन विभागचा जो संबध आहे ते यात समाविष्ठ आहेत काय ते दाखवा जे शिक्षण विभाग आहे त्याचा यात समावेश करण्यात आला आहे काय? डॉक्टरांचा समावेश केला आहे काय? हैदरबागचा दवाखाना हा बंद पडलेला आहे. या सर्व बाबीचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

| | |
|---|---|
| **बाळासाहेब देशमुख(तरोडा)** | एजी नागपुर यांनी 2011-12 साली यावर काय आक्षेप घेतला आहे. सेवानियमावलीत व आकृतीबंधात हे स्पष्ठ करावे हे सभागृहात सांगा. |
| **विरोधी पक्ष नेता** | सभागृहात संचिका मागवण्यात यावी. |
| **अब्दुल सत्तार** | आयुक्त साहेबांनी सांगीतलेले आहे त्यामुळे संचीका मागविण्याची आवश्यकता नाही. |
| **अशोक उमरेकर** | फाईल न मागविण्याचे काही वेगळे कारण आहे काय मा.महापौर मॅडम फाईल मागवावी. |
| **विरोधी पक्ष नेता** | एक दिवस मिटींग घेवून आम्हाला सांगता की सभागृहात गोंधळ करु नका व फाईल मागवा म्हटल तर फाईल मागवत नाही. प्रत्येकाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यात येइल असे आपले म्हणणे होते असे होताना दिसत नाही यामध्ये ठराव घेण्यात यावा. |
| **अब्दुल सत्तार** | प्रस्ताव पाठविला नोटींगवर आयएएस अधिका-याची सही नाही. नोटींगला मान्यता नाही काय निझाम सरकारची हुकुमत आहे काय ? पहील्या आयुक्तांनी 2011-12 चा आकृतीबंध त्यांनी त्यांचे जे लाडके अधिकारी आहेत त्यांना खाली वरी केलेले आहे अशा त्रुटी आहेत तया आता दुर करण्यात याव्यात त्यांनी सभागृहासमोर आणावे पुन्हा श्री खोडवेकर आले त्यांनी त्यांच्या लाडक्या कर्मचा-यांना टाकले महापौर, सभापती यांच्या कक्षातील लोकांचा समावेश केलेला नाही त्यामुळे त्याचा आम्ही निषेध करतो. आयुक्त साहेब आपले या फाईलवर समाधान आहे काय हे सांगावे आम्ही शासनाचा देखील निषेध करतो. कारण त्यावर आयुक्तांची सही नाही त्या अधिका-याची चौकशी लावावी तुम्ही आकृतीबंध पास करा त्यामध्ये एक समिती गठीत करुन त्यात विरोधी पक्ष नेता, सत्ताधारी असे नगरसेवक घेण्यात यावे व चोकशी करावी. जे अधिकारी अधिकाराच गैरवापर करीत आहे त्याची चौकशी झाली पाहीजे हा रिपोर्ट समितीसमोर जावू दया. ते मुंडे साहेब येणार आहेत त्यांच्यासमोर या अधिका-यांने काय चुका केल्या आहेत ते त्यांच्या निदर्शनास आणुन दयावे. मा. खा. श्री अशोक चव्हाण साहेबाने पत्र दिल्याने या विषयावर आम्हाला बोलण्याचा अधिकार मिळाला आहे. नाहीतर हे परस्पर मनपाला विकुन टाकतील. मनपाची जागा विकली आहे. यासाठी समिती करा व फेरबदलाचे सर्व अधिकार आपणास देण्यात येतात यात दोन डॉक्टराचा समावेश नाही त्यांचा समावेश करण्यात यावा. |
| **सरजितसिंघ गिल** | माजी महापौरांनी सांगीतल्याप्रमाणे सर्व अधिकार महापौर मॅडम यांना फेरबदलाचे आपणास देण्यात येतात. या फाईलमध्ये अधिनियमीतता झाली आहे. त्यासाठी समितीने आकृतीबंध पास करण्यात यावा. |
| **अशोक उमरेकर** | आरआर रुल 2011-12 ला चुकीने पाठवलेले आहेत. सहायय्क आयुक्त, विधी अधिकारी आपल्याकडे किती आहेत विधी अधिकारी आहे काय. तो कायम आहे काय. मनपाचे न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी विधि अधिकारी नियुक्ती केलेली आहेत त्या वकीला मार्फत आपण कामकाज चालवतो. जिल्हा न्यायालयात भोसले साहेब व उच्च न्यायालयात देशाई साहेब काम पाहतात. या वकीलांना आपण नियुक्त करुन काय फुकटची पगार दयायची काय हे होत असतातना यात मुख्य विधी अधिकारी याचा समावेश केला आहे. खालचेचे लोक काम करीत नसतील तर मुख्य विधी अधिकारी नियुक्त करण्याची काय आवश्यकता आहे. मुख्य विधी अधिकारी घ्यावयाचा झालया त्याची जाहीरात, लेखी परीक्षा, मुलाखत घेवून नियुक्ती करावी. |
| **अभिषेक सौदे/गणपत धबाले** | त्या अधिका-यावर काय कार्यवाही करणार ते पहीले सांगा. व निर्णय योग्य घ्या. |
| **महापौर** | सभागृहात आतापर्यंत जी चर्चा झाली त्यावरुन असे माझ्या लक्षात आले आहे की प्रस्ताव पाठवण्यात अनियमीतता झालेली आहे. आर आर आकृतीबंध यात अनियमीतता झाली मनपाचे वरीष्ठ अधिकारी आयुक्त आहेत त्यांच्या सहीने हा आकृतीबंध शासनाला पाठवला गेला पाहीजे होता. पण तसे झाले नाही. तत्कालीन आयुक्तांने शासनाची दिशाभुल केली आहे जो स्वयंघोषीत उपायुक्त आहे त्यांच्या स्वाक्षरीने तो शासनाला प्रस्ताव पाठवलेला आहे. त्याची सर्व चौकशी करण्यात यावी. व अहवाल सभागृहासमोर सादर करावा. ज्या अधिका-याने मागासवर्गीयासाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे शासन निर्णय नाहीत. उपायुक्तसाठी कोणतेही विदयापीठाचे पदवीधर असणे आवश्यक आहे. जे मी या आकृतीबंधात फाटा दिलेला आहे. शासनाला प्रस्ताव गेला आणि तत्कालीन आयुक्तांनी त्याला माझी मान्यता आहे. याचा अर्थ असा आहे की,स्वतः वरती कुठलाही अलीगेशन होणार नाही याची काळजी घेतली आहे. आमचे मा. खा. श्री अशोक चव्हाण साहेबांनी तात्काळ पावले उचलली आणि सीएम साहेबांच्या लक्षात आणुन दिले की हा आकृतीबंध चुकीचा आहे. सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च आहे तीची अवहेलना करुन महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात आला. यामुळे आमच्या नगरसेवकाच्या अधिकारावर गदा आली आहे. मा.खासदार श्री अशोकराव चव्हाण साहेबांचे मी याठिकाणी अभिनंदन करते. यासाठी सभागृहाचे एक मत आहे मा. मुख्यमंत्री साहेबांनी सर्वसाधारण सभेची मान्यता घेवूनच आकृतीबंध सादर करावा असे सुचित केले आहे. कंत्राटी कर्मचा-यावर आम्हाला अन्याय करावयाचा नाही त्यांचे वय एजबार झाले आहेत. या सर्व कर्मचा-यांना या आकृतीबंधात समाविष्ठ करुन घेण्यात येईल मनपात ज्याज्या लोकांना समाविष्ठ करता येईल त्या सर्वाना न्याय दिला जाईल. यानंतर सगळे काम हे नियमानुसारच होणार आहे. वर्ग 4 च्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व नियमानुसार त्यांना सुध्दा न्याय देण्यात येईल मनपाचे पदाधिकारी आहेत. महापौर उपमहापौर यांच्या कक्षामध्ये एकही स्वीय सहाय्यकाचे पद निर्माण केलेले नाही त्यांना |

लिपीका मधुनच स्विय सहाय्यक असे म्हणाले तर त्यांना मान वाढेल. राजशिष्टाचार अधिकारी सुध्दा यांची सुध्दा पद निर्मीती होईल यामध्ये शैक्षणीक अर्हता सर्वोच्च मानली आहे. जर एखादया अधिका-याची शैक्षणिक अर्हता नसेल तर त्याला पदोन्नती देण्यात येवू नये. सभागृहाने मला फेरबदल करण्याचे पुर्ण अधिकार दिलेले आहेत त्याबददल मी सभागृहाचे आभार व्यक्त करते.

**सरजितसिंघ गिल** यात अल्प संख्याक समुदायावर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी त्यामध्ये मुस्लीम, शिख, दलीत यावर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी अशी आपणास विनंती आहे.

**महापौर** सगळी न्यायीक भुमिका घेण्यात येईल. सगळया गोष्टी नियमानुसार होतील याची काळजी घेण्यात येईल. यामध्ये बीयुएमएस, बीएएमएस यांचाही समावेश करण्यात यावी सर्व कंत्राटी कर्मचा-याचा यामध्ये समावेश होईल. ज्या स्वयंघोषीत उपायुक्ताने हा आकृतीबंद पाठवला आहे त्याच्यावर चौकशी समिती गठीत करण्यात यावी व ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी अशी मी प्रशासनास आदेशीत करते. ज्या आकृतीबंधाच्या फाईल आहेत त्या आयुक्तांनी आपल्या कार्यक्षेत्रात ठेवून घ्याव्यात.

**ठराव क्रं.६२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यां करिता तयार करण्यात आलेल्या मॉडेल सेवा प्रवेश नियम आणि कर्मचारी आकृतीबंधाचा संयुक्त प्रस्तावात कांही त्रुटया आढळून आल्या असल्यामुळे शासनास सादर करण्यात आलेल्या मॉडेल सेवा प्रवेश नियम आणि कर्मचारी आकृतीबंधाचा संयुक्त प्रस्तावात आवश्यकत्या दुरुस्ती व फेरफार दुरुस्त करण्याचे व दुरुस्ती अंती शासनास प्रस्ताव सादर करण्याचे पुर्ण अधिकार मा. महापौर व आयुक्त यांना हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.०३**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/५८८१/२०१६ दिनांक ०५.०८.२०१६ अन्वये **श्री विजय निलंगेकर अध्यक्ष एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड** यांचे निवेदनाव्दारे दरवर्षीप्रमाणे बुध्द जयंती निमित्ताने दिनांक २१ मे २०१६ रोजी बुध्द प्रभात या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळविले असून सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिके तर्फे गतवर्षी प्रमाणे आर्थीक मदत देण्यात यावी अशी विनंती केली होती. त्याअन्वये सदर निवेदनानुसार मा. महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा. सभागृहनेता, मा. विरोधीपक्षनेता मनपा नांदेड यांचेकडे सदरील प्रकरणी अभिप्राय देण्यासाठी मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते त्यानुसार मा. महापौर मनपा नांदेड यांनी संबंधीतांची नियमानुसार कागदपत्रे तपासून व पुर्तता करुन घ्यावी अशी सुचना दिल्या असुन, मनपाची आर्थीक स्थीती पहाता रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार) अनुदान देण्यास मा. महापौर मनपा नांदेड यांचा अभिप्राय दिनांक १८.०५.२९०१६ अन्वये मान्यता दिली आहे

त्यानुसार संबंधीतांनी बुध्द प्रभात या कार्यक्रमास अनुदान मिळण्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्र सादर केलेले आहेत.

१) एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड या संस्थचा ठराव दिनांक १४.०४.२०१६
२) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (सहाययक संस्था निबंधक नांदेड विभाग)
३) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग)
४) संस्थेचे परिशिष्ट व ज्ञापन (मेमोरंडम ऑफ असोसिएशन)
५) संस्थेच्या वार्षीक लेखापरिक्षण अहवाल
६) चार्टड अंकाऊंटंट यांच्या मार्फत झालेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल

मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षीत गृहित धरुन वरील कार्यक्रमासाठी रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चे अनुदान देण्याची कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात आली त्यास मान्यतेसतव सादर. सदर रक्कमेचा धनादेश **एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड** यांच्या नांवे देण्यात यावा यावर होणारा खर्च सालसन २०१६-१७ च्या संबंधीत शिर्षकाखालील तरतुदीतुन करण्यात यावा त्यास कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मंजुरी देण्यासाठी मनपा सर्व साधारण सभेसमोर सादर.

**महापौर** प्रशासनाच्या आदेशास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ६३** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/५८८१/२०१६ दिनांक ०५.०८.२०१६ अन्वये **श्री विजय निलंगेकर अध्यक्ष एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड** यांचे निवेदनाव्दारे दरवर्षीप्रमाणे बुध्द जयंती निमित्ताने दिनांक २१ मे २०१६ रोजी बुध्द प्रभात या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळविले असून सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिके तर्फे गतवर्षी प्रमाणे आर्थीक मदत देण्यात यावी अशी विनंती केली होती. त्याअन्वये सदर निवेदनानुसार मा. महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा. सभागृहनेता, मा. विरोधीपक्षनेता मनपा नांदेड यांचेकडे सदरील प्रकरणी अभिप्राय देण्यासाठी मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते त्यानुसार मा. महापौर मनपा नांदेड यांनी संबंधीतांची नियमानुसार कागदपत्रे तपासून व पुर्तता करुन घ्यावी अशी सुचना दिल्या असुन, मनपाची आर्थीक स्थीती पहाता रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार) अनुदान देण्यास मा. महापौर मनपा नांदेड यांचा अभिप्राय दिनांक १८.०५.२९०१६ अन्वये मान्यता दिली आहे

त्यानुसार संबंधीतांनी बुध्द प्रभात या कार्यक्रमास अनुदान मिळण्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्र सादर केलेले आहेत.

१) एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड या संस्थचा ठराव दिनांक १४.०४.२०१६
२) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (सहाययक संस्था निबंधक नांदेड विभाग)
३) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग)
४) संस्थेचे परिशिष्ट व ज्ञापन (मेमोरंडम ऑफ असोसिएशन)

५) संस्थेच्या वार्षीक लेखापरिक्षण अहवाल

६) चार्टड अंकाऊंटंट यांच्या मार्फत झालेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल

मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षीत गृहित धरुन वरील कार्यक्रमासाठी रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चे अनुदान देण्याची कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात आली त्यास मान्यतेसतव सादर. सदर रक्कमेचा धनादेश **एकनिष्ठ प्रतिष्ठान नांदेड** यांच्या नांवे देण्यास कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.०४**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/2015/प्र.क्र.90/नवि-16 मंत्रालय मुंबई-32 दि. 16 जानेवारी 2016 चे कृपया अवलोकन व्हावे.राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या हद्दितील रस्त्यांची देखरेख - दुरुस्ती, रस्ता बांधणी, रस्त्यांचे डांबरीकरण, मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे-पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकास करणेसाठी "**सर्वसाधारण रस्ता अनुदान** " व "**विशेष रस्ता अनुदान"** अशा दोन प्रकारे रस्ता अनुदान म्हणुन मंजुर करण्यास सदर शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे.

1. **सर्वसाधारण रस्ता अनुदान -** राज्यातील अस्तित्वातील सर्व महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत हया सर्व साधारण रस्ता अनुदान मिळण्यास पात्र राहतील. **'ड'** वर्ग महानगरपालिकेसाठी दरवर्षी रु. 75.00 लक्ष मंजुर करण्यात आलेले असून कार्यान्वयन यंत्रणा संबंधीत महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत राहील. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची सर्वसाधारण सभा कामे निश्चित करेल. निश्चित करण्यात आलेल्या कामांना सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे आयुक्त/मुख्याधिकारी हे सक्षम राहतील.

2. **विशेष रस्ता अनुदान -** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना नियमीत मिळणाऱ्या सर्वसाधारण रस्ता अनुदान व्यतिरीक्त विशेष रस्ता अनुदान मिळण्यास अस्तित्वातील सर्व महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत पात्र राहतील. तथापी सर्वसाधारण रस्ता अनुदान

मंजुर करुन शिल्लक अर्थसंकल्पीय तरतुद व मागणीचे प्रस्ताव विचारात घेवुन आवश्यकते नूसार महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत यांना विशेष रस्ता अनुदान मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदरचे अनुदान मंजुर करतेवळी खालील बाबींचा विचार करण्यात येईल.

1. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वित्तीय परिस्थिती 2. स्थानिक गरज व प्राथमिकता 3. पूरक विकास प्रकल्पाकरिता 4. भौगोलिक परिस्थिती 5. नैसर्गिक आपत्ती 6. नागरीकरणाचा दर 7. पूरक दळणवळण साधानांचा विकास 8. हागणदारी मुक्त व स्वच्छ शहराची निर्मिती. इत्यादी "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांच्या अंमलबजावणी करिता कार्यान्वयन यंत्रणा आवश्यकतेनूसार शासन स्तरावरुन निश्चित करण्यात येईल. ज्या प्रकरणी शासन स्तरावरुन कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्यात येणार नाही अशा प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा संबंधीत महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत राहील. **"विशेष रस्ता अनुदान"** अंतर्गत हाती घ्यावयाची कामे शासन स्तरावरुन निश्चित करण्यात येतील. ज्या प्रकरणी शासन स्तरावरुन कामे निश्चित करण्यात येणार नाहीत. अशा प्रकरणी सर्वसाधारण सभा कामे निश्चित करेल. "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत मंजुर निधीच्या मर्यादेत संबंधीत नागरी स्वराज्य संस्थाच्या आयुक्त/मुख्याधिकारी यांनी कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र जिवन प्राधिकरण/सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेवुन मा. विभागीय आयुक्त, यांच्या अध्यक्षते खाली गठित केलेल्या समिती समोर प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत.

| | |
|---|---|
| 1. विभागीय आयुक्त | - अध्यक्ष |
| 2. संबंधीत जिल्हाधिकारी | - सदस्य |
| 3. कार्यान्वयन यंत्रणेचा सक्षम अधिकारी | - सदस्य |
| 4. संबंधीत महानगरपालिकेचे आयुक्त | - सदस्य सचिव |

"विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत नागरी स्वराज्य संस्थाच्या हद्दित हाती घेण्यात येणाऱ्या कामाकरिता आवश्यक असणाऱ्या नाहरकत परवानग्या देण्याबाबत आवश्यकती कार्यवाही संबंधीत आयुक्त/मुख्याधिकारी यांनी करावे. **"रस्ता अनुदान"** अंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देतांना खालील बाबींचा विचार करण्यात यावा.

**अ.** सदरची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत. कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे तसेच त्यामुळे सर्व समावेशक नागरीकांच्या प्राथमीक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे. याची खातर जमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात येवु नये.

**ब.** सदरची कामे संबंधीत शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातर जमा करणे.

**क.** सदरची कामे सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (PHOTOGRAPH) काढुन ठेवणे व मागणीनूसार सादर करणे तसेच कामाचे त्रयस्थ पक्षाकडुन लेखा परिक्षण करुन घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक आहे. **ड.** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दितील रस्त्याची देखरेख-दुरुस्ती, डांबरीकरण, मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकासाची कामे **"रस्ता अनुदान"** अंतर्गत हाती घेण्यात यावीत. रस्ता विकासाव्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्रकारची कामे हाती घेण्यात येवु नयेत.

**इ.** सदर कामांसाठी "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. "ई-निविदा" अंतीचा खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडुन उपलब्ध करुन दिले जाणार नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-2015/प्र.क्र.82/ नवि-

16 मंत्रालय मुंबई-32 दि. 8 मार्च 2016 नूसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/ नगरपंचायत यांना **"रस्ता अनुदान"** चा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यानूसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस खालील प्रमाणे निधी मंजुर झाला आहे.

(1) मंजुर "सर्वसाधारण रस्ता अनुदान" रु. 75.00 लक्ष (2) मंजुर "विशेष रस्ता अनुदान" रु. 194.00 लक्ष

करिता "सर्वसाधारण रस्ता अनुदान" अंतर्गत रु. 75.00 लक्षाची व "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत रु. 194.00 लक्षाची कामे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/2015/प्र.क्र.90/नवि-16 मंत्रालय मुंबई-32 दि. 16 जानेवारी 2016 मधील 2 (ड) व 3 (ड) अनुक्रमे अन्वये निवड व निश्चिती करुन देणेबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सभागृहनेता** वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने शहरातील प्रमुख रस्त्यांची पुर्नबांधणी सर्वसाधारण रस्ते अनुदान रु. ७५.०० लक्ष, विशेष रस्ते अनुदान रु. १९४.०० लक्ष तसेच मनपा निधी अंतर्गत रु. २१३.०० लक्षाच्या कामे निश्चित करुन अंतीम करण्याचे अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

**अ. सत्तार अ. गफुर** सभागृहनेता यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शहरातील प्रमुख रस्त्यांची पुर्नबांधणी सर्वसाधारण रस्ते अनुदान रु. ७५.०० लक्ष, विशेष रस्ते अनुदान रु. १९४.०० लक्ष तसेच मनपा निधी अंतर्गत रु. २१३.०० लक्षाच्या कामे खालील प्रमाणे अंतीम करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ६४** **ठराव**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण/2015/प्र.क्र.90/नवि-16 मंत्रालय मुंबई-32 दि. 16 जानेवारी 2016 चे कृपया अवलोकन व्हावे.राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या हद्दितील रस्त्यांची देखरेख - दुरुस्ती, रस्ता बांधणी, रस्त्यांचे डांबरीकरण, मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता-पुल व रेल्वे-पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकास करणेसाठी शासनाकडून प्राप्त निधी "सर्वसाधारण रस्ता अनुदान " रुपये ७५.०० लक्ष व "विशेष रस्ता अनुदान" रुपये १९४.०० लक्षाचे निधतुन खालील निश्चित करण्यात आलेल्या डांबरीकरणाचे कामे करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**सर्वसाधारण रस्ते अनुदान अंतर्गतची कामे**

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | अंदाजित किमंत रुपये (लाखात) |
|---|---|---|
| १ | हिंगोली गेट आयुबी चे अप्रोचेस व उजवया व डाव्या दोन्ही बाजुच्या रस्त्याची पुर्नबांधणी करणे ( दोन्ही बाजुस ) | २५.०० |
| २ | शिवाजीनगर भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांची पुर्नबांधणी करणे | २५.०० |
| ३ | शिवाजीनगर ओव्हर ब्रिज दधिजी मार्गासह रस्त्याची पुर्नबांधणी करणे | २५.०० |
| | **एकूण** | **७५.००** |
| | **विशेष रस्ता अनुदान अंतर्गतची कामे** | |
| १ | ईदगाह ते हैदराबाद रोड रस्त्याची पुर्नबांधणी करणे | २०.०० |
| २ | प्रभाग क्रं. २ मध्ये इंदिरानगर येथे विमानतळाच्या संरक्षण भिती पासुन रोड नं. ४४ मेन रोड पर्यंत रस्ता करणे. | १५.०० |
| ३ | नंदी महाराज कमान ते सेवालगा चौक व प्रियदर्शनी ते गुजरी चौक पर्यंत रस्ता करणे | १०.०० |
| ४ | शहाजी मार्केट ते हुतात्मा स्मारक पर्यंत रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०४.०० |
| ५ | देगलुर रोड ते बर्की चौक (केळी मार्केट रोड) रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| ६ | मन्सुर खाँ हवेली ते नावघाट रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| ७ | पहेलवान टी हाऊस ते पिवळी बिल्डींग ते डॉ. भोपले यांचा दवाखाना ते चौफाळा ते बिलालनगर रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| ८ | इतवारा दर्गाह नईम भाई भुसार लेन ते भारत मेडीकल पर्यंतच्या रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| ९ | बरकत कॉम्पलेक्स ते जुना गंज रोड नं. ८ रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १० | लातुर रोड ते आकारशवाणी केंद्रा पर्यंतचा रस्ता | १०.०० |
| ११ | श्रीनगर ते बि.के. हॉल पासुन शामनगर मेन रोड पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणे करणे | १५.०० |
| १२ | बाफना ते टॉवर ते नविन पुल रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १३ | व्ही.आय.पी. रोड आयटीआय ते अण्णाभाऊ साठे चौक रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १४ | अण्णाभाऊसाठे चौक ते एमजीएम कॉलेज रस्त्याची पुर्नबांधणी करणे (नमस्कार चौक पर्यंत) दोन्ही बाजु | १०.०० |
| १५ | प्रा. राठोड यांचे घर ते छोटी दर्गाह – कालापुल पर्यंत रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १६ | शांतीनगर चौरस्ता, जुना गंज, बाबुमियाँ हॉटेल ते श्री जावेद हॉटेलवाले यांच्या घरा पर्यंत (मुर्गी मार्केट) रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| १७ | प्रभाग क्रं. १९ वाहेदनगर भागात रस्ते करणे | १०.०० |
| १८ | खुदवाईनगर चौक ते बोंढार पाण्याची टाकी पर्यंत रस्ता करणे | ०५.०० |
| १९ | बोरबन फॅक्ट्री भागातील रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १५.०० |

| | | |
|---|---|---|
| २० | शिवनगर भागात श्री वट्टमवार यांचे घरापासुन ते रोड नं. २४ पर्यंत रस्ता करणे. | १०.०० |
| २१ | रवीनगर जुना कौठा नरबागे यांचे घरा पासुन ते ठक्कर यांच्या घरा पर्यंत रस्ता करणे | ०५.०० |
| | **एकूण** | **१९४.००** |

**तसेच मनपा निधी अंतर्गत खालील कामे करण्यासाठी रुपये २१३.०० लक्षास प्रशासकिय आर्थीक मान्यता देण्यात हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.**

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | अंदाजित किमंत रुपये (लाखात) |
|---|---|---|
| १ | गोकुळनगर चौक ते आयटीएम रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १५.०० |
| २ | मामा चौक ते बॉम्ब शोधक रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| ३ | मॉल ते भगतसिंग रोड रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| ४ | उस्माननगर रोड ते हडको स्टॉप रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १५.०० |
| ५ | रामनगर कमात ते जे.पी. पाटील रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| ६ | स्वीमींग पुल ते शिवाजीनगर पोलीस स्टेशन रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| ७ | हडको ईएसआर ते सिडको ईएसआर रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| ८ | संभाजी चौक ते सिडको झोन ऑफिस रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १५.०० |
| ९ | चुनाभट्टी रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| १० | साई गॅरेज बाफना आर.यु.बी. ते अण्णाभाऊ साठे चौक रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| ११ | कोर्ट ते लेडीबर्ड स्टेचु ते यात्रीनिवास पोलीस चौकी रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १२ | नावघाट ब्रिज ते दरबार मस्जीद होळी मार्ग पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १३ | भाग्यनगर टी पाईन्ट ते व्हीआयपी रोड रस्त्याची पुर्नबांधणी करणे | १०.०० |
| १४ | पंचशिल ड्रेसेस ते तरोडा नाका रस्त्याची पुर्नबांधणी करणे | २०.०० |
| १५ | चौफाळा ते बिलालनगर नाल्या पर्यंतची रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| १६ | श्री वाघमारे यांचे घर ते री नगरेश्वर मंदीर कलाल गल्ली पर्यंत रस्ता करणे | ०८.०० |
| १७ | शिवाजीनगर ते मोहन चौधरी यांच्या घरापर्यंत रस्त्याची पुर्नबांधणी करणे | ०५.०० |
| १८ | प्रभाग क्रं. १५ श्री मकबुल बेग यांच्या घरापासुन ते श्री पाशा यांचे घर ते श्री दोरास्वामी चेरला यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | १०.०० |
| १९ | तरोडा-बु. बि.अन्ड.सी. कॉलनी मधील अंतर्गत रस्ते करणे | १५.०० |
| २० | वित्तनगर येथील तरोडा बु अंतर्गत रस्ते करणे | १५.०० |
| २१ | अण्णाभाऊ साठे चयौक ते हनुमान मंदिर चौक (टाऊन मार्केट) पर्यंत रस्ता करणे | २०.०० |
| २२ | प्रभाग क्रं. ३६ महात्मा फुले चौक ते शंकरनगर मारोती मंदिर पर्यंत रस्ता करणे | १०.०० |
| २४ | डॉ. भोपळे यांचा दवाखाना ते गणपती मंदिर विणकर कॉलनी पर्य्रंत रस्ता करणे | ०५.०० |
| | **एकूण** | **२५३.००** |

व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०५** **प्रस्ताव**

महानगरपालिका संचित देणे असलेल्या रकमांचा भार महाराष्ट्र शासनाने उचलावा यावर सभागृहात चर्चा करुण निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- अनुजा तेहरा **अनुमोदक** :- हसिना बेगम साबेर चाऊस, अ.लतिफ अ.मजिद, इशरत फातेमा अ.शमीम

**सौ.अनुजा तेहरा** महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट २०१५ रोजीपासून LBT बंद केलेली आहे त्यामुळे महापालिकेस दरमहाचा अत्यावश्यक खर्च भागविणेसुध्दा सध्या कठीण जात आहे. उत्पन्नात मात्र घट झालेली आहे परंतु खर्च पूर्वी होता त्यापेक्षा वाढतच चाललेला आहे. त्यातूनच महानगरपालिकेस देय असलेल्या रकमांचे दायित्व वाढतच चाललेले आहे. आज रोजी महापालिकेस ७.५ ते ८ कोटी रुपये पाणीपुरवठा व विद्युत व्यवस्थेचे वीज बिल महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस देणे बाकी आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्ज रुपये ९ कोटी ९० लक्ष, कर्मचारी सेवनिवृत्ती उपदान ४ कोटी ५० लक्ष, ग्रॅज्युटी व रजा रोखीकरण १ कोटी, कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या ५ हजार ते ८ हजार या वेतनश्रेणीचा फरक रु. ४ कोटी व भूसंपादनाचे ३ कोटी ५३ लक्ष असे महापालिकेचे थकित देणे आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतन यावर दरमहा ६ कोटी ५ लक्ष रु. एवढा खर्च होतो.

महापालिकेमध्ये जकात चालू होती त्यावेळी वार्षिक उत्पन्न ४१ कोटी एवढे होते. त्यानंतर एल.बी.टी. सुरु झाली तर त्यावेळीचे ही वार्षिक उत्पन्न ६१ कोटी इतके हाते. परंतु एल.बी.टी. च्या Against देण्यात येणारे दरमहाचे रु. ४ कोटी २४ लक्ष रुपयांचे अनुदान अतिशय थोडे आहे.

त्यामुळे आज रोजी महापालिकेचे जेवढे काही थकित देणे आहे त्याचा भार महाराष्ट्र शासनाने उचलावा कारण १ ऑगस्ट २०१५ पासून स्थानिक संस्था कर बंद केल्यानंतर देण्यात येणारे अनुदान हे अत्यंत तुटपूंजे आहे त्यामुळेच हे थकित देणे वाढलेले आहे. त्यामुळे महापालिकेचे जे काही थकित देणे आहे ते महाराष्ट्र शासनाने अनुदान स्वरूपात द्यावेत व दरमहा वेतन अनुदानाच्या रुपये २ कोटीचा फरकही

शासनाने द्यावा अशा आशयचा ठराव एकमताने पारीत करुन महाराष्ट्र शासनास पाठवावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**सभागृह नेता** सभापती मॅडमने अतिशय चांगली सुचना मांडली आहे. त्यांच्या सुचनेप्रमाणे ठराव पास करण्यात यावा.

**महापौर** सभापती यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यांचे मी स्वागत करते. प्रशासनाने हा ठराव शासनाला पाठवावा व यात प्रशासनाने पाठपुरावा करावा.

**महापौर** सौ. अनुजा तेहरा यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देवुन शासनास शिफारस करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ६५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट २०१५ रोजीपासून LBT बंद केलेली आहे त्यामुळे महापालिकेस दरमहाचा अत्यावश्यक खर्च भागविणेसुध्दा सध्या कठीण जात आहे. उत्पन्नात मात्र घट झालेली आहे परंतु खर्च पूर्वी होता त्यापेक्षा वाढतच चाललेला आहे. त्यातूनच महानगरपालिकेस देय असलेल्या रकमांचे दायित्व वाढतच चाललेले आहे. आज रोजी महापालिकेस ७.५ ते ८ कोटी रुपये पाणीपुरवठा व वियुत व्यवस्थेचे वीज बिल महाराष्ट्र राज्य वियुत वितरण कंपनीस देणे बाकी आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्ज रुपये ९ कोटी ९० लक्ष, कर्मचारी सेवनिवृत्ती उपदान ४ कोटी ५० लक्ष, ग्रॅज्युटी व रजा रोखीकरण १ कोटी, कर्मचा-यांना लागू केलेल्या ५ हजार ते ८ हजार या वेतनश्रेणीचा फरक रु. ४ कोटी व भूसंपादनाचे ३ कोटी ५३ लक्ष असे महापालिकेचे थकित देणे आहे. तसेच कर्मचा-यांचे वेतन व निवृत्तीवेतन यावर दरमहा ६ कोटी ५ लक्ष रु. एवढा खर्च होतो

महापालिकेमध्ये जकात चालू होती त्यावेळी वार्षिक उत्पन्न ४१ कोटी एवढे होते. त्यानंतर एल.बी.टी. सुरु झाली तर त्यावेळीचे ही वार्षिक उत्पन्न ६१ कोटी इतके हाते. परंतु एल.बी.टी. च्या Against देण्यात येणारे दरमहाचे रु. ४ कोटी २४ लक्ष रुपयांचे अनुदान अतिशय थोडे आहे.

त्यामुळे आज रोजी महापालिकेचे जेवढे काही थकित देणे आहे त्याचा भार महाराष्ट्र शासनाने उचलावा कारण १ ऑगस्ट २०१५ पासून स्थानिक संस्था कर बंद केल्यानंतर देण्यात येणारे अनुदान हे अत्यंत तुटपूंजे आहे त्यामुळेच हे थकित देणे वाढलेले आहे. त्यामुळे महापालिकेचे जे काही थकित देणे आहे ते महाराष्ट्र शासनाने अनुदान स्वरूपात द्यावेत व दरमहा वेतन अनुदानाच्या रुपये २.०० कोटीचा फरकही शासना मार्फत प्राप्त करुन घेण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.०६** **प्रस्ताव**

अमरावती महापालिकेतील सहाय्यक आयुक्त श्री आर. बी. ओगले यांनी अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मालमत्तांना शिक्षण कर व रोजगार हमी करात आयुक्तांची परवानगी न घेता स्वतःच्या अधिकारात नियमबाहय सवलत दिल्यामुळे तसेच त्यांना दिलेली पदोन्नती देखील नियमबाहय असल्याची बाब समोर आली असल्याने आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या प्रस्तावानूसार संबंधितांस सक्तीने सेवानिवृत्त करण्याबाबत केलेली शिफारस सभेने ठरावाव्दारे अमान्य केल्यामुळे नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्रं. अमरावती-२००६/प्र.क्र.६२/नवि-२६ दि. १३ जुलै २०१६ महासभेचा ठराव निलंबित केला आहे. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.)

याचप्रमाणे नांदेड महानगरपालिकेतील श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी खालीलप्रमाणे गैरप्रकार केला आहे.

०१. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद भागातील मटन मार्केट जवळील सर्व्हे नं. ४८ मधील ७२.१६ एवढी जागा शासनाची मान्यता न घेता, स्वतःच्या वडील भावास विक्री करण्यास नियमबाहय मदत केली आहे.

०२. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद सर्व्हे नं. ७७ (जनता मार्केट) येथील जागा मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड येथे महापालिकेने जागा ताब्यात घ्यावी, असा निर्णय दिला होता. या प्रकरणांत आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी सदर जागेवर कोणच्याही नांव परिवर्तन करु नये, असे लेखी आदेश काढले होते.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी वरील सर्व बाब नजर अंदाज करुन आयुक्तांची मान्यता न घेता, स्वतःच्या अधिकारात सदर जागेवर अतिक्रमण केलेल्या नागरीकांच्या नावे नांव परिवर्तन करुन दिले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५९ (१) मधील तरतूदीनूसार वरील प्रकारच्या गैरव्यवहारात महापालिकेचे कर्मचारी / अधिकारी / स.सदस्य सहभागी असल्याचे सिध्द झाल्यास त्याला तात्काळ बडतर्फ करण्याची तरतूद आहे.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या अनाधिकृत बांधकाम कार्यवाही करीत असतांना अडथळा केल्याबद्दल त्यांचेविरुध्द वजिराबाद पोलीस स्टेशन येथे तक्रार झाली होती. ती अदयापी न्यायप्रविष्ट आहे. याच कार्यवाहीत केलेल्या विभागीय चौकशीमध्ये संबंधित हे बाधीत मालमत्ता पाडतांना विरोध केल्याचे, सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचे सिध्द झाले आहेत. त्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना पदावनत करण्याची गंभीर शिक्षा प्रस्तावित केली होती. परंतू महासभेने ती शिक्षा माफ केली आहे. असे असतांना त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांच्या सहाय्यक आयुक्त पदापुर्वीचे पदोन्नतीचे प्रकरण मागील १७ वर्षापासून मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ट असून ते सहाय्यक आयुक्त पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यामुळे शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) नूसार त्यांच्या सहाय्यक आयुक्त पदाच्या पदोन्नतीस मान्यता दिलेली नाही. त्यामुळे ते आता सहाय्यक आयुक्त आहेत, असे कायदयातील तरतूदीनूसार ग्राहय धरता येत नाही. श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांचे वरील सर्व प्रकरणांतील वर्तन पदाचा दुरुपयोग करुन प्रशासकीय शिस्तीच्या विरुध्द झाले असल्यामुळे महापालिकेतील अन्य कर्मचारी / अधिका-याच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वरील सर्व बाब विचारात घेता श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाहय सहाय्यक आयुक्त यांनी प्रशासकीय शिस्तीच्या विरुध्द वर्तन केल्याचे सिध्द होत असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५९ (१) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ मधील (क) व (ड) मधील तरतूदीनूसार शिक्षा लादण्याची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक:-** प्रमोद (बंडु) खेडकर **अनुमोदक :-** कल्याणकर बालाजी दत्तराव, गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल, संगिता पृथ्वीराज राओत्रे

**प्रशासकिय टिप्पणी**

१) **जमिन मालमत्ता विभागा मार्फत आलेली टिप्पणी :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेता यांनी दि. ०१.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये महनपाकेच्या मालकीची वजिराबाद भागातील मटन मार्केट जवळील सर्वे नं. ४८ मधील ७२.१६ एवढी जागा नियमबाहयरित्या विक्री केल्या बद्दल मनपाकेच्या अधिका-यांना निलंबीत करुन पोलीसात गुन्हा दाखल करणे बाबत अर्ज दाखल केला आहे.

सदर बाबत तत्कालीन आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी चौकशी करण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने दोन्ही बाजूची म्हणने मांडण्यासाठी सुनावणी ठेवण्यात आली होती सदर प्रकरणात श्री मा. मा. यवले यांचे वतीने त्यांची बाजु मांडणेसाठी वेळ मागीतलेला आहे. सबब सदर चौकशी प्रक्रिया पुर्ण करुन त्याबाबत योग्यतो निर्णय घेण्यात येईल.

२) **आस्थापना विभागा मार्फत आलेली टिप्पणी :-** दिनांक २६ मार्च १९९७ रोजी नांदेड व वाघाळा या दोन नगरपालिकेचे एकत्रीकरण करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. महापालिका अस्तित्वात येण्यापुर्वी भुतपुर्व वाघाळा नगरपालिकेने श्री प्रकाश माधवराव येवले यांचेसह एकूण १९ कर्मचा-यांना पदोन्नती १० कर्मचा-यांना नियुक्ती दिली होती सदर नियुक्ती व पदोन्नती देतांना विहित पध्दतीचा अवलंब झाला नसल्याने महापालिकेने दिनांक १३.०८.१९९७ च्या आदेशाविरुध्द संबंधीत कर्मचा-यांनी मा. औद्योगीक न्यायालय जालना येथे केस क्रं. ULP १५२/९७ या दाखल केलेल्या प्रकरणात औद्योगीक न्यायालयाने महापालिकेचे दिनांक २९.०७.१९९८ रोजीचे आदेश रद्द केले या आदेशाच्या विरुध्द महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालय खंडपिठऔरंगाबाद येथे याचिका क्रं. ४०६९/९८ अन्वये अपिल दाखल केले असुन अपिल आजपावेतो प्रलंबीत आहे.

असे असतांना श्री प्रकाश माधवराव येवले व इतर पाच कर्मचा-यांना पदोन्नती देण्यासंदर्भात मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५४ नुसार दिनांक ०५.१२.२००५ नुसार निवड समिती गठीत करण्यात आली होती. सदर निवड समितीने शिफारस केल्यानुसार तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. २०५ दिनांक ०४.०२.२००६ अन्वये पारीत करुन का.आ. कं. नावाशमनपा/आस्था-१/१४०५२/२००६ दिनांक ०६.०२.२००६ अन्वये श्री प्रकाश माधवराव येवले यांना श्री रणजीतसिंघ शाहु योचे सेवा निवृत्तीमुळे रिक्त असलेल्या सहाय्यक आयुक्त या पदावर वेतनश्रेणी रुपये ६५००-१०५०० मध्ये पदोन्नती देण्यात आली सदर आदेशात मा. उच्च न्यायालय समोर प्रलंबित असलेल्या याचिकेच्या अधिन राहुन आदेश काढण्यात येत आहे असे आदेशात नमुद आहे.

मा. प्रधानसचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना का.आ.क्रं. मनपा/आस्था-१/१९८२/२००६ दिनांक १५.०५.२००६ च्या पत्राव्दारे श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आलेल्या सहाय्यक आयुक्त या अभिनामाच्या पदास मुंबइ प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ मधील (३) नुसार शासन मान्यता होणेसाठी विनंती करण्यात आली होती. पुन्हा मा. प्रधानसचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना कार्यालयीन पत्र क्रं. मनपा/आस्था-१/९३००/२०११ दिनांक ०५.१२.२०११ च्या पत्राव्दारे स्मरणपत्र देवुन नावाशमनपाकेतील सहाय्यक आयुक्त या अभिनामाच्या पदास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ मधील (४) नुसार शासन मान्यता होणेसाठी विनंती करण्यात आली होती. कक्ष अधिकारी नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना कार्यालयीन पत्र क्रं. मनपा/आस्था-१/२२६२६/२०१५ दिनांक ३०.०३.२०१५ च्या पत्राव्दारे मनपा आस्थापने वरील सहाय्यक आयुक्त या अभिनामाच्या पदावर मनपाकेने दिलेल्या पदोन्नती बाबत शासनाची मान्यता अप्राप्त असल्यामुळे पुनश्च मुंबई प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ मधील (४) नुसार शासन मान्यता होणेसाठी विनंती करण्यात आली होती.

तदनंतर पुन्हा मा. प्रधानसचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना का.पत्र क्रंख मनपा/आस्था-१/५२४०/२०१५ दिनांक २०.०७.१६ च्या पत्रावदारे नावाशमनपाकेतील सहाय्यक आयुक्त या अभिनामाच्या पदास मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५ मधील (४) नुसार शासन मान्यता होणेसाठी विनंती करण्यात आली होती त्याअनुषंगाने कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांनी त्यांचे पत्र क्रं. नावामपा-२०१५/प्र.क्रं.१११/नवि-२४ नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक ०५.०८.१५ या पत्राव्दारे ८ मुद्दयाची माहितीसह सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत त्यानुसार सदर पत्रात नमुद असलेला मुद्दा क्रं. ०४ मध्ये सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नती दिलेल्या अधिका-यांच्या शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची कारणमिमांसा व महासभेच्या ठरावाची प्रत या मुद्दयांची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही प्रस्तावीत आहे.

**विरोधी पक्ष नेता** अमरावती महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त श्री आर.बी. उगले यांनी आयुक्तांची परवानगी न घेतल्यामुळे त्यांना निलबींत केले आहे. या ठिकाणी तर आयुक्ताची परवानगी दिली गेली नाही. श्री सत्तारभाई यांनी ठराव करुन दिला असेल तर त्या संस्थेला जागा दिली असेल तर जर ही जागा मागणी केली असेल तर ती जागा विकत मागण्याची मागणी केलेली नव्हती. मनपाने ठराव करुन दिला आहे त्यात शासनाची परवानगी घेण्यात यावी. या जागेची कोणतीही परवानगी शासनाची घेतलेली नाही. शासनाची मालमत्ता आहे ती मालमत्तेची किमंत 60 ते 70 लाखाची आहे. ती केवळ 7 लाख रुपयाला दिली आहे. तीचे व्हॅलीव्हेशन केले तर 11 लाख रुपये होते तर सातच लक्ष भरले मग यात 4 लक्ष रुपयाची तफावत या ठिकाणी दिसत आहे. किती मोठा जमीन घोटाळा आहे. या जमीनीचा टॅक्स भरला गेला नाही. मा. खोडवेकर साहेबांनी पत्र काढले होते की, जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी टॅक्स भरुन घ्यावा.जेव्हा नांव परिवर्तन करीता आहात तेव्हा टॅक्स भ्रण्याची आपणास आवश्यकता का वाटली नाही हे से कोणाचे होते ते पैसे गेले कोठे का भरायचे होते. यांच्यासाठी काही नियम धाब्यावर बसवावयाचे काय ? आम्हाला संस्थेबाबत काहीही मनवायाचे नाही. विकण्याचा अधिकार कोणी दिला आणि कोणाला दिला.

एका दिवसात रजीष्ट्री करावयाची एका दिवसात पैसे भरायचे यात शासनाची परवानगी घेतली काय ? दुसरी बाजू जनता मार्केटची आहे. कोर्टाचे आदेश असतांना सुध्दा ती जागा झोनल अधिकारी होते त्यांनी ती जागा हे झोनल ऑफिसर होते. कोणत्याही नियमाची आयुक्ताकडून न परवानगी घेतली नाही. कोणाचीही परवानगी न घेता आपल्या अधिकारात ती जागा नांवावर करुन दिली आहे. ती जागा ही विस कोटीची आहे. नांव परीर्वतन करुन देताना आपले स्वत:चे अधिकार वापरलेले आहेत.कोर्टाचे आदेश असतांना सुध्दा कोणत्याही आयुक्ताचे किंवा सभेची मान्यता न घेता नावपरिर्वतन करुन दिलेले आहे. मग झोनलला एवढे अधिकार आहेत का ? मग आपले मनपात खुप मालमत्ता आहेत खुप किरायदार आहेत बाजार भावाप्रमाणे रजिष्ट्रीकरुन घेण्यास तयार आहेत तर मग दयाना रजिष्ट्रीकरुन. आपली जी बिकट अवस्था आहे ती तरी दुर होईल. कर्मचारी यांचे पगारी होत नाही ही जागा विकली याची कोण वाट लावणार याची संचीका सुध्दा गायब आहे. त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही काय ते या ठिकाणी बसुन दादागीरी करत आहेत काय ? एक झेरॉक्स मागीतली तर दोन दिवस संचिका आमच्याकडे येत नाही. संचिका कशा काय गायब होता. तुम्ही या ठिकाणी आयुक्त म्हणून बसलात जर कोणी पदाचा गैरवापर करत असलो तर किंवा मनपाच्या फाईल जाळून टाकता काय याला जबाबदार कोण ? त्या झोनल आफीसला विचाराना ? ते स्वत:चे मालक झाले आहे काय ? नांदेड शहराचे मालक आहेत काय ? अमरावती मनपाकेत शिक्षण संस्थेला परवानगी दिली नाही म्हणून निलबींत केले जाते मग या मनपाकेत त्याला का निलबिंत केले जात नाही. का त्याची पाठराखन केल्या जाते याचा खुलासा आयुक्तांनी करावा. आमच्या सोबत सर्व सभागृह सोबत आहे त्यांना पाठीशी का घालत आहात याचा खुलासा करण्यात यावा. संस्थेचे हीत पहाणार आहात की नाही हे सांगा. एखादा नगरसेवक अनाधिकृत बांधकाम करत असेल तर त्याला नोटीस देण्यात येत असते. मग यांना का नोटीस देण्यात आली नाही हे सांगा ? आम्ही सांगत आहोत आणि तुम्ही एकत आहात. सांगणे आणि ऐकने एवढाच प्रकार आहे. कोणतीही कार्यवाही आपण आयुक्त साहेब करणार नसला तर आपल्या विरुध्द रिट पिटीशन दाखल करावे लागले. त्यात आयुक्तावर सुध्दा रीट पीटीशन दाखल करील. आपण वेळ मारुन नेत आहोत मला याचा खुलासा करण्यात यावा.

श्री प्रकाश माधवराव येवले, नियमबाह्य सहाय्यक आयुक्त यांच्या सहाय्यक आयुक्त पदापुर्वीच्या पदोन्नतीचे प्रकरण मागील १७ वर्षा पासुन मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असून ते सहाय्यक आयुक्त पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यामुळे शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(४) नुसार त्यांच्या सहाय्यक आयुक्तपदाच्या पदोन्नतीस मान्यता दिलेली नाही. त्यामुळे ते आता सहाय्यक आयुक्त आहे, असे कायद्यातील तरतुदीनुसार ग्राह्य धरता येत नाही. श्री प्रकाश माधवराव येवले, नियमाबह्य सहाययक आयुक्त यांच्या वरील सर्व प्रकरणातील वर्तन पदाचा दुरुपयोग करुन प्रशासकीय शिस्तीच्या विरुध्द झाले असल्यामुळे महापालिकेतील अन्य कर्मचारी / अधिका-यांच्या मनोधर्यावर विपरित परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

०१. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद भागातील मटन मार्केट जवळील सर्व्हे नं. ४८ मधील ७२.१६ एवढी जागा शासनाची मान्यता न घेता, स्वतःच्या वडील भावास विक्री करण्यास नियमबाहय मदत करणे.

०२. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद सर्व्हे नं. ७७ (जनता मार्केट) येथील जागा मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड येथे महापालिकेने जागा ताब्यात घ्यावी, असा निर्णय दिला होता. या प्रकरणांत आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी सदर जागेवर कोणाच्याही नांव परिवर्तन करु नये, असे लेखी आदेश काढले होते असे असतांनाही त्यांनी अधिकार नसतांना स्वतःच्या अधिकारात आयुक्तांची मान्यता न घेता नाव परिवर्तणची कार्यवाही करुन सदरची संचिका गहाळ करणे.

०३ चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या विविध प्रकारच्या ३० दिवसा पेक्षा रजा मंजुर करण्याचे अधिकार नसतांनाही ३० दिवसापेक्षा अधिक कालावधीच्या रजा मंजुर करणे.

श्री प्रकाश माधवराव येवले यांनी अधिकार नसतांना आपल्या अधिकाराचा गैरवापर, विभागीय नियमांचा, शिस्तीचा भंग, व गैरवर्तणुक, केली असल्यामूळे त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ मधील तरतुदीनूसार नुसार त्वरीत निलंबीत करण्याची प्रशासकिय मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. तसेच आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणात श्री प्रकाश माधवराव येवले उपआयुक्त/सहाय्यक आयुक्त यांची विभागिय चौकशी अधिका-यामार्फत विभागीय चौकशी करुन चौकशी अहवाल तीन महिण्याच्या आत महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर निर्णय घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** शिवाजी नगर जनता मार्केट येथील विभागाचे झोनल अधिकारी हे येवले साहेब होते 2013.-14 व 2014-15 ला सभेचा कोणताच ठराव झालेला नाही या दोन वर्षाच्या काळात सर्वोच्च न्यायालयाचा स्टे असताना अशा गोष्टी करणे योग्य आहे काय ? श्री बंडू खेडकरांनी म्हटल्याप्रमाणे अमरावती मनपात सहा.आयुक्तावर

कारवाई केली तीश कारवाई करावी.असे म्हणतात की हात की कगंन को आईने की क्या जरुरत अशी हींदीत म्हण आहे. सर्व गोष्टी आम्ही नियमाने कायदयाने सांगत आहोत कोणताही ठराव झालेला नाही म्हणून यात महापौराच्या संमतीने संबधीतावर कार्यवाही करावी.

**आयुक्त** स.सदस्याने या संदर्भात जी माहीती सभागृहात ठेवली आहे आणि त्याच्यामध्ये चौकशी करण्याचे मागणी केली आहे या दोन्ही गोष्टी एका महीण्याच्या आत निश्चीपेणे निर्णय घेतला जाईल. पाठराखण करण्याचा प्रश्नच नाही आहे. ते बैयक्तीक पावर नसुन ते समाजाचे पावर आहेत. स्वतःच्या फायदयासाठी त्याचा निश्चीतपणे वापर केला तो पावर वापरला गेला नाही पाहीजे. ज्या आपण त्रुटी सांगीतल्या आहेत त्या सुनावणीच्या वेळी लक्षात घेतल्या जातील त्याप्रमाणे निश्चीतपणे कार्यवाही केली जाईल.

**विरोधी पक्ष नेता** ज्या संचिका आहेत त्यामधुन कागदपत्र गायब होत आहेत त्या फाईली आपल्या कस्टडीत ठेवाव्यात एकदा त्यांना उपायुक्त म्हणुन बसवून तरी टाका म्हणजे आमचे टेशन र्लाल आम्ही सांगतो त्यावर काहीच करा नाही कुठलातरी एक निर्णय घ्याव ही संचीका कशी काय गायब होते. मा. महापौर हे सांगा ज्यांनी ती गायब केली त्यावर काय कार्यवाही होणार. आमच्या एखादा नगरसेक बांधकामात गेला त्याला लगेच नोटीस देण्यात येते. संचिका गायब होणे हा प्रकार कसा काय होतो. याला ते अधिकारी जबाबदार नाहीत काय त्या उपायुक्ताने सर्व चार्जे काढून टाका शिवाजीनगर जमिनीची, बकरा मटन मार्केटची, आकृती बंधाची या सर्व फाईली आपल्या कस्टडीत ठेवण्यात याव्या. त्यांनी कुठल्याही फाईल आपल्या हाताळु नये असे रुलींग देण्यात यावी तो आपला अधिकार आहे. आज एक वर्ष झाल संचिका सापडत नाहीत. सगळया विभागाला पत्र दिलेले आहे. पेपरला जाहीर प्रकटन देण्यात यावे साहेब उन्हाळे तुमचे नांव आहे. तुम्ही उन्हाळयासारखे वागले तर दोन दिवसात फाईल येवू शकते. उन्हाळया सारखे वागा. पावसाळयासारखे वागु नका. आपला चमत्कार दाखवा वेळ काढून घेवू नका. यांच काय झाल त्यांच काय झाल हेच कराव का आम्ही संचीका गायब होते याला कोणी जबाबदार आहे की नाही याचा खुलासा करण्यात यावा. अधिकारी येईल त्याच्या हिशोबाने लिहीत आणि फाईल गायब करुन जाईल असाच प्रकार होत राहणार काय ?

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** सर्वात प्रथम फाईली ताब्यात घेण्यात याव्यात चौकशी होईपर्यत त्या अधिका-याचे अधीकार काढून घेण्यात यावेत.

**सभागृह नेता** या ठिकाणी खेडकरांनी जो प्रस्ताव ठेवला आहे मागच्या मिटींगमध्ये ही हा प्रस्ताव ठेवण्यात आला होत. जमिनीचा विषय होता शासनाची मान्यता घेवून कार्यवाही करण्यात यावी. यात जी अनियमितता झाली आहे ती आयुक्तांनी जरुर तपासावी आणि दुसरा विषय नांव परीवर्तनाचा ती फाईल गायब झाली आहे ही चुक नाही साध्य नांव परीवर्तन वेगळी गोष्ट आहे. मनपाचे 20-25 कोटीची जमीन आहे मनपाच्या कोर्टात केस चालू आहे काही केसचा अपल्या बाजून निकाल जागलेला आहे एक वेळ अशी होती की मनपाने जावून पझेशन घ्यावे ते काही कारणास्तव राहीले आयुक्त हे आदेश देतात या मालमत्तेचे नांव परीवर्तन करु नये. झोनल अधिका-याला एवढी काय घाई होती की तत्काळ नाव परीवर्तन करुन दिले व फाईलही गायब केली ही काम करण्याची कुठली पध्दत आहे जिथे मनपाकेचे आर्थीक नुकसान होते तिथे कोणत्याही अधिका-याला सोडायचे नाही ते येवले आहेत म्हणुन सांगत असुन कोणताही अधिकारी असो आता नांव परिवर्तन करुन दिले त्यामुळे त्याला एक पायरी पुढे जाता आले आणि त्याचा आधार आणखी पक्का झाला व फाईल गायब झाली अशाना तुम्ही पाठीशी घालणार आहात काय याची चौकशी करावी मनपा झाल्या झाल्या मा. आयुक्त साहेब श्री पिंगळे यांनी दोन आलमा-या भर फाईल सिल केल्या होत्या साहेब फाईल मागवा व आपल्या कपाटात लॉक मारुन टाका पिंगळे साहेबांनी सिल मारलेली सित आम्ही ५ वर्षानंतर खोलले होते जी चिंताग्रस्त फाईल आहेत ते आपण बोलवण्यात याव्यात ज्या ठिकाणी आर्थीक नुकसान होणार आहे अशा अधिका-यास आपण सोडू नये.

**विरोधी पक्ष नेता** याला काही कायदा आहे की नाही संचीका गायब झाल्यावर गुन्हा दाखल करता येवू शकतो. त्यांच्यावर गुन्हा दाखल का करण्यात येत नाही. आपल्याकडे ही संचिका आली का हे भांडार , बांधकाम,टीपी, यांना विचारणा करण्यात आली आता सगळयाचे पत्र येवून टेकलेत. आमच्याकडे संचीका नाही म्हणुन श्री अटकोरे साहेबांना या संचिके बददल चौकशी केली असता कोणत्याही विभगात संचीका नसलयाचे सांगण्यात आल आहे. जे संबधीत अधिकारी होते त्यांच्यावर गुन्हा दाखल करता येते की नाही. एखादया चतुर्थश्रेणी कर्मचा-याने पैसे भरले नाही तर आपण त्याच्यावर कार्यवाही करतो 15 दिवस त्या कम्रचा-याने पैसे वापरले तर सहाय्यक आयुक्त त्याच्यावर गुन्हा दाखल करता. एवढा मोठा प्रकार होवून सुध्दा सगळे डोळे झाक करता काय असेच अधिकारी माजत जाणार की नाही हे सांगा. आम्हाला यांच्यावर गुनहे दाखल झालेले पाहीजेत.

**सरजीतसिंघ गिल** विरोधी पक्षनेता यांनी दोन मुददे मांडले आहे 1) जमीनीशी निगडीत असून माजी महापौर अ.सत्तार यांनी मनाचा मोठेपणा करुन ते 40 वर्षापासुन त्या ठिकाणी राहतात यासाठी त्यांना शासनाची मान्यता घेवून जागा देण्यात यावी असा ठराव केला होता. संबंधीतावर आपण निश्चीत कार्यवाही करणार आहोत. आयुक्त सुध्दा करत होते. बहुतेक त्यांनी रजीस्ट्री सुध्दा परत केली आहे तो विषय आपोआप संपुष्टात येते नगरसेवक आधिकारी यांच्या गैरसमजामुळे हे प्रकार झालेले आहेत.

**सरजितसिंघ गिल** — एक विषय यापुर्वी आपण मिटवला होता तसाच हा मिटवण्यात यावा 2) विषय फाईल गहाळ झालेला विषय तो गंभीर आहे. ज्या ज्या अधिका-याने त्या संचिकामध्ये कार्यवाही केली त्यांच्यावर निश्चीतपणे कार्यवाही करण्यात यावी. अख्तर नांवाच्या कम्रचा-यानं8 ते9 लाखाची अफरातफर केली आहे त्यांच्याकडून पैसे भरुन घेतले आहेत त्याला कामावर घ्यावे त्यावा ठरावा ही करुन दिलेला आहे.

**दिपकसिह रावत** — ज्या कर्मचा-याने अफरातफर केली होती त्यांच्यासोबत सुरेश कुलकणी नावाचा कर्मचारी होता की नाही हे मला माहित नाही तरंतू प्रकाश येवले यांनी सुरेश कुलकर्णी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी वजीराबाद पोलीस स्टेशनला गेले होते. गिरीष कदमचा हा वेगळा विषय होता तो नगरसेवकातील होता. येवलेचा विषय हा मनपाशी निगडीत आहे जे पुरावे दाखल केलेले आहेत त्यावरुन तो माफीचा साक्षीदार सुध्दा होवू शकत नाही आम्ही आपल्यासमोर पुरावे सादर केले आहे तो माफीचा साक्षीदार होवू शकत नाही. निश्चीतपणे आपण यावर निर्णय घ्या. आयुक्त साहेब आपणास हे करावेच लागणार आहे. एखादया वसुली लिपीकाने अफरातफर केली तर त्यावर आपण कार्यवाही करतो. एका वसुली लिपीकाने 67 हजार रुपयासाठी तीन वेळेस अर्ज केला होता. तरी त्याला आपण कामावर घेतले नाही. मुस्तफा अली होता. या कर्मचा-याला बडतर्फ केले येथे कोणी बालायलाच तयार नाही की त्यांनी चुक केली की नाही. सभागृहात चर्चा होते बाकी काही होत नाही असे चालणार नाही. यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. आपले अधिकारी तीन कोटी रुपये बसुल करत आहेत. आम्ही आपणास आरसा दाखवला आहे आता गुन्हा दाखल करावा लागेल.

**बाळासाहेब देशमुख (तरोडा)** — एका सिडकोच्या वसुली लिपीकाने अफरातफर केली होती त्याला निलबिंत केले होते त्याला कामावर घेण्यात यावे. त्याला कामावर घेण्यात आले नाही.

**आयुक्त** — कोणत्याही अधिका-यास पाठीशी घालण्याचा काही प्रश्न नाही आहे जर काही गंभीर चुका झाल्या असतील तर हेतुपुरस्सर झाल्या असतील तर निश्चीतपणे कार्यवाही केली जाईल ते काणीही असु दे मी असेल तर माझ्यावरही कार्यवाही होईल. मनपाचे कामकाज करत असतो. संस्थेचा विश्वास अर्हता ही महत्वाची असते. या विश्वास अर्हतवरच नागरीकांचा बगण्याचा दृष्टीकोनही असतो. मी आपणास आस्वस्थ करु इच्छीतो की पाठीशी घालण्याचा कोणताही प्रकार असू शकत नाही. जर मनपाचे आर्थिक नुकसान झाले तर निश्चीतपणे कार्यवाही करण्यात येईल. विहीत कार्यवाही केली तरच त्याची केस स्टॅन्ड होत नाही. यासाठी प्रोसेस ऑफ लॉ हे प्रोसेस करणे अत्यंत गरजेचे असते. नैसर्गीक न्यायाने संधी देणे अपेक्षीत असते. प्रशासनाची भुमीका अशीच आहे पाठीशी घालण्याची नाही. कठोर कार्यवाही करावीच लागणार आहे. कोणी म्हणते म्हणून नाही तर जर चुका झाल्या असतील तर कार्यवाही करणे आवश्यकच आहे.

**दिपकसिंह रावत** — जमीन घोटाळयाचा जो विषय झाला आहे. मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे निर्णय झालेला होता या निर्णयाची अवहेलना करुन न्यायालयाच्या निर्णयाला डोळे झाक करुन या जमीन घोटाळा झालेला आहे येथे न्यायालयाचा अपमान झालेला आहे. हा मनपाकेत गंभीर प्रकार झाला आहे. अशी अधिका-याकडे न्यायालयाच्या प्रकरणे चालू असताना संचीका या इकडे तीकडे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी प्रशासनाचे सर्वोच्च अधिकारी आयुक्त यांचेकडे या संचिका ताव्यात घ्याव्यात. या अधिका-यांने पदाचा दुरुपयोग केला आहे. जमीन घोटाळा केला आहे. यामध्ये अधिका-यावर चौकशी सुरु झाली आहे. या अधिका-याची चौकशी करुन कार्यवाही करावीच लागणार आहे. पेपरमध्ये बातम्या येत आहेत त्यामुळे अशा प्रकरणात कार्यवाही केली नाही तर जनतेमध्ये मनपावर विश्वास राहणार नाही. अशा अधिका-यावर सखोल चौकशी करावी. चौकशीला लागेल इतका वेळ त्यांनी घ्यावा. विहीत कालावधी घेवून त्या संबधीत अधिका-यावर तात्काळ कार्यवाही करावी.

तसेच श्री प्रमोद बंडू खेडकर विरोधी पक्षनेता यांनी श्री प्रकाश माधवराव येवले यांना अधिकार नसतांना चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या विविध प्रकारच्या ३० दिवसा पेक्षा रजा मंजुर करण्याचे अधिकार नसतांनाही ३० दिवसापेक्षा अधिक कालावधीच्या रजा मंजुर केलेली आहे हे गंभीर चुक आहे शिस्तभंग विषयक आहे. श्री प्रकाश माधवराव येवले यांनी अधिकार नसतांना आपल्या अधिकाराचा गैरवापर, विभागीय नियमांचा, शिस्तीचा भंग, व गैरवर्तणुक, केली असल्यामूळे त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ मधील तरतुदीनूसार नुसार त्वरीत निलंबीत करण्याची प्रशासकिय मान्यता देण्यात यावी. तसेच आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणात श्री प्रकाश माधवराव येवले उपआयुक्त/सहाय्यक आयुक्त यांची विभागिय चौकशी अधिका-यामार्फत विभागीय चौकशी करुन चौकशी अहवाल तीन महिण्याच्या आत सर्वसाधारण सभे समोर सादर करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** — श्री प्रमोद बंडू खेडकर विरोधी पक्षनेता यांनी आपल्या प्रस्तावा पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्याची विनंती केल्यामुळे नांदेड महानगरपालिकेतील श्री प्रकाश माधवराव येवले, यांच्याकडे नावाशमनपाकेच्या उपआयुक्त / सहाय्यक आयुक्त या पदाचा पदभार असतांना त्यांनी खालील प्रकरणात अधिकार नसतांना नियमबाहय अधिकाराचा गैरवापर करुन महानगरपालिकेचे हिताच्या विरुध्द काम करुन महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान केले असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.प्रकाश येवलेची चौकशी करुन दोषी आढळल्यास तात्काळ कार्यवाही करावी

०१. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद भागातील मटन मार्केट जवळील सर्व्हे नं. ४८ मधील ७२.१६ एवढी जागा शासनाची मान्यता न घेता, स्वतःच्या वडील भावास विक्री करण्यास नियमबाहय मदत करणे.

०२. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद सर्व्हे नं. ७७ (जनता मार्केट) येथील जागा मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड येथे महापालिकेने जागा ताब्यात घ्यावी, असा निर्णय दिला होता. या प्रकरणांत आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी सदर जागेवर कोणाच्याही नांव परिवर्तन करु नये, असे लेखी आदेश काढले होते असे असतांनाही त्यांनी अधिकार नसतांना स्वतःच्या अधिकारात आयुक्तांची मान्यता न घेता नाव परिवर्तणची कार्यवाही करुन सदरची संचिका गहाळ करणे.

०३ चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या विविध प्रकारच्या ३० दिवसा पेक्षा रजा मंजुर करण्याचे अधिकार नसतांनाही ३० दिवसापेक्षा अधिक कालावधीच्या रजा मंजुर करणे.

श्री प्रकाश माधवराव येवले यांनी अधिकार नसतांना आपल्या अधिकाराचा गैरवापर, विभागीय नियमांचा, शिस्तीचा भंग, व गैरवर्तणुक, केली असल्यामूळे त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ मधील तरतुदीनूसार नुसार त्वरीत निलंबीत करण्याची प्रशासकिय मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. तसेच आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणात श्री प्रकाश माधवराव येवले उपआयुक्त / सहाय्यक आयुक्त यांची विभागिय चौकशी अधिका-यामार्फत विभागीय चौकशी करुन चौकशी अहवाल तीन महिण्याच्या आत महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर निर्णय घेण्यासाठी सादर करावा असे ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ६६** **ठराव**

नांदेड महानगरपालिकेतील श्री प्रकाश माधवराव येवले, यांच्याकडे नावाशमनपाकेच्या उपआयुक्त/सहाय्यक आयुक्त या पदाचा पदभार असतांना त्यांनी खालील प्रकरणात अधिकार नसतांना नियमबाहय अधिकाराचा गैरवापर करुन महानगरपालिकेचे हिताच्या विरुध्द काम करुन महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान केले असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

०१. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद भागातील मटन मार्केट जवळील सर्व्हे नं. ४८ मधील ७२.१६ एवढी जागा शासनाची मान्यता न घेता, स्वतःच्या वडील भावास विक्री करण्यास नियमबाहय मदत करणे.

०२. महानगरपालिकेच्या मालकीची वजिराबाद सर्व्हे नं. ७७ (जनता मार्केट) येथील जागा मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड येथे महापालिकेने जागा ताब्यात घ्यावी, असा निर्णय दिला होता. या प्रकरणांत आयुक्त महानगरपालिका, नांदेड यांनी सदर जागेवर कोणाच्याही नांव परिवर्तन करु नये, असे लेखी आदेश काढले होते असे असतांनाही त्यांनी अधिकार नसतांना स्वतःच्या अधिकारात आयुक्तांची मान्यता न घेता नाव परिवर्तणची कार्यवाही करुन सदरची संचिका गहाळ करणे.

०३ चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या विविध प्रकारच्या ३० दिवसा पेक्षा रजा मंजुर करण्याचे अधिकार नसतांनाही ३० दिवसापेक्षा अधिक कालावधीच्या रजा मंजुर करणे.

करिता उपरोक्त प्रकरणात श्री प्रकाश माधवराव येवले यांनी अधिकार नसतांना आपल्या अधिकाराचा गैरवापर, विभागीय नियमांचा, शिस्तीचा भंग, व गैरवर्तणुक, केली असल्यामूळे त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ मधील तरतुदीनूसार नुसार त्वरीत निलंबीत करण्याची प्रशासकिय मान्यता हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. तसेच आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणात श्री प्रकाश माधवराव येवले उपआयुक्त/सहाय्यक आयुक्त यांची विभागिय चौकशी अधिका-यामार्फत विभागीय चौकशी करुन चौकशी अहवाल तीन महिण्याच्या आत महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर निर्णय घेण्यासाठी सादर करावा असे ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०७** **प्रस्ताव**

कु. रत्नमाला रामदास अल्लमवाड, रा. नांदेड यांची जा.क्रं. ९१८/२०१०, नगरपरिषद कार्यालय रिसोड दिनांक २८.०९.२०१० रोजी सह शिक्षीका (शिक्षण सेवक) या पदावर अनु. जमाती या संवर्गामधून नियुक्ती झालेली असून दिनांक २७.०९.२०१३ रोजी शिक्षणसेवक कालावधी संपल्यानंतर जा.क्रं. नपरि/नियमित सेवा/प्राथ/शिक्षण/कावी-४६०/२०१४ दिनांक १२.०५.२०१४ अन्वये कायम वेतनश्रेणीत सामावून घेण्यात आलेले आहे तसेच संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवासी असून पती पत्नी एकत्रीकरण अंतर्गत आंतरजिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे एकतर्फी बदली करण्यासाठी रितसर अर्ज सादर केलेला आहे. तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद, रिसोड जि. वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रं. नपरि/८६०/२०१६ दिनांक २४.०६.२०१६ अन्वये उकत सहशिकेस नगरपरिषद रिसोड येथील आस्थापनेवरुन नावाशमनपा नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर आंतर जिल्हा बदलीस सदरील कार्यालयाची कांही हरकत नाही असे कळविलेले आहे.

करिता नावाशमनपाकेच्या शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेल्या जागेवर एकतर्फी बदलीने सदर सह शिक्षीकेस सामावून घेण्यासाठी सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक**:- संजय गंगाधरराव मोरे **अनुमोदक** :- उमेश देवराव पवळे

**प्रशासकिय टिप्पणी**

श्रीमती रत्नमाला रामदास आलमवाड रा. नांदेड यांची जा.क्रं. ९१८/१० नगरपरिषद कार्यालय रिसोड दि. २८.०९.१० रोजी सह शिक्षीका (शिक्षणसेवक) या पदावर अनु. जमाती या संवर्गातुन नियुक्ती झालेली असून दि. २७.०९.२०१३ रोजी शिक्षणसेवक कालावधी संपल्यानंतर जा.क्रं. नपरि/नियमित सेवा/प्राथ.शिक्षण/कावि-४६०/२०१४ दि. १२.०५.१४ अन्वये वेतनश्रेणीत सामावून घेण्यात आले असून संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवासी असल्याने त्यांनी शासन परिपत्रक क्रं. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, जिपब-०७११/प्र.क्र.११३/११/आस्था-१४/२०११, दिनांक २९.०९.११ अन्वये पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत आंतर जिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे एकतर्फी बदली करण्यासाठी रितसर अर्ज केलेला आहे. तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद रिसोड जि. वाशीम यांचे कार्यालयीन पत्र क्रं. नपरि/८६०/१६ दि. २४.०६.१६ अन्वये उकत सहशिक्षीकेस नगरपरिषद आस्थापनेवरुन नावाशमनपा नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर अंतर जिल्हा बदलीस सदरील कार्यालयाची हरकत नसल्याचे कळविले आहे. तथापि, सदर शासन निर्णयानुसार दोघांपैकी एक जिल्हा परिषद व दुसरा हा जिल्हा परिषद / राज्य शासन / केंद्र शासन / स्वायत संस्थेचा (महानगरपालिका, नगरपालिका) / राज्य अथवा केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी / खाजगी संस्थेतील कर्मचारी असेल तर पती पत्नी एकत्रीकरणाचा लाभ देण्यात येतो. परंतु संबंधीत हया स्वायत संस्थेच्या कर्मचारी असून त्यांचे पती हे खाजगी संस्थेतील कर्मचारी आहेत. करिता उपरोक्त शासन निर्णय संबंधीतांना लागू होत नसल्यामुळे संबंधीतांना नावाशमनपा शिक्षण आस्थापनेवर सामावून घेता येणार नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो शासन निर्णय दिनांक २९.०९.२०११ अन्वये आयुक्तांनी पुढील नियमानुसार कार्यवाही करावी

**ठराव क्रं. ६७** **ठराव**

कु. रत्नमाला रामदास अल्लमवाड, रा. नांदेड यांची जा.क्रं. ९१८/२०१०, नगरपरिषद कार्यालय रिसोड दिनांक २८.०९.२०१० रोजी सह शिक्षीका (शिक्षण सेवक) या पदावर अनु. जमाती या संवर्गामधून नियुक्ती झालेली असून दिनांक २७.०९.२०१३ रोजी शिक्षणसेवक कालावधी संपल्यानंतर जा.क्रं. नपरि/नियमित सेवा/प्राथ/शिक्षण/कावी-४६०/२०१४ दिनांक १२.०५.२०१४ अन्वये कायम वेतनश्रेणीत सामावून घेण्यात आलेले आहे तसेच संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवासी असून पती पत्नी एकत्रीकरण अंतर्गत आंतरजिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे एकतर्फी बदली करण्यासाठी रितसर अर्ज सादर केलेला आहे. तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद, रिसोड जि. वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रं. नपरि/८६०/२०१६ दिनांक २४.०६.२०१६ अन्वये उकत सहशिकेस नगरपरिषद रिसोड येथील आस्थापनेवरुन नावाशमनपा नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर आंतर जिल्हा बदलीस सदरील कार्यालयाची कांही हरकत नाही असे कळविलेले आहे.

करिता नावाशमनपाकेच्या शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेल्या जागेवर एकतर्फी बदलीने सदर सह शिक्षीकेस सामावून घेण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.०८** **प्रस्ताव**

मनपा हद्यीतील प्रभातनगर, श्रीनगर पोलीस कॉलनी, वर्कशाप, हर्षनगर भागातील पाणी वाहत जाऊन शाहुनगर भागात येथून येणा-या नाल्याचे नालीत रुपांतर झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे शाहु नगर भागात नाल्याचे व ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत असल्यामुळे सदर ठिकाणची नाली व ड्रेनेज लाईन सुरळीत प्रवाहीत करण्याची व्यवस्था प्रशासनाने करण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- किशोर भवरे

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्या येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ६८** **ठराव**

मनपा हद्यीतील प्रभातनगर, श्रीनगर पोलीस कॉलनी, वर्कशाप, हर्षनगर भागातील पाणी वाहत जाऊन शाहुनगर भागात येथून येणा-या नाल्याचे नालीत रुपांतर झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे शाहु नगर भागात नाल्याचे व ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत असल्यामुळे सदर ठिकाणची नाली व ड्रेनेज लाईन सुरळीत प्रवाहीत करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.०९** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्यीतील सिडको येथील रहिवाशी कु. दिपा प्रकाश गवळे ही मार्शल आर्ट खेळाडू असून तिच्या आजपर्यंतच्या मार्शल आर्टच्या प्रवासात तिला २२ पेक्षा जास्त राष्ट्रीय स्तरावरील सुवर्ण पदक मिळालेले आहेत.

तसेच व्हिएतनाम येथे होणा-या एशियन बिच गेम्ससासठी तिची निवड झाली असून या सपर्धेत भाग घेण्यासाठी तिला आर्थीक मदतीची गरज आहे सदर खेळाडू ही अनुसूचित जातीतील मागासवर्गीय आहे व तिची आर्थीक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे तिचे वडील श्री प्रकाश गवळे हे ऑटोरिक्षा चालक असून त्यावरच त्यांच्या कूटूंबाचा प्रपंच चालता. कु. दिपा प्रकाश गवळे या मुलीस मनपा तर्फे राष्ट्रीय खेळाडू म्हणुन आर्थीक मदत केली तर तिचे भावी आयुष्य उज्वल होवून देशपातळीवर तिचे नावलौकीक होईल. करिता आर्थीक दृष्टया कमकुवत असलेल्या मागास वर्गातील कु. दिपा प्रकाश गवळे या खेळाडूस सहानुभुतीपुर्वक विचार करुन तिला प्रवास खर्चासाठी लागणारे रु. ५०,०००/- ची आर्थीक मदत देवुन सहकार्य करणेसाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- डॉ. ललिता मुकूंब बोकारे (शिंदे) **अनुमोदक** :- वैजयंती भिमराव गायकवाड

**प्रशासकिय टिप्पणी**

कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/लेवि/४१७८/२०११ दिनांक २६.०९.२०११ च्या पत्रात अट क्रं. १० मध्ये विविध संस्थांना देण्यात येणारे अनुदान मनपाची आर्थीक परिस्थिती पाहता बंद करण्यात येते सामान्य प्रशासन विभागाने सदर नियमावली अंतर्गत कोणतीही संचिका सादर करुपये तसे केल्यास संबंधीतावर कार्यवाही केली जाईल असेन नमुद आहेत

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ६९** **ठराव**

नावाशमनपा हद्यीतील सिडको येथील रहिवाशी कु. दिपा प्रकाश गवळे ही मार्शल आर्ट खेळाडू असून तिच्या आजपर्यंतच्या मार्शल आर्टच्या प्रवासात तिला २२ पेक्षा जास्त राष्ट्रीय स्तरावरील सुवर्ण पदक मिळालेले आहेत.

तसेच व्हिएतनाम येथे होणा-या एशियन बिच गेम्ससासठी तिची निवड झाली असून या सपर्धेत भाग घेण्यासाठी तिला आर्थीक मदतीची गरज आहे सदर खेळाडू ही अनुसूचित जातीतील मागासवर्गीय आहे व तिची आर्थीक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे तिचे वडील श्री प्रकाश गवळे हे ऑटोरिक्षा चालक असून त्यावरच त्यांच्या कूटूंबाचा प्रपंच चालता. कु. दिपा प्रकाश गवळे या मुलीस मनपा तर्फे राष्ट्रीय खेळाडू म्हणुन आर्थीक मदत केली तर तिचे भावी आयुष्य उज्वल होवून देशपातळीवर तिचे नावलौकीक होईल. करिता आर्थीक दृष्टया कमकुवत असलेल्या मागास वर्गातील कु. दिपा प्रकाश गवळे या खेळाडूस सहानुभुतीपुर्वक विचार करुन तिला प्रवास खर्चासाठी लागणारे रु. ५०,०००/- ची आर्थीक मदत देण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.१०** **प्रस्ताव**

राज्यातील जनतेचे प्रतिनिधीत्व करणा-या आमदार यांचे दोनदा वेतनवाढ झाली आहे. तसेच स्थानिक जनतेचे प्रतिनिधीत्व करणा-या नगरसेवकांचे मानधन अत्यल्प आहे. त्यामुळे नगरसेवकांचे मानधनात वाढ करणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- स. शेर अली **अनुमोदक** :- सिंधुताई काकडे, अ. सत्तार अ. गफुर, स.सरजीतसिंघ गिल, गुरुखुदे सुंदरलाल

**स. शेर अली** आम्ही पहात आहो की, आमदाराचे मानधनात मोठी वाढ केली आहे सचिवांचे त्यांच्या पीए च्या मानधनात वाढ केली आहे मनपात यापुर्वी सभेत एक प्रस्ताव ठेवण्यात झाला होता नगरसेवकाच्या मानधनात वाढ करण्यात यावी. त्या प्रस्तावाला कचरा कुंडी दाखवली आहे. आज आपल्यासमोर हा प्रस्ताव आला आहे सर्व नगरसेवकाच्या मानधनात वाढ करण्यात यावी. पदाधिकारी यांच्या समवेत विचार विनीमय करुन प्रस्ताव पास करण्यात यावा.

**महापौर** हा सर्व मनपाचा विषय आहे आपण हा विषय पास करुन मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊ. आमच्याही मानधनात वाढ करावी अशी विनंती करु.

**बाळासाहेब देशमुख** आपल्या मनपाचे बजेट किती आहे. त्याच्या अनुषंगाने आपल्याला वाढ करता येते.

**सरजितसिंघ गिल** शेरअली व सर्व पक्षीय नगरसेवकाने मानधन वाढीच्या प्रस्ताव ठेवलेला आहे. या दोन दिवसापुर्वी नाशिक मनपाने त्यांच्या नगरसेवकांना 50 हजाराचे मानधन ठेवले आहे. नाशिक मनपाने हा ठराव पास केलेला आहे. आमदाराचे मानधन दोन लाख होतात व सेवानिवृती मानधन 50 ते 60 हजार झाले आहे त्याचे आम्ही समर्थन करतो. काम करणा-याचे मानधन वाढले पाहीजे बरेच पेपरवाले लिहतात. एवढे मानधन कशाला . केवळ प्रजावाणीनेच मानधनाबददल समर्थन केले आहे. त्याचे मी अभिनंदन करतो. आमदाराची बाजू राखली मानधन देणे योग्य आहे. त्याच्यात काही गैर नाही. तसेच नगरसेवकांना देखील मानधन वाढवून मिळावे. आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करावी व सीएमसाहेबांना निवेदन दयावे व त्यामध्ये 25 हजार मानधन नगरसेवकाचे करण्यात यावे.

**महापौर** स. सदस्यांच्या प्रस्तावानुसार मनपाकेतील नगरसेवकांना मासिक मानधन रु. २५,०००/- करण्यासाठी शासनास शिफारस करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ७०** **ठराव**

राज्यातील जनतेचे प्रतिनिधीत्व करणा-या आमदार यांचे दोनदा वेतनवाढ झाली आहे. तसेच स्थानिक जनतेचे प्रतिनिधीत्व करणा-या नगरसेवकांचे मानधन अत्यल्प आहे. त्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील नगरसेवकांचे मानधन रुपये ७,५००/- ऐवजी रुपये २५,०००/- करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.११** **प्रस्ताव**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सविस्तर माहिती देणे स. सदस्यांना शंका असल्यास त्या शंकेचे निरसन करणे

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- उमेश पवळे

**ठराव क्रं. ७१** **ठराव**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सविस्तर माहिती लेखी स्वरुपात संबंधीत विभागाने नावाशमनपाकेतील सर्व स. सदस्यांना देण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.१२** **प्रस्ताव**

मनपा हद्यीतील मालमत्ताधारकांना बांधकाम परवानगी बाबतच्या संचिका प्रलंबीत असल्यामुळे उत्पन्नावर परिणाम होत असल्याने त्यावर चर्चा करुन निर्णय घेण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- पवळे उमेश

<u>सहाय्यक संचालक यांची प्रशासकिय टिप्पणी</u>

नगरनचना विभागास प्राप्त प्रकरणात मंजुर विकास योजना व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार छाननी करण्यात येते.

मंजुर सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रं. १२ अन्वये पुढील कागदपत्रे विकास परवानगी प्रस्तावासमावेत सादर करणे आवश्यक आहे.

a) Attested copy of original registered sale / leasse deed / power of attorney / enabling ownership document wherever applicable accompanied by an site plan giving the physical description of the plot / property.
b) Property register card, 7/12 extract, of a date not earlier than Two Months of the date of submission of the development proposal and certified copy of measurement plan.
c) Housing Society / Authority allotment letter along with its NOC.
d) Statement of area of the holding by triangulation method from the qualified licensed technical personnel or Architect with an affidavit from the owner in regard to the area in the form prescribed by the Commissioner.
e) Any other document prescribed the Commissioner.
f) In the case of land leased by the Government or local authorities, clearance of Government or such authorities regarding observance of the lease conditions shall beobtained and attached to the application for development permission in respect of such land.

शासन निर्णय क्रं. टीपीएस-३२१५/प्र.क्र.१९३/नवि-१३ दि. ०७.०७.२०१६ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये शासनाचे निदेश, नुसार खालील कागदप९ सादर करणे आवश्यक आहे.

a) 7/12 Extract / Property Card / Sale Deed / Development Agreement
b) Title search report.
c) Measurement Plan by TILR
d) Building Plan / Lay out plan
e) Affidavit by Architect
f) Affidavit of Structural Designer, Engineer, Supervisor.
g) Requirement NOCs of respective departments whichever required.
h) Document/s as specified and notified by the Municipal Commissioner / Chief Officer.

उपरोक्त कागदपत्रे सादर केली असल्यास तसेच प्रस्तावित बांधकाम नकाशे मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार असले बाबत छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव मंजुर केले आहेत. सदर मंजुर प्रस्तावातून विकास शुल्क जमा होतो.

परिपूर्ण नसणा-या प्रकरणात त्रुटीची पुर्तता करणे बाबत कळविणेत आले आहे. त्यामुळे सद्यसथीतीत नगररचना विभागाकडे विकास परवानगी प्रकरणे प्रलंबित नाहीत. (बहुतांश प्रकरणात उपरोक्त कागदपत्रापैकी Measurement Plan by TILR ची प्रत सादर न केल्यामुळे प्रस्तावात त्रुटी कळविली आहे अर्जदाराने त्रुटीची पुर्तता केल्यास नियमानुसार विकास परवानगी देण्यात येइल सद्य स्थितीत विभागात एकूण २९ प्रस्ताव कार्यवाहीत आहेत जे विहीत मुदीतील आहेत. या विभागास प्राप्त प्रकरणात लवकरात लवकर कार्यवाही करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

**महापौर** नगरसचिव विभागाने मालमत्ता धारकांना बांधकाम परवानगी देतांना टोच नकाशाची शिथीलता देवुन उर्वरीत त्रुटयांची पुर्तता करुन बांधकाम परवानग्या तात्काळ निकाली काढून बांधकाम परवानग्या देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. ७२** **ठराव**

मनपा हद्यीतील मालमत्ताधारकांना बांधकाम परवानगी प्राप्त होत नसल्याने महापालिकेच्या उत्पन्नावर वितपरीत परिणात होत आहे त्यामुळे नगररचना विभागाने मनपाकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आपल्या विभागातील प्रलंबीत व प्राप्त होणा-या बांधकाम परवानग्या मधील येणारे त्रुटीत टोच नकाशाची शिथीलता देवुन उर्वरीत त्रुटीची पुर्तता तात्काळ निकाली काढून पुर्वीप्रमाणेच बांधकाम परवानगी लवकरात लवकर देण्यास हि नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी

**सभागृह नेता** प्रधानमंत्री आवास योजनेत मोठया प्रमाणात लोक अर्ज भरत आहेत. अर्ज भरत असतांना त्यांना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सर्व प्रश्नाची काही लोकांना माहिती आहे. काहीना नाही. काहीना शंका आहे. काही लोक बॉंडवर फॉर्म भरत आहेत. आम्हाला स्टॅंडीग हॉलमध्ये माहिती दिली की, बॉंडवर कुठलेली घर दिले जाणार नाही जे लोक फॉर्म् भरत आहेत ते 10 ते 20 टक्के लाभार्थी आहेत. त्याची विवाहामुळे फॉर्म भरत आहेत व विचारणा करीत आहेत की आमच्या गच्चीवर घर बांधुन देणार काय . आम्हाला जागा नाही. पुर्ण सदस्यांना याबददल सविस्तर माहिती देण्यात यावी. नागरीकांकडून जे प्रश्न निर्माण होतात त्या प्रश्नाचे निरसन या ठिकाणी करुन घेण्यात यावे.

**सौ.ललिता बोकारे** विषय क्र 9 हा का वगळण्यात आला मनपाच्या माध्यमातून आपण क्रीडा महोत्सव घेतला. राष्ट्रीय राजय पातळीवर जे खेळाडू आहेत त्यांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे माझ्या वार्डात दिपा गवळे हीला आतापर्यंत 22 सवर्णपदके मिळालेली आहेत.ती नॅशनल खेळाडू आहे. मार्शल आर्टचा खेळामध्ये ती व्हीएतनामध्ये जात आहे. क्रिडा महोत्वसात तीची निवड झाली आहे ती गरीब आहे. हा विषय पास झाला पाहीजे.

**विनय गिरडे** या विदयार्थीनाला मदत करता येत नसेल तर असा ठराव करुन घ्या की, मदत कोणालाही करता येत नाही. कारण काय होते की, एखादयाला आपण मदत करतो व दुस-याला नाकारतो. मग त्या विदयार्थ्याला वाटते मला का मदत देण्यात आली नाही म्हणुन मग सा ठराव करा की, अशी मदत कोणाला देता येणार नाही.त्यामुळे कोणालाही वाईट वाटू नये.

**महापौर** आपल्या नांदेड शहराचे खेळाडूच्या माध्यमातुन नाव होत असेल तर मदत केली पाहीजे. हा विषय पास करण्यात येते.

**गोंधळ चालू होता.**

**सभागृह नेता** मागच्या 3 – 4 महीण्यापासुन बांधकाम परवानगीची प्रकरणे थांबली आहे. आपले जे नविन एडीटीपी आले आहेत त्यांनी शासन निर्णय दाखविला आहे. नवीन जीआर आलेला आहे. त्यानुसार कामे थांबलेली आहेत. मनपात कधी रुजू झालेत. 7 तारखेला जीआर निघाला असे सांगता. त्यापुर्वी आपण किती बांधकाम परवानगी प्रकरणे मंजूर केलेले आहेत त्यांना मनपात काम करण्याची इच्छा नाही मा. जिल्हाधिका-याच्या दबावाखाली येवून ते मनपात बसतात. मनपाचे काम कसे बिघडवता येईल हे पाहतात. मनपाच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत हे बांधकाम परवानगी आहे. या विभागात असा अधिकारी नको. त्यांना शासनाकडे परत पाठवा खोडवेकर संरानी त्यांना जॉईन करुन घेतले नाही.

**सरजितसिंघ गिल** जे मनपाचे नुकसान झाले आहे त्याची भरपाई त्यांच्याकडून करुन घेण्यात याव. त्यांना परत पाठवण्यात यावे. करोडोचे नुकसान त्यांनी केले आहे. खोडवेकर सरांचे आम्ही अभिनंदन करतो त्यांच्या काळात दोन-दोन करोड रुपये येत होते.

आतापर्यत ज्या बांधकाम परवानगी देण्यात आल्या, त्यात टोच नकाशाची अट कोणीही घातली नाही यामुळे बांधकाम परवानगीची प्रकरणे रखडलेली आहेत. त्यासाठी त्या अधिका-याला परत पाठवण्यात यावे.

**सरजितसिंघ गिल** आता एक महत्वाचा विषय आहे नाशिक मनपात स्वेच्छा निधी 60 रुपये ठेवण्यात आला आहे पण तेथील अधिक-यांने त्यांच्या परिस्थितीनुसार बरोबर नाही म्हणुन 50 लाख रुपये ठेवण्यात आले आहे. आपण ही 50 लाख रुपये ठेवावे व त्याचे वेगळे अकाऊंट ठेवण्यात यावे ते नगररचना विभागाचे निधी त्यांच्यात टाकावा अशी घोषणा करावी व त्याचे आयुक्तांनी अनुमोदन करावे.

**महापौर** आम्ही जे बजेटमध्ये सुचविलेले आहे त्याचप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. संबधीत अधिका-याला या मनपात काम करण्याची इच्छा नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. टोच नकाशा हा आग्रह होवू शकत नाही. मनपाचे आर्थिक नुकसान करु नये.

**आयुक्त** आज सकाळपासुन आठ तास झाले ही बैठक चालविली त्याबददल मी मा.महापौर, उपमहापौर, सर्व पदाधिकारी व सर्व सदस्य/सदस्यांचे यांचे अभिनंदन करतो. समिती सदस्यांच्या 8 तास मिटींगा फार कमी प्रमाणात चालतात.या निमीत्तोने सर्वच विषयावर चर्चा झालेली आहे. वार्ड विकास निधीमध्ये आर्थिक परिस्थितीनुसार प्रत्येक वार्डात निश्चीतपणे काम करण्यात येईल.

**<u>विशेष बाब म्हणुन आयत्यावेळी घेण्यात आलेले विषय</u>**

**महापौर** जिल्हाप्रशासन अधिकारी नांदेड, जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र क्रं. २०१५/नपाप्र/का-१/टे-४/प्र.क्र. दिनांक ११.०८.२०१६ च्या पत्रानुसार महाराष्ट्र शासन निर्णय, नगरविकास विभाग क्रं. डीव्हीवाय १९१५/प्रक्र ५६/नवि-४ दिनांक ०२ जुलै २०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने व मा. आयक्त यांचे पत्र क्रं, नावाशमनपा/साबांवि/७२१३/१६ दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ अन्वये कळविल्यानुसार मनपा हद्यीत दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत दलीत वस्तीत नागरी सुविधांची विकासाचे कामे करण्यासाठी निधी मंजुर केलेला असुन या निधीतुन आप आपल्या प्रभागात विविध विकासाचे कामे करण्यासाठी स. सदस्यांनी सुचविलेल्या कामांना मान्यता देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ७३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध प्रभागात दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील कामे करण्यासाठी मान्यता देण्याकरीता मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे शिफारस करण्यास ही नावाशमनपाकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

1) प्रभाग क्रं.1 मधील सप्तगिरी कॉलनी ते कल्याणनगर जोडणा-या रस्त्याचे डांबरीकरण करणे. (रु.20 लक्ष)
2) प्रभाग क्रं.1 मधील विकास नगर भागात हटकर यांचे घर ते सोनसळे यांचे घर व जवळेकर यांचे घर ते जेतवण बुध्द विहार येथे आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे. (रु.15 लक्ष)
3) प्रभाग क्रं.1 मधील सप्तगिरी कॉलनी भागात साळवे यांचे घर ते यलमवार यांचे घरापर्यंत, कांबळे यांचे घर ते मिश्रा यांचे घरापर्यंत, आठवले यांचे घर ते पिठाची गीरणी पर्यंत, आठवले यांचे घर ते बुध्दविहारापर्यंत, सुर्यवंशी यांचे घर ते हलवले यांचे घरापर्यंत, टोम्पे यांचे घर ते पवार यांचे घरापर्यंत, हटकर यांचे घर ते देवके यांचे घरापर्यंत, कदम यांचे घर ते अजय किराणा पर्यंत आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे. (रु.20 लक्ष)

4) प्रभाग क्रं.2 मधील नालंदानगर येथे श्री कांबळे यांचे घर ते श्री आमपूरे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली बांधकाम करणे. (रु.5 लक्ष)
5) राहूलनगर भागात कदम यांचे घर ते सुंदरनगर मुख्य रस्त्यापर्यंत सिसि रोड बांधणे. (रु.10 लक्ष)
6) पौर्णिमानगर भागात ऊर्वरीत सी.सी. रोड करणे व स्ट्रीट लाईट बसविणे. (रु.15 लक्ष)
7) राहूलनगर भागात संरक्षण भिंत बांधणे व विद्युत व्यवस्था करणे. (रु.10 लक्ष)
8) पौर्णिमानगर हनुमान मंदिर, डोंगरे ते सोनवणे, श्रीधर कांबळे ते रुक्मीणी कुंज, जावळेकर ते वाटोरे, भिसे ते कदम आरसीसी नाली व सी.सी. रोड करणे (रु.20 लक्ष)
9) पांडुरंगनगर येथे जेएनएनयुआरएम अंतर्गत झालेल्या बांधकामावर 2 पूल बाधणे (रु.08 लक्ष)
10) प्रभाग क्रं.3 मधील कर्मवीर नगर येथे अंतर्गत आरसीसी रस्ते, नाली व ड्रेनेज तयार करणे.(रु. 15 लक्ष)
11) मुख्य रस्ता सांगवी पासून अण्णाभाऊ चौक ते माधव वाघमारे यांचे घरापर्यंत सिसिरोड तयार करणे. (रु.20 लक्ष)
12) प्रभाग क्रं. ०३ मध्ये पांडुरंग नगर नाल्यालगत रस्ता तयार करणे (रु.5 लक्ष)
13) म्हाळजा येथे अण्णाभाऊ साठे समाज मंदिर बांधणे (रु.6 लक्ष)
14) प्रभाग क्रं. ४ मध्ये गांधीनगर भागात मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. (25 लक्ष)
15) प्रभाग क्रं. १३ मधील सखोजीनगर व मित्रनगर मुख्य रस्त्यावर नाली करुन साईड ब्रम करुन विद्युत व्यवस्था करणे. (25 लक्ष)
16) पौर्णिमानगर येथील रस्ता बांधकाम करणे. (रु.5 लक्ष)
17) बाबानगर ते हर्षनगर आरसीसी रोड बांधकाम करणे.(रु.5 लक्ष)
18) हर्षनगरमध्ये संरक्षण भिंत बांधणे (रु.15 लक्ष)
19) हर्षनगर येथील बुध्दविहाराच्या मोकळया जागेमध्ये लॅण्डस्केपींग करणे. (15 लक्ष)
20) सम्राट अशोकनगर ते जंगमवाडी रोड मार्गे वर्कशॉपपर्यंत सीसी रस्ता करणे. (रु.25 लक्ष)
21) प्रभाग क्रं.36 मध्ये भिमवाडी भागात मलनिस्सारण वाहिनी टाकून रोड रिस्टोअर करणे. (रु.25 लक्ष)
22) प्रभाग क्रं.7 मधील सन्मान कॉलनी पाटी पासून प्रा.वाघमारे यांचे घर ते डॉ.सोनकांबळे यांच्या घरापर्यंत डब्ल्युबीएम व सी.सी.रोड करणे. (रु.18 लक्ष)
23) तरोडा मुळ गाव दलित वस्तीमध्ये अंतर्गत रस्ते, नाल्या व स्मशानभुमीसाठी रस्ता व नाली करणे (रु.08 लक्ष )
24) प्रभाग क्रं.7 मधील सिध्दांत नगर भागात श्री कवडे यांचे घरापासून ते श्री मगरे यांचे घरापर्यंत व श्री कवडे यांचे घरा पासून ते श्री सोनकांबळे यांचे घरापर्यंत नाली व रस्ता तयार करणे तसेच भालेराव यांचे घरापासून ते श्री कांबळे यांचे घरापर्यंत व सन्मान कॉलनी भागातील श्री वाघमारे यांचे घरापासून ते श्री सोनकांबळे यांचे घरापर्यंत आरसीसी नालीचे बांधकाम करणे. (रु. 25 लक्ष )
25) तरोडा खु. मधील सुमेधनगर येथील बुध्दविहारासमोर मोकळया जागेत कंपाऊंड वॉल बांधून सुशोभिकरण करणे (रु. 15 लक्ष)
26) प्रभाग क्रं.7 मधील बोधीसत्वनगर भागात समाजमंदीराचे सभागृह बांधणे व सुरक्षा भिंत बांधणे. (रु.9 लक्ष)
27) समता नगर भागात भंडारी नगर मुख्य रस्ता ते कांबळे यांचे घरापर्यंत आरसीसी रस्ता बांधकाम करणे (रु.15 लक्ष)
28) प्रभात नगर भागात विविध ठिकाणी आरसीसी नाली बांधकाम करणे (रु.10 लक्ष)
29) प्रभातनगर येथील बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचे नुतनीकरण करणे, कुशीनगर येथे आरसीसी नाली करणे, अशोकनगर येथील ड्रेनेज लाईन व रस्ता करणे. लक्ष्मण सरपाते यांच्या घरापासून ते सुनिल पंडीत यांच्या घरापर्यंत आरसीसी नालीचे बांधकाम करणे. ( रु. 25 लक्ष)
30) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये श्री त्र्यंबकराव भाले, गणपत गाडेकर, भगवान हटकर व कमलबाई गायकवाड यांचे घरासमोर मोकळया जागेत सीसी प्लॅटफॉर्म करणे. (रु.20 लक्ष)
31) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये यशवंत कांबळे, पांडूरंग कागडे, सोपान सोनसळे व गंगाधर हणवंते यांच्या घराजवळ मोकळया जागेत सीसी प्लॅटफार्म करणे. (रु.15 लक्ष)
32) प्रभाग क्रं.16 मधील जनता कॉलनी बुध्दविहाराचे ऊर्वरीत काम करणे. (रु.25 लक्ष)
33) लेबर कॉलनी येथील आबेडकर स्मारक नुतनीकरण करणे (रु.10 लक्ष)
34) लेबर कॉलनी मध्ये अड.टोम्पे ते पप्पु आठवले यांच्या घरापर्यंत सीसी रोड करणे (5 लक्ष)
35) लेबर कॉलनी बुध्द विहाराची कम्पाउण्ड वॉल चे विस्तारीकरणे करणे.(5 लक्ष)
36) श्री खेडकर यांचे घरापासून ते वडेपल्ली यांचे घरापर्यंत सिसि रोड बांधकाम करणे (रु.5 लक्ष)
37) जिल्हाधिकारी निवास ते नवघडे यांच्या घरापर्यंत नविन ड्रेनेज लाईन व सीसी रोड करणे(रु.25 लक्ष)
38) मगनपुरा येथील झोपडपट्टी भागात मेनरोड बांधकाम करणे (रु. 10 लक्ष)
39) मगनपुरा भागात अंतर्गत रस्ते बांधणे (रु.15 लक्ष)
40) मगनपुरा भागात नालीचे काम करणे (रु.15 लक्ष)
41) प्रभाग क्र.12 मधील मुख्य रस्ता व अंतर्गत 10 रस्त्यांचे बांधकाम करणे. भाग - 1 (रु.25 लक्ष)
42) प्रभाग क्र.12 मधील मुख्य रस्ता व अंतर्गत 10 रस्त्यांचे बांधकाम करणे. भाग - 2 (रु.25 लक्ष)
43) बालाजीनगर भागात ड्रनेज, सीसी नाली व रस्ता बांधकाम करणे. (रु.25 लक्ष)
44) प्रभाग क्रं.13 मधील अंबिका किराणा ते गोविंदनगर नाल्यापर्यंत सीसी रस्ता करणे, सुधाकर बावळे यांचे घर शिवनगर ते गोविंदनगर क्रॉस रोड पर्यंत सीसी रस्ता करणे, शिवणे महाराज किराणा ते रोड नं.२४ पर्यंत सीसी रस्ता करणे, नरवाडे यांचे घर ते रोड नं.२४ पर्यंत सीसी रस्ता करणे, सुशिल भगत यांचे घरापासून ते आल्कानंद निवास पर्यंत सीसी रोड करणे.(रु.25 लक्ष)

45) प्रभाग क्रं.13 मधील सखोजीनगर भागात ड्रेनेज लाईनमुळे नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करणे व विद्युत व्यवस्था करण व साठेवाडी भागात ड्रेनेज लाईन व रस्ते करणे. भाग-1 (रु.25 लक्ष)
46) इश्वरनगर व हमालपूरा भागात रस्ते, अंतर्गत रस्ते व नाल्या व ईतर विकासाची कामे करणे.- (रु.25 लक्ष)
47) हिंगोली गेट अंडरब्रिज ते एमएसईबी ऑफीसपर्यंत नाली बांधकाम करणे (रु.15 लक्ष)
48) रमामाता आंबेडकर नगर ते गोकुळनगर चौक ते रोड क्रं.26 पर्यंतचा रस्ता व नाली, तसेच मुलभूत सुविधा सहित. (रु.25 लक्ष)
49) रमामाता आंबेडकर नगर लगत असलेल्या हुतात्मा स्मारक ते रमामाता आंबेडकर नगर रोड क्रं.26 पर्यंत व इंदीरा गांधी मैदान विकसीत करणे. (रु.25 लक्ष)
50) नागसेननगर पाटीपासून ते सातोरे यांच्या घरापर्यंत आरसीसी नाली करणे. (रु.25 लक्ष)
51) आंबेडकर नगर पाटीपासून ते चंपत रोकडे यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे. (रु.5 लक्ष)
52) प्रभाग क्रं.16 मधील श्री कसबे गुरुजी ते श्रीकांत यांच्या घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे. (रु.5 लक्ष)
53) प्रभाग क्रं.16 मधील श्री वावडे गुत्तेदार यांचे घरापासून ते सुनिल किराणापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे. (रु.5 लक्ष)
54) प्रभाग क्रं.16 मधील श्री गायकवाड यांचे घर ते श्री येडके यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधणे(रु.5 लक्ष)
55) आंबेडकरनगर येथील धोबीगल्लीत सिसिरोड बांधणे (रु.5 लक्ष)
56) आंबेडकर नगर भागात मुलभूत सुविधा पुरविणे (रु.25लक्ष)
57) राजनगर भागात मुख्य रस्ता ते कापसीकर यांचे घरापर्यंत सिसि रोड तयार करणे (रु.10 लक्ष)
58) राजनगर भागात व्ही.एस.पांडव यांचे घर ते दयानंद कोंडूसिंग जाधव यांचे घरापर्यंत सिसि रोड तयार करणे (रु.15 लक्ष)
59) राजनगर, नागसेननगर, चंद्रगुप्तनगर, क्रांतीनगर व रमाबाई सोसायटी भागातील विद्युत पोलवर नविन मर्क्युरी लाईट सेट बसविणे. (रु.15 लक्ष)
60) प्रभाग क्रं.18 मधील गंगाराम कसबे ते मालोजी यांच्या घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे (रु.10 लक्ष)
61) प्रभाग क्रं.18 मधील भरत तुळसे ते प्रकाश नरवाडे यांचे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे (रु. 10 लक्ष)
62) प्रभाग क्रं.18 मधील भाउराव भदरगे ते कोंडीबा गोटमुखे यांचे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे (रु. 10 लक्ष)
63) प्रभाग क्रं.18 मधील भाउराव भदरगे ते कोंडीबा गोटमुखे यांचे घरापर्यंत सीसी रोड करणे (रु.5 लक्ष)
64) प्रभाग क्रं.18 मधील श्री व्यवहारे यांचे घर ते श्री जब्बार यांचे घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करणे (रु.5 लक्ष)
65) जयभीमनगर कमान ते जयभीमनगर नाल्यापर्यंत सी.सी. रोड करणे. (रु.10 लक्ष)
66) त्रिरत्न बुध्दविहाराचे ऊर्वरीत काम करणे. (25 लक्ष)
67) पंचशील नगर भागामध्ये शोभा हटकर यांचे घरापासून ते बबन बंड यांचे घरापर्यंत सिसिरोड व नाली बांधकाम करणे(रु.15 लक्ष)
68) पंचशिलनगर भागात वायफळ यांचे घरापासून दिलीप भोळे यांचे घरापर्यंत सिसि नाली बांधकाम करणे. (रु.10 लक्ष)
69) पंचशीलनगर भागात सुविधा जसे, नाल्या, सिमेंड रोड चे काम करणे. (रु.15 लक्ष)
70) पंचशिलनगर लोकांना चुनाल नाल्यावर कालापाईपच्या बाजूने आरसीसी कल्वर्ट व अप्रोच रोड करणे. (रु.10 लक्ष)
71) प्रभाग क्रं.20 मधील त्रिपीठक बुध्दविहार, भैयासाहेब आंबेडकर नगर येथे बुध्द विहारास कंपाऊंड वॉल बांधणे. (रु.25 लक्ष)
72) प्रभाग क्रं.20 मधील गोवर्धनघाट टेकडी नदीच्या कडेने सुरक्षा भिंत बांधणे. भाग -1 (रु.25 लक्ष)
73) प्रभाग क्रं.20 मधील गोवर्धनघाट टेकडी नदीच्या कडेने सुरक्षा भिंत बांधणे. भाग -2 (रु.25 लक्ष)
74) प्रभाग क्रं.21 मधील लहुजीनगर पोलिस क्वॉर्टर समोरील ड्रेनेजलाईन व रस्ता करणे (रु.15 लक्ष)
75) मिलगेट जवळील धम्मनगर भागात रोड व नाली करणे. (रु.10 लक्ष)
76) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये रुख्माजी काळे, भिमराव कांबळे, माधवराव लोखंडे व हटकर यांचे घराजवळ मोकळया सीसी प्लॅटफॉर्म करणे.(रु.20 लक्ष)
77) प्रभाग क्रं.20 मधील गोवर्धनघाट टेकडी नदीच्या कडेने सुरक्षा भिंत बांधणे. भाग -3 (रु.25 लक्ष)
78) प्रभाग क्र. 23 मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व रस्ते करणे. (रु.25 लक्ष)
79) शक्तीनगर भागात सीसी रोड व आरसीसी नालीचे बांधकाम करणे. (रु.15 लक्ष)
80) शक्तीनगर मुख्य रोड पासून ते आठवले व गजभारे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली करणे.(रु.10 लक्ष)
81) प्रभाग क्रं.24 मध्ये वाल्मिकीनगर भागात सभागृहाचे विस्तारीकरण करणे व अंतर्गत रस्ते व नालीचे बांधकाम करणे – भाग 1 (रु.25 लक्ष)
82) प्रभाग क्रं.24 मध्ये वाल्मिकीनगर भागात सभागृहाचे विस्तारीकरण करणे व अंतर्गत रस्ते व नालीचे बांधकाम करणे – भाग 2 (रु.25 लक्ष)
83) भावेश्वरनगर भागात ड्रेनेज, रस्ते व नाली बांधकाम करणो – भाग 1 (रु.25 लक्ष)
84) भावेश्वरनगर भागात ड्रेनेज, रस्ते व नाली बांधकाम करणो – भाग 2 (रु.25 लक्ष)
85) प्रभाग क्रं.24 मध्ये वाल्मिकीनगर भागात सभागृहाचे विस्तारीकरण करणे व अंतर्गत रस्ते व नालीचे बांधकाम करणे – भाग 3 (रु.25 लक्ष)
86) प्रभाग क्रं.13 मधील विठ्ठलनगर भागात ड्रेनेज लाईन, टाकून रस्ते करणे, सभागृह, कंम्पाऊडवॉल व विधुत व्यवस्था करणे (रु.25 लक्ष)
87) प्रभाग क्रं.13 मधील सखोजीनगर भागात ड्रेनेज लाईनमुळे नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करणे व विद्युत व्यवस्था करण व साठेवाडी भागात ड्रेनेज लाईन व रस्ते करणे. भाग-2 (रु.25 लक्ष)

88) प्रभाग क्रं. ०२ मध्ये नालंदानगर – बाजीरावनगर येथे सीसी रस्ता करणे. (रु.25 लक्ष)

89) प्रभाग क्रं.30 मधील नावघाट ब्रिज, सिध्दार्थनगर, हातजोडी ते मरघाट पर्यंत रिटेनींग वॉलसह रस्ता व नाली करणे.भाग–1 (रु.25 लक्ष)

90) प्रभाग क्रं. २९ मध्ये महंतवाडी येथे रंजना एडके यांचे घर ते गुरुद्वारा पर्यंत आरसीसी नाली करणे, पंचशिल नगरमध्ये समाज मंदिर बांधणे, लिंबोणी नगरमध्ये समाज मंदिराचे कंपाऊंड वॉल बांधणे, पंचशिलनगर मध्ये एमेकर यांचे घर ते श्री तेलंगे यांचे घरापर्यंत आरसीसी रस्ता करणे, मारोती मंदीर ते माने यांचे घरापर्यंत ड्रनेज लाईन टाकणे. (रु. 25 लक्ष)

91) प्रभाग क्रं. २९ मध्ये प्रितीनगर भागात सीसी रोड करणे. (रु.25 लक्ष)

92) प्रभाग क्रं.30 मधील नावघाट ब्रिज, सिध्दार्थनगर, हातजोडी ते मरघाट पर्यंत रिटेनींग वॉलसह रस्ता व नाली करणे.भाग–2 (रु.25 लक्ष)

93) प्रभाग क्रं.30 मधील नावघाट ब्रिज, सिध्दार्थनगर, हातजोडी ते मरघाट पर्यंत रिटेनींग वॉलसह रस्ता व नाली करणे.भाग–3 (रु.25 लक्ष)

94) सिध्दार्थ नगरमध्ये नविन पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन टाकणे. (रु.25 लक्ष)

95) प्रभाग क्रं.30 मधील नावघाट ब्रिज, सिध्दार्थनगर, हातजोडी ते मरघाट पर्यंत रिटेनींग वॉलसह रस्ता व नाली करणे.भाग–4 (रु.25 लक्ष)

96) प्रभाग क्रं.37 मधील नविन कौठा येथील मारोती घोंगडे यांचे घर ते नितीन जोंधळे यांचे घरापर्यंत सिसि रोड व नाली बांधकाम करणे (रु. 10 लक्ष)

97) प्रभाग क्रं.37 मधील जुना कौठा येथील पाण्याच्या टाकी पासुन बनाजी बारसे यांच्या घरासमोरुन ते बौध्दविहाराकडे जाणारा सी.सी. रोड करणे. (रु.15 लक्ष)

98) प्रभाग क्रं.32 मधील श्री साखरे यांच्या घरापासून ते मन्यार गल्ली रोडपर्यंत सीसी रोड व नाली करणे. (10 लक्ष)

99) नावघाट बुध्दविहार ते गौतमनगर बुध्दविहार पर्यंत सीसी रोड करणे. (10 लक्ष)

100) गौतम नगर ते रंग्या यांचे किराणा दुकानापर्यंत सी.सी. रोड बांधणे. (रु.25 लक्ष)

101) बाजीराव नगर येथील मेनरोड नं.44 ते श्री खाडे यांचे घरापर्यंत सी.सी. रोड करणे. (रु.25 लक्ष)

102) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये शशीकांत हाटकर, भगवान जोगदंड व कमलबाई खंदारे यांचे घराजवळ मोकळया जागेत सीसी प्लॅटफार्म करणे.(रु.20 लक्ष)

103) प्रभाग क्रं.20 मधील गोवर्धनघाट टेकडी नदीच्या कडेने सुरक्षा भिंत बांधणे. भाग -4 (रु.25 लक्ष)

104) प्रभाग क्रं.36 मध्ये लातूर रोड ते नारायण पोवळे यांचे घर मार्गे मारोजी वंजारे यांचे घरापर्यंत रस्त्याची व चौक सी.सी. रस्ता रुंदीकरण करणे. (10 लक्ष)

105) प्रभाग क्रं.36 मधील हारीचंद्र मोळके यांचे घरापासून शिवाजी भुरे, नामदेव सुर्यवंशी मार्गे वसरणी मेनरोडपर्यंत आरसीसी नाली व सीसी रस्ता करणे (रु.10 लक्ष)

106) प्रभाग क्रं.36 मधील भिमवाडी बुध्दविहार ते आनंदा पवार यांचे घरापर्यंत सीसी नाली व रोड करणे. (रु.10 लक्ष)

107) प्रभाग क्रं.36 मधील भास्करेनगर बुध्द मुर्ती परिसरास कंपाऊंड वॉल व सिसि प्लॅटफॉर्म तयार करणे. (रु.10 लक्ष)

108) प्रभाग क्रं. ३६ मध्ये आंबेडकरवादी मिशन ते बबन गजभारे यांचे घरापर्यंत सीसी रोड व नाली करणे. (रु.10 लक्ष)

109) प्रभाग क्रं.37 मधील नविन कौठा येथील बौध्द विहारापासून ते जबीभाई यांचे घरापर्यंत सिसि रोड बाधकाम करणे.(रु.10 लक्ष)

110) प्रभाग क्रं.37 मधील विरभद्रनगर येथे श्री विजय गायकवाड यांच्या घरापासून ते भिमराव धाकवाडे यांच्या घरापर्यंत सीसी रोड करणे. (रु.15 लक्ष)

111) प्रभाग क्रं.37 मधील प्रभाग क्रं.37 मध्ये श्री भिगानीया यांचे घरापासून ते राजू डुलगच यांच्या घरापर्यंत सीसी रोड करणे.(रु.10 लक्ष)

112) प्रभाग क्रं.37 मधील नविन कौठा नालंदा बुध्दविहार ते कुशीनगर पर्यंत सीसी रोड करणे. (रु.15 लक्ष)

113) प्रभाग क्रं.38 मध्ये नागलोक बुध्दविहारास कम्पाउण्ड वॉल करणे. (रु.25 लक्ष)

114) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये दशरथ कंधारे, शेख बशीर व कांबळे यांच्या घराजवळ मोकळया जागेत सीसी प्लॅटफार्म करणे.(रु.20 लक्ष)

115) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये शेख नजीर, रमेश लांडगे व शेषेराव नवघरे यांच्या घराजवळ मोकळया जागेत सीसी प्लॅटफार्म करणे.(रु.15 लक्ष)

116) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये प्रकाश ससाणे, बळीराम कांबळे व शेख रोशन यांच्या घराजवळ मोकळया जागेत सीसी प्लॅटफार्म करणे. (रु.20 लक्ष)

117) प्रभाग क्रं.39 मधील सिडको एन.डी.41 भागामध्ये अशोक काळे, नितीन कदम, रवि सावंत व रमाकांत चौदंते यांच्या घराजवळ मोकळया जागेत सीसी प्लॅटफार्म करणे. (रु.20 लक्ष)

118) शाहूनगर येथील एकनाथ लोहकरे यांच्या घरापासून ते सुरेश गजभारे यांच्या घरापासून ते गणपत भदरगे यांच्या घरापर्यंत सीसी रोड व नाली बांधणे (रु.12 लक्ष)

119) शाहूनगर येथील दिपक नंदनवरे यांच्या घरापासून ते काटकर बाई यांच्या घरासमोरुन गवळेबाई यांच्या गल्लीपर्यंत सीसी रोड करणे. (रु.6 लक्ष)

120) प्रभाग क्रं.40 मधील रामापूरे यांच्या गल्लीतील लाकडी अडयापासून ते शंकर गोगदरे यांच्या घरापर्यंत सीसी रोड करणे. (रु.7 लक्ष)

121) वाघाळा बौध्द विहाराच्या पाठीमागे अशोक कंधारे यांचे घर ते राजू गायकवाड यांच्या घरापर्यंत सीसी रोड करणे. (रु.7 लक्ष)

122) प्रभाग क्रं.40 मधील मीरानगर मध्ये आनंदा हाटकर यांचे घर ते शिंदे यांचे घरापासून ते बोईनवाड यांचे घरापर्यंत सीसी रोड करणे. (रु.12 लक्ष)

123) वाघाळा मध्ये केशव निखाते यांचे घर ते आनंदा पंडीत यांचे घरापर्यंत सीसी रोड करणे (रु.6 लक्ष)

124) प्रभाग क्रं.1 मधील विजयनगर पाटी ते बाबू सुर्यवंशी यांचे किराणा दुकानापर्यंत आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे/ कांबळे सोपान यांचे घर ते सुर्वे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली व सिसि रोडचे बांधकाम करणे (रु.10 लक्ष)

125) प्रभाग क्रं.2 मधील नालंदानगर भरणे ते कायंदे यांचे घरापर्यंत आरसीसी नाली बांधकाम करणे. (रु.5 लक्ष)

126) प्रभाग क्रं.2 मधील नालंदानगर रफीक यांचे घरापासून मेनरोड पर्यंत आरसीसी नाली करणे. (रु. 5 लक्ष)

127) प्रभाग क्रं.3 मधील पांडुरंगनगर येथील अंतर्गत सी.सी.रोड करणे.(रु.15 लक्ष)

128) प्रभाग क्रं.3 मध्ये पांडुरंगनगर येथील ड्रेनेज व आरसीसी नाली करणे.(रु.15 लक्ष)

129) प्रभाग क्रं.20 मध्ये मिल क्लब चौरस्ता ते पोलिस हेड क्वॉर्टरची कंपाऊंड भिंत (भिमघाट) रोड येथे सिसि रोड करणे. (रु.25 लक्ष)

130) प्रभाग क्रं.20 मध्ये गोवर्धनघाट टेकडी भागात रस्ते व नाली करणे (रु.10 लक्ष)

131) प्रभाग क्रं.36 मध्ये निवृत्ती पोवळे यांचे घरापासून महात्मा फुले चौका पर्यंत आरसीसी नाली व रस्ता करणे (रु.8 लक्ष)

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जहिर करण्यात येते.
शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| **नावाशमनपा नांदेड** | **नावाशमनपा नांदेड** |